म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र १००३
IRBK-0101003
IRBK-0101003
IRBK-0101003

दि० २००
२००२


4 AUG 1962

म. द. बी. ग्रं०, कार्यालय शाखा.
मा. क्र. ..२००२ को प्र
दि. ... ७।।२५

# अर्पण पत्रिका.



माता पार्वति, पितृ, देव गमती. नामें महादेव जे ॥
'विंचूरस्थ' जनीं सुशांतिप्रिय ते रावान्विती जाणिजे॥
जे सांप्रत् प्रभु--पार्वतीश--स्वरूपीं तल्लीनसे राहिले ॥
पुष्पा या पहिल्या नमूनि चरणीं अत्यादरीं वाहिलें ॥१॥



IRBK-0101003

IRBK-0101003

# प्रस्तावना.

विक्रमादित्य अथवा शनिमहात्म्य या नाटकाचें कथानक ह्मणजे ‘ हीं गुजराथ भाषेची कथा ’ आणि ‘ ह्मणे तात्याजी महिपती ’ या पौराणिक शनिमहात्म्य पोथीचा कथाभाग. परंतु ‘प्रयोगाचे सोईसाठीं कांहीं ठिकाणीं फेरफार करण्याच्या’ स्वयंभू हक्काचे आधारें या नाटकाचें कथानकांत पुढीलप्रमाणें फेरफार केलेला दिसून येईल:—

१ विक्रमादित्यास ग्रहपीडेचें स्वप्न पडणें.

२ ‘ तामलिंदा ’ स रत्नपूर; व ‘ श्रीपती वैश्य सावकार ’ ला धनशेट, अशीं नांवें देणें.

३ हंसानें हार गिळणें; अलोलिकेनें चोरीचा आळ विक्रमादित्यावर घेऊन, सावकारानें चंद्रसेनामार्फत त्यास शिक्षा करणें; वगैरे भाग बदलून, अलोलिका सुशील व पद्मसेना उच्छृंखल दाखवून पद्मसेनेकडून विक्रमादित्यास शिक्षा झालेली दाखविणें. आणि तेली, तेलीण यांचा कथाभाग गाळून शनिग्रहासच तेली बनविणें.

४ पौराणिक कथाभागांत विक्रमादित्याचे हातपाय तोडले आहेत; पण नाटकाचें कथानकांत फक्त हात तोडण्यावर भागवणें.

याप्रमाणें मुख्य फेरफार असून आणखीही कांहीं फेरफार नाटक वाचण्यानें दिसून येतील.

हें नाटक व यापूर्वीचें एक सामाजिक नाटक लिहून एक ‘ तप ’ झालें! परंतु तीं प्रकाशित होण्याचा योग अद्याप आलेला नव्हता; तो योग जळगांव येथील बॅरिस्टर आठवलेसाहेब यांचें प्रोत्साहनानें आतां आलेला आहे. तरी रसिक विद्वानांनीं या नाटकाबद्दलचा आपला अभिप्राय लेखकास कळविल्यास, लेखक त्यांचा अत्यंत आभारी होईल. शेवटीं बॅरिस्टर आठवले साहेब यांचे पुस्तक—प्रकाशनाबद्दल फार फार आभार मानून, आणि छापखान्याचे मालकांनीं कामाचा

व्याप जास्त असतां त्यांतच सवड करून नाटक छापून दिल्याबद्दल त्यांचेही आभार मानून, ही प्रकाशित पहिली, परंतु लेखनक्रमानें दुसरी, अशी नाट्यकृती जगन्नियंत्या परमेश्वराचे चरणीं अर्पण करितो.

वर्ष प्रतिपदा
शके १८५२
जळगांव, पू. खां.

लेखक
**गणेश महादेव गिरधर**
(विंचूरकर)

१९३०
२१७

# विक्रमादित्य नाटकांतील पात्रैः-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | विक्रमादित्य.... | ... | ( संगीत १८ ) | ...उज्जनीचा राजा |
| २ | शनीदेव.... | ... | ( ,, १० ) | ...ग्रहराज |
| ३ | चंद्रसेन.... | .... | .... | ....रत्नपूरचा राजा |
| ४ | धनशेट.... | .... | ( संगीत ४ ) | .... ,, सावकार |
| ५ | विजयसेन.... | .... | .... | ...धारा नगरीचा राजा |
| ६ | सुमंत ... | ... | .... | ....विक्रमादित्याचा प्रधान |
| ७ | युवराज... | ... | .... | ... ,, मुलगा |
| ८ | सारथी... | ... | ... | ...शनीदेवाचा सारथी |
| ९ | शंखनाद | .... | .... | ....चंद्रसेनाचे गुप्तहेर |
| १० | पशुपती | | | |
| ११ | कुलोपाध्याय.... | .... | .... | ....विक्रमात्यादिचा |

शिवायः-पंडीत, सेवक, सैनिक इत्यादि

| | | | |
|---|---|---|---|
| १ | देवनंदा ... | ( संगीत १५ ) | ....विक्रमादित्याची राज्ञी |
| २ | अलोलिका ... | ( संगीत ८ ) | ...धनशेटाची कन्या |
| ३ | पद्मसेना... | ... | ...चंद्रसेनाची ,, |
| ४ | वासंतिका ... | ... | ...देवनंदेची दासी |

शिवाय दासी वगैरे.

---

## सीन:-

राजमहाल, विमान, अश्वबाजार, बाग, जंगल, कारागृह, छावणी, तेलयाचा घाणा, इत्यादि.

# शुद्धीपत्र.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ५ | १८ | ज्ञानासारखें | ज्ञानासारखें |
| ६ | २ | बृधग्रह | बुधग्रह |
| ,, | ४ | अर्से | असें |
| ७ | २२ | नृपतिश्रेष्ठा | नृपतिश्रेष्ठा |
| ८ | २२ | श्रेष्ट | श्रेष्ठ |
| १८ | १२ | म्रम | भ्रम |
| २७ | १ | दुर्दैवानें | दुर्दैव्यानें |
| ,, | २२ | यौनव | यौवन |
| ३४ | २ | धरि | धीर |
| ५५ | ४ | पाणग्रिहण | पाणीग्रहण |
| ५७ | १९ | तेव्हां | तेव्हां |
| ,, | २३ | मालवधिपतींच्या | मालवाधिपतींच्या |
| ६८ | १९ | कधीं | कधीं |
| ७९ | ७ | शोधासाठीं | शोधासाठीं |
| ८९ | १२ | अर्धांगींच्या | अर्धांगींच्या |
| ९९ | १५ | येथें | येथें |

# संगीत विक्रमादित्य अथवा शनीमाहात्म्य नाटक.

## अंक १ ला.

### प्रवेश पहिला.

नांदी. ( भूप-त्रिताल )

वंदन धवलांगा गिरिजेशा ॥ बिंबधारका भो परमेशा ॥ ध्रु० ॥
जगत्सूत्रधारा यतिवेशा ॥ मायातीता विघ्नविनाशा ॥
धांवुनि ये तव बाल गणेशा ॥ नवनाट्यरचनिं देण्या सुयशा ॥ १ ॥

**२ पद.** ( प्रतीकूल होइल कैसा० )

अह्मीं नाट्यबाला विमला नमुनिया शिवाला ॥
वांछितो यशाला, सकल नटजनांला ॥ ध्रु० ॥
विक्रमार्क नृपति महात्मा ॥ चरित पाहण्या जनआत्मा ॥
विकारवश हो निज आत्मा ॥ दाविण्या स्वकौशला ॥ १ ॥

**३ पद.**

पहा पहा, विक्रमार्क जो शकारि ॥ दीनजनां साह्यकारि ॥
बसला हो दरबारीं ॥ पंडित समुदायिं अहा ॥ १ ॥

[ दरबार सीन-मुलींचा नाच होतो. ]

**४ पद.** ( भूप-त्रिताल. )

प्रभुवर सुखकर छत्र अह्मांला ॥ चिरकाल असो हें सुमंगला ॥ ध्रु० ॥
दान, दया क्षम, धैर्य, जयाचें ॥ विमल कीर्तिही दिगंतिं नाचे ॥

अनुपम विक्रम वर्णन वाचें ॥ न हो कदापी हें सुमंगला ॥ १ ॥
पापभीरुता, गुणमार्मिकता ॥ सर्व जनिं असे आश्रयदाता ॥
सुजन पंडितां, दुर्जन–शास्ता ॥ आयुविपुलता दे राजकुला ॥ २ ॥

[ भालदार चोपदार पुकारतात. ]

**पहिला**— जय जयकार महाराज; स्वसाम्राज्य संस्थापक, शकसाम्राज्यविध्वंसक वेदांतधर्मपरिपालक, सकलगुणनिधी श्रीमद्राजाधिराज विक्रमादित्य महाराऽज.

**दुसरा**— जय जयकार महाराज; स्वजनोद्धारक, विविध कलोत्तेजक, संग्रामकुशल, अजिंक्य वीर, सार्वभौम मालवाधिपती, चण्डमार्तंड प्रताप, छत्रचामरयुक्त, श्रीमद्राजाधिराज विक्रमादित्य महाराऽज.

**सुमंत**—हुजूरहुकुमाप्रमाणें राजाश्रित व सांप्रत अवंती नगरांत असलेले इतरही सर्व पंडीत, यांनीं युक्त असा हा दरबार भरविलेला आहे; तरी आतां आज्ञा काय ती व्हावी.

**कुलो०**—हो राजन्, अगाऊ कोणतेही प्रकारची सूचना नसतांना एकाएकी या सुप्रभात समयाला ही पंडितांची सभा भरविण्याचें कारण काय बरें ?

**विक्रमा०**—गुरुजी, सुमंत, आज या सुमंगल उषःकालीं पंडितसभा बोलावण्याचें कारण असें झालें कीं,—

**९ पद्द.** ( माता दिसली० )

शयनीं असतां गतरात्रीं आम्हिं, स्वप्निं नवल दिसलें प्रियेसी ॥ ध्रु० ॥
श्वेतांबरवेष्टित कुणि तापसि ग्रहपिडा कथि मजासि ॥ प्रियेसी ॥ १ ॥
'पतिव्रतपालनिं दक्ष तुं पतिसह आचरि दानजपासि' ॥ प्रियेसी ॥ २ ॥

आणि इतकें सांगून तो वृद्ध तापसी अदृश्य झाला, व राज्ञीही जागृत होऊन तिनें हा सर्व वृत्तांत मला निवेदन केला. तेव्हांपासून मला साहाजिक या ग्रहाविपर्यींचें वर्णन श्रवण करण्याची उत्कंठा लागली आहे. तरी आतां आपण या विषयीं इथें चर्चा सुरू करावी.

**कुलो०**—ठीक, पंडितहो; स्वप्न सत्य किंवा असत्य, हें मी श्रीमद्राजाधिराज विक्रमादित्य महाराजांचे कुंडलीवरून ग्रहगणीत मांडून पहातों, तावत्कालपर्यंत आपण प्रभूंस यथासांग नवग्रहवर्णन कथन करावें.

**मार्तंडशर्मापंडित**:—आज्ञा प्रमाण; प्रभो ' सूर्यः सोमो महीपुत्रः सोमपुत्रो बृहस्पतिः । शुक्रः शनैश्वरोराहुः केतुश्चेतिग्रहाः स्मृताः ' ॥ रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि, राहू आणि केतू असे हे नवग्रह आहेत. मनुष्य प्राण्याच्या जन्मराशीप्रमाणें हे ग्रह जसे शुभाशुभ असतील, तशीं त्यास फळें भोगावीं लागतात; परंतु आपल्या श्रेष्ठ धर्म ग्रंथांतून वर्णन केल्याप्रमाणें अनिष्ट ग्रहाची आराधना व त्याप्रीत्यर्थ दान, जप वगैरे केलें असतां तो मग नुकसान-कारक न होतां त्याचें कल्याण करितो, अशी समजूत आहे. हे नवग्रह आकाशांत सदोदित भ्रमण करीत असून त्यांत रविग्रह हा मुख्य आहे. ह्या महा प्रचंड तेजसंपन्न ग्रहानें इतर सर्व ग्रहांना आपले भोंवतीं प्रदक्षिणा करण्यास लाविलें आहे. सर्व सृष्टीला प्रत्यहीं नवजीवन देणारा हा भगवान् सहस्ररश्मी महासमर्थ ग्रह आहे, हें जाणूनच अनादिकालापासून देवादिक सर्व याचीच उपासना करीत आले आहेत; आणि आह्मीं ब्राह्मणही या देवाधिदेवालाच रोज त्रिकाल अर्घ्य देऊन याची मनोभावें स्तुति करीत असतों. ज्याच्या पराक्रमाची उपमा लावून घेण्यांत श्रीमन् राजाधिराज विक्रमादित्य सार्वभौम महाराज भूषण मानितात, त्या महासमर्थ अतुल तेजसंपन्न सूर्यनारायणाचें वर्णन केलें तितकें थोडेंच होणार आहे. तेव्हां अशा या पराक्रमी ग्रहाची आराधना करून त्यास संतुष्ट केलें असतां इतर ग्रहांपासून पीडा होणें शक्य नाहीं असें मला वाटतें. कारण ज्याप्रमाणें या सभेंत महापराक्रमी क्षात्र तेज-संपन्न महाराजांचें तेजापुढें प्रातःकालचें ब्रह्मकर्म आटोपून शुचिर्भूत असा हा पंडित समुदाय माझे नेत्रांना फिकासाच दिसतो; तद्वत् या सहस्ररश्मीचें प्रखर तेजापुढें सर्व ग्रहनक्षत्रें लुप्त होऊन जातात. ह्मणून प्रत्येक प्राणीमात्रानें याच प्रबल ग्रहाची आराधना सदोदित चालवावी असें माझें मत आहे.

**शशधर पंडित:**–मार्तंडशर्मा पंडितांनीं रविग्रहाची एवढी स्तुति गाऊन त्यास सर्वश्रेष्ठ ठरविण्यांत फार उतावळेपणा केला, असेंच ह्मटलें पाहिजे ! कारण थोडा दूरवर विचार केला असतां त्यांना समजून आलें असतें कीं, सर्व ग्रहांत सोमग्रह हाच श्रेष्ठ असून याचेसारखा सर्वप्रिय असा दुसरा ग्रहच नाहीं. रविग्रह ह्मणजे मला तर जगदीशाच्या जगद्रूपी जगड्व्याळ घाण्याला हा एक धिप्पाड शुभ्र नंदीच जुंपला आहे असें वाटतें ! बिचारा सारखा घाण्याभोंवतीं फिरत आहे. या धोपट मार्गी चंड नंदीचें दर्शन टाळावें ह्मणूनच इतर विलासप्रिय ग्रह याचेपासून दूरदूर राहतात ! असो; हें विनोदी उपमेय सोडून दिलें, तरीही सोम ग्रहच सर्व श्रेष्ठ कसा तो पहावा. सर्व ग्रहांना आधार रवीचा व त्याला आधार प्रत्यक्ष परमेशाचा; पण त्या पार्वतीवल्लभ परमेश्वरानें हलाहल विषापासून सर्वांगाचा दाह होत असतां, याला आपल्या शिरोभागीं धारण करून आपला दाह शांत करून घेतला; तेव्हां या सुधांशूची योग्यता काय वर्णन करावी ! हा विलासप्रिय रोहिणीकांत नानाप्रकारें आपल्या प्रियजनांसह नेहमीं विलास करीत असून भूलोकीं अमृत सिंचन करीत असतो; व त्यायोगेंच आपलीं मनें सुप्रसन्न होतात. आपल्याला अत्यंत उपयोगी अशा वनस्पतींचें पोषण हाच माळी करितो, असें समजतात. सारांश, मनुष्यप्राण्यास सर्व प्रकारें सुखकर असा हा सोमग्रहच आहे. तेव्हां कोणतेही प्रकारची पीडा असली तरी ज्यानें प्रत्यक्ष कैलासनाथाचें दुःख हलकें केलें; त्याला मर्त्य मानवाची पीडा दूर करणें कठीण आहे, असें मुळींच नाहीं. तरी अशा परोपकारी श्रेष्ठ ग्रहाचेंच पूजनार्चन केलें असतां मनुष्यप्राणी सुखी होईल, असें मला वाटतें.

**माहिसुत पंडीत:**–राजन्, परमात्म्यानें डोक्यावर नाचवला ह्मणून सोमग्रह श्रेष्ठ असें हें शशधर पंडित ह्मणतात. पण त्या षोडशकलानिधीला ही योग्यता श्री सूर्यनारायणाचे–शशधरांच्या चंडनंदीचेच प्रसादानें प्राप्त झाली, हें यांना माहीत नाहीं काय ? कारण हे ग्रह त्या तेजोमय भास्कर तेजानेंच चमकत आहेत ! शिवाय मार्तंडशर्मा व शशधर हे उभय पंडीत रवि आणि सोम ग्रहाची

उपासना केली असतां इतर ग्रहपीडा बाधणार नाहीं असें ह्मणतात; पण हेंही शक्य नाहीं! कारण प्रत्येक ग्रह हा स्वतंत्र असून तो आपापला प्रताप गाजविल्यावांचून केव्हांही राहणार नाहीं! मंगळ ग्रहच पहा; हा ज्याला अनिष्ट; त्याची भयंकर दुर्दशा केल्यावांचून कदापि सोडीत नाहीं! याला साक्ष त्याचा ताम्रवर्णच आहे! जर याचें यथायोग्य पूजन झालें, तरच हा ग्रह कांहीं बरा; नाहींतर याचा प्रताप अतिदुःसह, महाभयंकर असा आहे! अहो, हा ज्याला जन्मस्थानीं अशुभ असतो, त्याला या लोकीं जन्मसार्थक्य असें जें गृहस्थाश्रमी बनून सर्व संसारसुख भोगणें—हं, पंडितहो, टवकारून पाहूं नका; जरी आपण व्यासपीठावरून अधिकार वाणीनें 'आत्मचिंतन हेंच जन्मास येण्याचें सार्थक' असें बजावून सांगत असलां; तरी अंतर्यामीं आपला संसार सुखाचा कसा होईल, आपला पंडित ह्मणून मानमरातब कसा होईल? हेच विचार घोळत असतात, हें मीं स्वानुभवावरून जाणत आहें! अस्तु,— तेव्हां या ग्रहराजाला अनुकुल केल्यावांचून एकादी मंगळी लाभणार नाहीं; व तें संसारसुख मिळणार नाहीं. तात्पर्य, या महीसुत लोहितांगाची मनःपूर्वक उपासना केल्याखेरीज मंगलमय जीवित होणार नाहीं, हें निश्चित्. ह्मणून सर्वांनीं या सुवर्णकार ज्ञातीच्या मंगळग्रहाचीच अत्यादरपूर्वक भक्ति करणें श्रेयस्कर होय, असें आतां मी ह्मणतों.

**विद्याधरपंडीतः**—महाभाग, 'नहि ज्ञानेन सदृशं पवित्र मिह विद्यते' या भूमितलावर ज्ञानासारखें-पवित्र आणि अत्यावश्यक असें दुसरें काय आहे? 'विद्यानाम नरस्य रूपमधिकं प्रच्छन्न गुप्तंधनं' आणि 'विद्याविहीनः पशुः' असें सुभाषितकारांनीं ह्मटलें आहे. ज्ञानबलानें मनुष्यप्राणी सर्व तऱ्हेच्या सुखसोई साध्य करून घेण्यास समर्थ आहे. ज्ञान प्राप्त करून घेण्याची इच्छा नसणें हें मानव जातीचें लक्षणच नव्हे; ज्ञानी मनुष्याची योग्यता फार मोठी आहे. 'स्वदेशे पूज्यते राजा। विद्वान् सर्वत्र पूज्यते.' असें ह्मटलें आहे. मानव जन्माचें ध्येयसर्वस्व जें परमात्मदर्शन, तेंहीं होण्यास ज्ञानचक्षूच पाहिजेत! महीसुतपंडित ह्मणतात, मंगळग्रह हा महा भयंकर असून, हा अनिष्ट झाला असतां, फार त्रास-

दायक होतो; पण वेदांत ह्मणतो, ज्ञानवंत जो आहे, त्याला सुखदुःखाची मुळीं पर्वाच नाहीं ! तो नेहमीं स्वानंदांतच दंग असतो ! बुधग्रह हीच ज्ञानाची देवता आहे; तेव्हां हाच रौहिणेय सर्व श्रेष्ट ग्रह समजला पाहिजे. तरी ज्ञानप्राप्तिकरितां याच ग्रहाची आराधना सर्वांनीं करावी, असें माझें प्रांजल मत आहे.

**सुमंतः**— ( स्वगत ) ठीक, ही मजा चांगली चालली आहे ! जो पहावा तो सर्व श्रेष्ठच ग्रह; कमजोर कोणीच नाहीं ! आणि हे ग्रहवर्णन करणारे सर्व श्रेष्ठ पंडितही अनायासें सार्थ नावांचेच जुळले आहेत ! मार्तंडशर्मापंडीत रविग्रह श्रेष्ठ ठरवितात, तर शशधर पंडितांनीं लागलीच त्या ग्रहाला बैलोबा ठरवून सोमग्रहाचे गोडवे गायले ! तें महीसुत पंडितांना सहन न होऊन, त्यांनीं बायको मिळूं न देणाऱ्या मंगळ ग्रहाचेच स्तुतीला आरंभ केला, आणि आतां या विद्याधर पंडितांनीं तर सर्वांना समाधि लावण्याचाच हुकूम फर्माविला ! मला वाटतें हे सुराचार्य पंडितच आतां गुरूच्या गुरुत्वाचें यथास्थित वर्णन करून त्याला सर्व श्रेष्ठ ग्रह ठरविणार ! कारण यांचेखेरीज गुरूचे नामावळींतला दुसरा कोणी पंडितच येथें मला दिसत नाहीं.

**विक्रमादित्यः**— पंडितहो आपले वर्णनावरून सर्वच ग्रह श्रेष्ठ असावेत, असें मला वाटतें. परंतु या नवही ग्रहांना संतुष्ट राखण्याचें अवघड काम असमर्थ मानवास साधेलसें मला शक्य वाटत नाहीं ! याकरितां सर्व श्रेष्ठ असा एकच ग्रह कोणता, हें निश्चयेंकरून एकमतानें मला सांगावें. मात्र तो ग्रह असा असावाः—

## ६ पद.

ग्रह बल प्रबला जो धरी । तदितर ग्रह ज्या मानिति भारी ॥ ध्रु० ॥
पूजन ज्याचें होतां सत्वरि । कृपा करी शुभकारी ॥
ग्रहछलबल निर्बल करि । फल तें साच असे गुणकारी ॥ १ ॥

**सुराचार्य पंडीतः**— महाराजन्, गुरुग्रह हाच आपले ह्मणण्याप्रमाणें सर्व श्रेष्ठ ठरेल; कारण सर्व देवाधिदेवांच्या व ग्रहांच्या गुरुस्थानीं हा विप्रजाती

बृहस्पतीच आहे. वणिक्ज्ञाति बुधग्रह ज्ञानदेवता आहे, असें विद्याधर पंडित ह्मणतात; परंतु ज्ञानसागर सुराचार्यांवांचून ज्ञानोपदेश करण्यास समर्थ असा दुसरा कोणीच नाहीं ! भवसागर तरून जाण्यास गुरुकृपाच पाहिजे. आदिशक्तिनाथही गुरुपूजन करितो; तेथें इतरांची काय कथा ! सर्व ग्रह याच वाचस्पतींचे आज्ञांकित आहेत ! सर्व देवादिक ज्याचें पूजनीं रत झाले, त्या गुरुमहाराजाखेरीज सर्व श्रेष्ठ ग्रह दुसरा कोण असूं शकेल ! तरी सकल साधन प्राप्त्यर्थ मनुष्य प्राण्यानें या पवित्र गुरुग्रहाचाच आश्रय करावा, हें बरें.

**भार्गवपंडीतः**— राजाधिराज, देव. दानवांचे अतुल रणसंग्रामांत ज्याचे प्रभावानें असुर आजिंक्य झाले; व संजीवनीचे प्राप्तीसाठीं सुराचार्यांचे सर्व श्रेष्ठ बृहस्पतींनां आपला पुत्र ज्यांचेकडे शिष्य ह्मणून पाठविला; तो दैत्यगुरु शुक्रग्रह श्रेष्ठ किंवा गुरुग्रह श्रेष्ठ याचा निर्णय महाराजांनींच करावा, इतकेंच मी सांगतों !

**भट्टाचार्यपंडीतः**— हे महाभाग, मालवाधिपते, रवि, सोम वगैरे सात ग्रह प्रबल आहेत, परंतु राहू आणि केतू हे मातंग जातीचे दोन ग्रह अत्यंत क्रूर आहेत ! इतर सप्त ग्रहांना निदान स्वजातियांचा कांहीं कळवळा तरी येईल, परंतु हे नीच जातीचे दोन्ही ग्रह मानवांची अत्यंत हेळना करितात. अहो, सर्व ग्रहांत आपल्या प्रखर व शांत तेजानें श्रेष्ठत्व पावलेले रवि व सोम अशा महान् योग्यतेच्या उभय ग्रहांनांच हे ग्रह ग्रासून टाकितात, हें प्रत्यक्ष आपण आपल्या नेत्रांनीं पाहतों ! तेव्हां यांच्या पराक्रमाचें वर्णन मी जास्त काय करावें. माझ्यामतें महाराजांचे ह्मणण्याप्रमाणें तशा योग्यतेचे राहू आणि केतू हेच सर्व श्रेष्ठ ग्रह आहेत. तरी यांचे नांवानें जो दान जप वगैरे करील, त्यास ग्रहपीडा मुळींच होणार नाहीं, हें खास समजावें.

**मंदाचरपंडीतः**— नृपतिश्रेष्ठा, आतांपर्यंत झालेल्या ग्रह वर्णनांत सुसामर्थ्यवान् ग्रहांमध्यें भार्गवपंडितांनीं शुक्र ग्रह श्रेष्ठ ठरविला; त्याचप्रमाणें भट्टाचार्यपंडितांनीं क्रूरतेंत राहू आणि केतू यांना श्रेष्ठत्व दिलें; तसें आतां मीही सांगतों

कीं, सर्व ग्रहामध्यें शनीग्रह हाच अत्यंत बलाढ्य, अत एव श्रेष्ठ आहे. हें मी आपणांस सिद्ध करून दाखवीन ! शामवर्ण शनैश्वर हा जातीचा तेली असून पांगळा होता, अशी आख्याइका आहे. ह्याचें आराध्यदैवत श्रीकालभैरवेश्वर हें असून त्याचे कृपेनेंच ह्या ग्रहाचें पंगुत्व जाऊन हा महा सामर्थ्यवान् बनला आहे ! शनि ग्रहाचा प्रताप अति भयंकर आहे ! याची अवकृपा झाली असतां प्राण्याची संतति, संपत्ती नाश पावून त्याचे जिवासही फार क्लेश होतात, पण तीच कृपा झाली असतां प्राण्याचे सर्व मनोरथ पूर्ण झाल्यावांचून राहात नाहींत. या ग्रहास आपले भक्तांचा फार अभिमान वाटतो. याचे पराक्रमाचा चमत्कार असा आहे कीं, हा जेव्हां जन्मला, तेव्हां पुत्रमुख पाहण्यासाठीं याचा पिता रथांत बसून आला असतां, शनीदेवाची दृष्टि त्यावर पडतांच, अश्वांचे डोळे दिपून जाऊन त्यांना अंधत्व प्राप्त झालें ! सारथीही पांगळा झाला ! ! व पित्याचें सर्वांग कुष्टमय झालें ! ! ! परंतु तीच शनैश्वराची शुभ दृष्टि फिरतांच सर्वांना पूर्वस्थिति प्राप्त झाली ! ज्यानें आपला प्रताप देवदानवांसही दाखविण्यास कमी केलें नाहीं, असा हा अतुल सामर्थ्यवान् ग्रह असून, हा अनिष्ट झाला असतां, प्राणिमात्रांस सतत साडेसात वर्षें छळितो ! ह्मणजे याचा पीडाकालही सर्व ग्रहांत दीर्घ आहे ! तात्पर्य, सर्वगुणांनीं अद्वितीय असा हाच सर्व श्रेष्ठ ग्रह आहे. तेव्हां याचेंच सर्वांनीं यथाशक्ति पूजन करून त्यास संतुष्ट राखावें, ह्मणजे त्याचे कृपेनें या जगांत त्यांना कांहींएक कमी पडणार नाहीं.

**विक्रमादित्यः**—पंडितहो, नवग्रहांचें वर्णन आतां आटोपलेंच ह्मणावयाचें. हें सर्व ऐकून शेवटीं माझें मत तर असें झालें आहे कीं, सर्व ग्रह हे सारखेच प्रबल असून, त्यांत गुणतेजानें श्रेष्ठ असा श्रीसूर्यनारायणच आहे ! मंदाचर पंडितांनीं आतां जें शनिग्रहाचें वर्णन सांगितलें, यावरून त्या ग्रहास सर्वश्रेष्ठ ह्मणण्यापेक्षां मला वाटतें विक्षिप्त ह्मणणेंच जास्त शोभेल ! राहू केतू सारखे दुष्ट ग्रह यापेक्षां पुष्कळ बरे ह्मणावयाचे ! कारण या विचित्रगुणी शनीग्रहानें आपली प्रखरता प्रत्यक्ष आपल्या पित्यासच दाखविण्यास कमी केलें नाहीं तेव्हां या गुणी

बाळाचे नीचतेची कमाल आहे! असल्या अलौकिक तेजाचा पुत्र पाहून शनैश्चराचे पित्यास फारच समाधान वाटलें असेल! मंदाचरपंडीत, तुह्मीच सांगा,

७ पद. (राग—छायानट)

सुख हो, काय त्या पित्यासि! ॥ ध्रु० ॥
जनन जयाचें अनिष्ट ऐसें ॥१॥ पुत्रापासुनि सुख वृद्धपणीं ॥
परलोकीं सुगती वांछिति जनिं ॥ परि या सुनयन स्वसुतापासुनि
॥ काय०॥२॥

[ इतक्यांत शनिदेव विमानासह येतात. ]

**शनी०:—** हा दुष्टा, चांडाल मदांधा,

८ पद.

किति कृष्णहृदयि अधमाधम खल कुटील निंदाप्रिय
कपटपटू वन्यपशू नरकपात्र असशी रे भूपा, रे भूपा ॥ध्रु०॥
मशक खास असासि साच समज यास काल दुजा ॥
ग्रासिल तुज पूर्णपणें; दुखविशि शिरिं ठेवुनि पद,
चंड दंड जणुं भुजंग भोगशील भूपा रे भूपा ॥१॥

**विक्रमादित्य:—** दयानिधे प्रभो,— (पाय धरतो)

९ पद (सार्थचि ते वदती०)

महदपराधी हा ॥ राया ॥ पश्चात्तापें विनम्र हो पदिं ॥ ध्रु० ॥
प्रखर पराक्रम ज्ञात होउनी । रत वैखरि हो निंदा—वचनीं ।
दुर्दैवाचि हें; क्षमा करोनी । तारी या दीना शनिराया ॥ १ ॥

**शनीदेव**:– मूर्खा, सोड माझे पाय. आतां क्षमेचें नांवच काढूं नकोस. अरे चांडाल निंदका, भर सभेंत माझा उपमर्द केलास, तेव्हां तुला याचें योग्य प्रायश्चित्त दिल्यावांचून मी राहीन काय? तुझा कोणी सहाय्यकर्ता असल्यास त्याचें बलानें तुझें तूंच आतां रक्षण कर. अरे, त्रैलोक्याधिपति महेश्वरही माझें भयानें एकेवेळीं कैलासांत दडून बसला; तेथें तुझ्यासारख्या मर्कटाची प्राज्ञा काय? माझ्या या कोपानलांत तूं दग्धच होऊन गेला असतास; परंतु माझी तशी इच्छा नसल्यानेंच केवळ वांचलास ह्मणून समज! माझ्या दृनयनांचा प्रताप तुला जिवंतपणींच दाखवितों! थांब.

**देवनंदा**:– (प्रविष्ट होऊन) दीन दयाल प्रभो, महाराजांचा जीवनक्रम किती निर्मळ आहे, हें अंतर्ज्ञानानेंच आपल्याला समजेल. महाराजांचें आयुष्यांत आपल्यासारख्या श्रेष्ठ ग्रहाची चुकून निंदा हेंच पहिलें पातक चित्रगुप्तांना सांपडलें असेल! प्रभो, या एवढ्या गुन्ह्याची वात्सल्यप्रेमानें क्षमा नाहीं कां होणार? आपले कृपेवांचून शनिराज या दीन बालकांचे रक्षण करण्यास कोण समर्थ आहे?

**१० पद.** (राग-मुलतानी)

**तारक मातपिता तूंचि असे, बाल अम्हीं तव दीनानाथा ॥ध्रु०॥**
**नृपजाया तव चरण-कन्यका, लीन पदीं विनवी शनिराया ॥**
**मातृहृदयस्थिति निज बालाशीं। तेवि सुमाता हो मम नाथा ॥१॥**

**सुमंत**:– प्रभो, महाराजांचे हातून हा खरोखरच चुकून अपराध झालेला आहे; आपण त्याची क्षमा करावी. कारण आमचे विक्रमादित्य महाराज हे सहस्रावधि लोकांचे पोशिंदे असून प्रजेचे केवळ प्राण आहेत; तेव्हां आपण निदान भारतवासियांचें कल्याणाकरितां तरी महाराजांवर कृपा करावी, एवढीच या दासाची आपलें चरणीं विनंती आहे.

**कुलोपा०**:- ग्रहस्वामी शनिराज, महाराज्ञी देवनंदा व सुमंत प्रधान यांचे नम्र विनंतीप्रमाणें आपण मालवाधिपतींना क्षमा करावी; आह्मीं पातक शांत्यर्थ यथासांग आपलें पूजन करूं.

**शनिदेव**:—बस्स्, पुरे; मी तुमचें कोणाचेंही ऐकणार नाहीं. ज्या निंदकानें पंडित समुदायामध्यें माझें चरित्राचा उपहास केला, त्या या तुमच्या चांडाल महाराजाला माझा प्रताप दाखविल्यावांचून माझी शांति केव्हांही होणार नाहीं ! (विक्रमास) मूढा, असा खिन्नवदन होऊन काय बसलास ? ऊठ, आपले रक्षणार्थ कांहीं प्रयत्न कर. अरे,

## ११ पद. (झंपा—प्रबंध)

**ग्रह प्रबल श्रेष्ठतर तेवि कुणि विप्रवर शक्तिधर**
**सिद्ध सुर प्रार्थि दनुजा ॥ रक्षणीं दक्षजो होय मनुजा ॥ ध्रु० ॥**
**कंठिरव हरि जरी क्रुद्ध वंचकवरी ॥ सिद्ध तद्रक्षणा कोण राजा ॥**
**नेणुनि मद्यशा, निंदिशी क्षुद्रशा वचनिं तेजा प्रखर पाहि माझ्या ॥ १ ॥**

(जातो)

**देवनंदा**:—हाय हाय, महाराज, शनिदेव शांत न होतांच गेले ! आतां कसें होईल !

**कुलोपाध्याय**:—महाराज्ञी, झाल्या गोष्टीचा खेद मानण्यांत काय अर्थ आहे ! भवितव्यतेपुढें कोणाचाही इलाज नाहीं ! महाराजांना द्वादशस्थानीं शनिग्रह आल्यानेंच अशी कुबुद्धि झाली. आतां या ग्रहास संतुष्ट केल्याखेरीज कांहीं उपाय नाहीं. ह्मणून शनैश्चराचे जपास महाराजांनीं स्वतःच आरंभ करून, शिवाय दानधर्म अभिषेकादि षोडशोपचारही सुरू करावें; ह्मणजे ग्रहशांति होईल.

**सुमंतः**—गुरुजी, असेंच झालें पाहिजे. त्याखेरीज इलाज नाहीं. सरकारकडून आराधना होईलच, पण आपणही सर्व विप्रांसमवेत अनुष्ठानादि प्रयत्न ठिकठिकाणीं सुरू करावें.

**विक्रमा०**-मनाचे समजुतीसाठीं तुह्मीं वाटेल तें करा, पण मला तर त्याचा कांहीं उपयोग होईलसें वाटत नाहीं. कारण आकाशांत अत्युच्चभागीं चढलेल्या महातेजसंपन्न सूर्यनारायणासही पुन्हां खालीं यावें लागतें, तेथें मजसारख्या मर्त्य मानवाची कथा काय ! हा वर्तुलाकृति जगाचा नियमच आहे ! शुभाशुभ चक्र हें सदोदित फिरतेंच राहणार ! उत्कर्षापकर्षाची ही जोडीच अशी आहे !

**१२ पद.** ( राग–मंगल, ताल–त्रिताल )

**कालगती यश अपयश दे सम । चढवि उतरि क्षणिं ही मनुजा ॥ ध्रु० ॥**
**सुगुण–श्रेष्ठ प्रभु रामराय जनिं । युवराज--पदीं प्रिय झाला ॥**
**तातवियोगा पावुनि बनला । वनवासी सतिसहअनुजा ॥ १ ॥**
**प्रमत्त लंकानाथ गति तशी । बलि वामन ने पातालीं ॥**
**सत्वधीर कष्टा बहु सोशी । शकारि गतिही तशि समजा ॥ २ ॥**

**देवनंदाः**—महाराज, असा सिद्धांतच होऊं शकणार नाहीं. उत्कर्ष हा कायमचा टिकणारा नसतो, असें आपल्याला वाटतें; पण मी ह्मणतें, श्रेष्ठ महात्मा अपकर्षांतही उत्कर्षच साधितो ! आपण ह्मणतां त्याच थोर पुरुषांचीं चरित्रें पहा,–

**१३ पद.** ( ताल--दादरा )

**रघुविर तो जाउनि वनिं दुर्जन संहारी ॥ धृ० ॥**
**शौर्य, धैर्य, औदार्या कीर्ति वरी पाहुनियां । सत्वधीर कष्टिं धीर धरुनि सुतप हारी ॥ १ ॥ दशमुख मिळवी सुगती, मरुनि दाशरथि–हातीं । द्वारपाल बलि–नृपती प्रभुसि करी द्वारीं ॥ २ ॥ तेवि जरी ये कुदशा, सुगुण–बलें ती सुदशा । नाथा राखा सुयशा, तारिल गिरिकुमरी ॥ ३ ॥**

## प्रवेश २ रा.

[ स्थळ:—राजमंदिरांतील एकीकडचें दालन ]

( शंखनाद व पशुपती येतात )

**शंखनाद:—** पशुपति, अरे पशुपती, ए पशुपत्या, बोल, अरे बोल; तुझी गर्जना चालूं दे. वनराजा, आज तूं असा कोणत्यारे चिंतेनें ग्रस्त झाला आहेस! पशो, तुझें अव्याहत हंबरणें, मधून मधून गुरगुरणें आणि प्रसंग विशेषीं खेंकाळणें, याचा बराच वेळ लाभ न झाल्यामुळें माझे कर्ण कसे अधीर झाले आहेत! तेव्हां करच त्यांची मनीषा पूर्ण! हे पशुपती, तुझी वाग्देवी आज अशी मुग्ध कां? शनीमहाराजांनीं तिचें हरण केलें कीं काय? (त्याला हालवून) पशुराजा, तूं आज आपल्या जातिस्वभावाला खास विसरलास! अरे, राजाधिराज विक्रमादित्य महाराजांसारख्या सर्व श्रेष्ठाकडून झालेल्या निंदेनें ह्मणूनच शनिमहाराजांचा इतका कडकडाट झाला. ह्मणून तुला इतकें भिती बाळगण्याचें कारण नाहीं. तुझी आपली नेहमींप्रमाणें कोणाचीन्कोणाची निंदा चालूंच दे. अरे पशुपती, तुझ्या- सारख्याच्या भुंकण्याकडे देवाधिदेव शनिमहाराज मुळींच लक्ष देणार नाहींत. वेळ आलीच तर त्यांचें वाहनही तुझे समाचाराला पुरेसें आहे! तेव्हां ह्मणतों, चालूं दे; बोल. आज तुझ्या लंबकर्णांनीं काय काय ऐकलें? तुझ्या टीकास्वरूपी शिंगांनीं आज कोठें कोठें टकर घेतली? सांग, सर्व कांहीं सांग; आणि मग मी तुझी पाठ थोपटीन! बोल पाहूं— (थांबून) काय नाहीं बोलत? ठीक आहे; हा मी चाललों; आणि आज चंद्रसेन महाराजांकडे एक गुप्त खलिता पाठवितों कीं, आपले चतुर गुप्त हेर पशुपती अगदीं कामांतून गेल्यामुळें, त्यांना दरबारीं पुन्हां बोलावून घ्यावें आणि इकडे दुसऱ्या एकाद्या चांगल्या इसमाची रवानगी करावी. तो पशुपतीसारखा वाचाळ, निंदाप्रिय, आत्मप्रौढी मिरविणारा मुळींच नसावा, असेंही स्पष्ट लिहितों.

**पशुपती:**– ( आवेशानें ) शंखनादा, तुझा शंखध्वनी पुरे कर. मूर्खा, तुला वेळ, स्थळ वगैरे कांहीं समजतें कीं नाहीं ! तूं येथें कोठें उभा आहेस ? आणि अशा या ठिकाणीं तुझा शंखध्वनी कोणी ऐकिला तर मूर्खा तुझें आणि तुझ्याबरोबर माझेंही शीर एका क्षणांत धडापासून वेगळें होईल, हें शंखा, तुझ्या कसें ध्यानांत येत नाहीं !

**शंखनाद:**– ( शांतपणें ) पशुपती, खरोखरच तूं पशू !

**पशुपती:**– ( वेडावून ) आणि शंखनादा, खरोखरच तूं शंख !

**शंखनाद:**– अरे पण मला बोलूं तर दे. तूं जें एवढें वीररसप्रधान नाटकी काम करून दाखविलेंस याचा अर्थ तरी काय ! शंख तूं का मी ! आतां झालेल्या शोचनीय प्रकारामुळें सर्व लोक हवालदिल झालेले पाहून मी तुला मुद्दाम या राजमंदिराच्या अगदीं एकीकडच्या दालनांत घेऊन आलों. आणि आतां येथें आपलें हें भाषण ऐकून तुझें आणि माझें डोकें उडवायला कोण तुझा काका का येणार आहे ?

**पशुपती:**– शंखनादा, हें अगदीं एकीकडचें दालन आहे हें खरें; परंतु तुझा हा शंखनाद मात्र हें खास चवाठ्यावरील ठरवील !

**शंखनाद:**– माझा शंखनाद हें दालन चवाठ्यावर आणील, कां तुझ्या डरकाळ्या फोडण्यानें हें चवाठ्यावर येईल हें एखाद्या त्रयस्थालाच विचारिलें पाहिजे ! पण तें जाऊं दे; आतां आपण तह करूं. अशा एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढण्यांत काय अर्थ बरें ! निंदेचा कसा भयंकर परिणाम होतो, तो पाहिलासना आतां ?

**पशुपती:**–पुरे, पुरे, शिष्ट; निंदेचा कसा भयंकर परिणाम होतो, तो आपणच प्रथम पहा. आपली आणि तिची विशेष दोस्ती आहे !

**शंखनाद**:—बरें बुवा तसें; मी निंदाप्रिय, तूं लोकांची स्तुतिस्तोत्रें गाणारा; मी शंख, तूं बुद्धिमान; मी मूर्ख, तूं अति शहाणा (एकीकडे) बैल रिकामा! [उघड] सर्व चांगले गुण तेवढे तुझ्यांत, आणि बाकी सर्व मी माझ्याकडे घ्यायला तयार आहे; परंतु हा वाद एकदांचा पुरे कर. कुशाग्रबुद्धि पशुपति महाराज, मी आपल्याला मुद्दाम एकीकडे कशाकरितां आणिलें, तें ऐकतां कां आपण? [पशुपती दुर्लक्ष दाखवितो] पशुपती, मी तुझ्याशीं बोलतों आहे.

**पशुपती**:—हो; पण शंखनादा, तें ऐकण्याची माझी इच्छा नाहीं.

**शंखनाद**:—कां?

**पशुपती**:—कुत्सित् भाषण ऐकणें कोणाला आवडेल?

**शंखनाद**:—बरें बुवा, तेंही एकदम बंद. मित्रा पशुपती,—

**पशुपती**:—हं, काय मित्रा शंखनादा, काय ह्मणतोस?

**शंखनाद**:—हें पहा, चंद्रसेन महाराजांनीं आपली ज्या नाजुक कामगिरीवर योजना केली आहे, त्याची आपण वेळोवेळीं योग्यप्रकारें अंमलबजावणी करून नेहमीं महाराजांकडून आपली तारीफच होत आली आहे! चंद्रसेन महाराजांना आजपर्यंत आपलें राज्य महापराक्रमी विक्रमादित्य महाराजांपासून संभाळून यांचे मांडलिक व्हावयाचें नाहीं, इतकीच महत्वाकांक्षा होती. पण मी ह्मणतों, आतां हा झालेला प्रकार चंद्रसेन महाराजांना कळवून असेंही कळवावें कीं, या प्रसंगीं आपणच विक्रमादित्य महाराजांवर एकदम चाल करून, आपला गेलेला सर्व मुलूख परत घेण्याचा प्रयत्न आरंभावा. कारण सध्यां विक्रमादित्य महाराजांवर शनिमहाराजांची अवकृपा झाल्यानें आपले महाराजांना खात्रीनें यश मिळेल; आणि तसें झालें ह्मणजे आपणही मग या गुप्त हेरांचे कामगिरींतून

सुट्ट एकदाच ! जयजयकार महाराज, जयजयकार महाराज इत्यादि ठराविक स्तुतिस्तोत्रें दरबारांत ओरडून ओरडून माझा कसा अगदीं कंठशोष झाला !

**पशुपती:**— शंखनादा, काय पण नामी बोललास ! लाखाची गोष्ट ! मी अगदीं याच विचारांत गर्क होतों, आणि ह्मणूनच बाबा मघाशीं मी बोललों नाहीं, समजलास ? असें हें अगदीं बरोबर होणार ! आणि आपल्या हातांतले हे दंड जाऊन आपण चंद्रसेन महाराजांचे दरबारांतील खाशे सरदार खास होणार; यांत मुळींच शंका नाहीं. अरे शंखनादा, मी एवढ्यासाठींच आजपर्यंत ब्राह्मणाकडून दररोज शनिदेवाला तेलाचा अभिषेक करवीत होतों, आणि दर शनिवारीं नारळ फोडीत होतों; तेव्हां शनिमहाराजांनीं असली ही सोन्याची संधी मला आणून दिली ! आणि गाड्याबरोबर नळ्यालाही यात्रा; त्याप्रमाणें शंखनादा, तुलाही त्याचा फायदा मिळणार ! चल दे टाळी.

**शंखनाद:**— आणि पशुपती, माझीही बायको रत्नपुरांतल्या ह्मसोबाला रोज शेंदूर फाशींत असते; त्याचा हा परिणाम बरें ! दे टाळी. झालों आपण सरदार ! ( टाळी देतात )

**पशुपती:**— चल, आपण याचा चांगला विचार करून कसं काय करायचें तें ठरवूं.

**शंखनाद:**—ठीक आहे. चला सरदार साहेब ! व्हा पुढें.

[ जातात ]

———:X:———

अंक १ ला समाप्त.

# अंक २ रा.

## प्रवेश पहिला

[ शनी सारथ्यासह सौदागर वेषांत प्रवेश कारितो ]

### १४ पद. [ ताल–त्रिताल ]

**शनी:–**

विषमय विषयीं रत दुनिया ही, निंदा–वचनीं दंग अती ॥ धृ ॥
सान थोर, श्री-धीमंतहि बहु मानिति स्वजीव प्यारा श्रेष्ठहि ॥
तदितर दुनिया सर्व निकामी, मानासिं ठेवुनि ही कुमती ॥ १ ॥
धीमंता तद्‌बुद्धी कारण, श्रीमंतासी संपत्ती ॥
कुणां शक्ति, युक्तीही वदवी, श्रेष्ठ मी असे या जगतीं ॥ २ ॥
वाद फुकाचा माजवुनि वृथा, जनस्वमनकमल कुजवीती ॥
मानव जन्मुनि स्वकार्य-विन्मुख होय, न जाणे कुणि चित्तीं ॥ ३ ॥

काय जगांत मजा आहे ! चित्रविचित्र विविध अलंकारांनीं जणुं नटलेली ही सृष्टि; कीं जिचेकडे क्षणभर एकाग्र मन करून विचारयुक्त अंतःकरणानें पहाणाराला, परमेश्वराच्या, चिच्छक्तीच्या कांहींतरी अपूर्व दैवी तेजाच्या अलौकिक सामर्थ्याबद्दल साश्चर्य आदर वाटेल. आणि तो विचारांत गुंगत जाऊन शेवटीं स्वानंदांतही तल्लीन होऊन जाईल ! कारण सृष्टींतील निसर्गाची कामगिरीच तशी अजब आहे ! हा निसर्ग सेवाधर्मानें राहून सर्व जगाला एकाद्या सत्शील अधिकारी गुरूप्रमाणें शिक्षण देण्याचें काम अव्याहत करीत आहे ! आणि याचें शिक्षण ह्मणजे प्रेम, आनंद, शांतता, सत्, सत्य, हेंच ! प्रसंग विशेषीं याचेविरुद्ध प्रवाहाला निसर्गाचा प्रिय शिष्य वाहूं लागला, तर तो त्यास आपलें कृतांत,

भयानक, असें स्वरूप दाखवून वठणीस आणील; आणि योग्य वळणाला लावून देईल ! परंतु या उदात्तबुद्धि निसर्गाकडे तशा दृष्टीनें पाहण्यास मानवास सवड आहे कोठें ! तो आपल्याच खटाटोपांत चूर आहे ! या मनुष्य प्राण्याची स्थिति हुबेहुब मधुमक्षिकेसारखी आहे. ती ज्याप्रमाणें उद्यानांतून विकसलेल्या मधुयुक्त पुष्पांवर स्वातंत्र्यानें वास न करितां, त्यांतील मधाची लूट करून आपल्या पोंवळ्यांत आणून सांठविण्यांतच गर्क झालेली असते ! आणि पुढें मग तें मधानें ओथंबलेलें पोंवळेंच तिला ब्रह्म वाटूं लागतें ! तद्वतच मानवगण हा मायाजालांत गुरफटून विषय भोगांतच दंग असतो; आणि मधून मधून कारण नसतांही स्वजातियांस निंदास्त्रानें ताडन करण्याची त्यास लहर येते ! निसर्गविभूषित भूप्रदेशावर स्वैराचरणानें गुंगणारा भ्रमर फारच विरळा ! हे बुद्धिमान् मानव आपल्या बुद्धिचा सत्तत्वाकडेच उपयोग करून घेतील तर ठीक; पण ते जर नास्तिकपणानें दैवीशक्तीवरच हल्ला करूं ह्मणतील, तर त्यांचा तो भ्रम तत्क्षणींच नाहींसा केला पाहिजे ! सूता, मी जो हा सौदागर वेष घेतलेला आहे, याचें कारण तुला समजलें काय ?

**सारथीः**-- नाहीं महाराज; पण ज्याअर्थी आपण या अवंतीनगरीसमीप आलेलों आहों, त्याअर्थी याचा संबंध विक्रमादित्याकडे असावा, असें मला वाटतें.

**शनिदेवः**-- बरोबर; त्याला चमत्कार दाखविण्यासाठींच मी हा वेष घेतलेला आहे; आणि तुलाही तसा वेष बदलण्यास सांगितलें. आतां तूं नगरींत जाऊन विक्रमादित्याला भेट; आणि सौदागर-पेशाला योग्य असें चटकदार भाषण करून त्याला इकडे घेऊन ये. तोंपर्यंत मी येथें एक उत्तमोत्तम अश्वांचा मायावी बाजार भरवून ठेवितों !

**सारथीः**--जशी आज्ञा.

[ जातात ]

## प्रवेश २ रा.

[ स्थळ:—राजमंदीर—विक्रमादित्य व देवनंदा ]

**विक्रमादित्यः—** **१५ पद.**

**विकल करित मनिं, शांति नसे मुळिं, चिंताकुल वदना अवलोकुनि ॥धृ०॥**
**प्रासादीं रमणींदु पाहुनी मत्सुख-सागरिं ये भरती ॥**
**वदनप्रभा अस्तंगत हो तरि काव्य काय मग या भुवनीं ॥ १ ॥**

प्रिये, तुझें हें म्लान वदन पाहून माझें अंतःकरणाला कसा पीळ पडत आहे! सखे, तूं वीरकन्या आणि वीरपत्नी असून संकटसमयीं असें उदासीन होणें क्षात्र धर्माला शोभत नाहीं! आजपर्यंत झालेल्या महाभयंकर रणकंदनाचे वेळीं आणि अनेक जीवावरच्या प्रसंगांतही तूं आपलें मनाची शांतता ढळूं न देतां नेहमीं माझे आनंदवल्लीस प्रेमजलानें सिंचन करीत आलीस; मग या प्रकारानेंच तूं इतकें कष्टी कां व्हावेंस ?

**देवनंदाः**—महाराज, आजपर्यंतचीं संकटें किती झालीं तरी मानवी; पण त्यावेळींही स्त्रीस्वभावानुरूप माझें उरांत कसें धस्स होत असे! पण मनाचें कसें तरी समाधान करून, आणि कांहीं वेळीं उसनें अवसान आणूनही मी माझा चेहरा आनंदी ठेवीत असे! पण महाराज, त्यादिवशींचा तो अनावर ग्रहकोप पाहून माझें काळजाला जो धक्का बसला, तो अघटीतच! त्यावेळेपासून अन्नाची चव गेली, निद्रा नष्ट झाली, आणि जागृतावस्थेंतही एकादे वेळीं दचकल्यासारखें वाटूं लागलें आहे! काय सांगूं महाराज,

**१६ पद.**

**वाटे या कोपानलिं, दग्ध होय सृष्टि सारि, प्रलय-काल हा गमे ॥धृ०॥**
**निर्जन वनिं जेवि हरिणि केसरिची भयद वाणि, एकाकी ऐकोनी ॥**
**होय स्थिती भीषण अति, मुळिं न मती, केवि कोप हा शमे ॥ १ ॥**

**विक्रमादित्य:--** शनिमहाराजांसारख्या ग्रहदेवतेचा कोप तुला प्रलयकालासारखा वाटला, याचें नवल नाहीं ! पण प्रिये, जरा शांत होऊन असा विचार कर कीं, आज आपली सर्व प्रजा राजभक्तीनें प्रेरित होऊन या अभाग्यासाठीं ठिकठिकाणीं अनुष्ठानें आणि आराधना करीत असतां, ईश्वरी-अंश शनिमहाराजांचा कोप शांत होणार नाहीं असें तुला कसें वाटतें ? तुझी भिती आतां व्यर्थ आहे ! कारण त्या भीषण प्रसंगाला कांहीं काल लोटलेला आहे, अजून आपल्याला कांहींही त्रास झालेला नाहीं; तेव्हां कोप शांत झाला हेंच खरें.

**देवनंदा:--**महाराज, अशा समजुतीनें मला स्वास्थ्य कसें प्राप्त होईल!

## १७ पद. (बाई तूं या आम्र०)

**शांति न हो वश छिन्न मनासी ॥ कुमुद–विकास न सूर्य-प्रकाशीं ॥धृ॥**
**ग्रह–अश्वासन जरि मज मिळतें ॥ तरि तें विषम मना उल्हासी ॥१॥**

महाराज, बावरलेल्या चित्ताला प्रत्येक चांगली वाईट गोष्ट सारखीच भेसूर दिसते ! रत्नपूराधिपती चंद्रसेन सैन्याची जमवाजमव करीत आहे, ही नुकतीच आलेली बातमी ऐकून मला कांपरेंच भरल्यासारखें झालें आहे ! महाराज, असे आश्चर्यचकित होऊं नका; पण मी ह्मणतें, हाच शनिदेवतेचा खेळ नसेल कशावरून !

**विक्रमादित्य:--** देवनंदे, देवनंदे, तूं देवनंदाच काय ! धारानगरीच्या विजयशाली विजयसेन महाराजांची वीरकन्या ती तूंच कां ! ! शकजेत्या विक्रमादित्याची वीरपत्नी साम्राज्ञी ती श्रेष्ठ देवनंदा हीच काय ! ! ! देवनंदे, हें मी तुझें तोंडून आज काय ऐकत आहे ! चंद्रसेन सैन्याची जमवाजमव करीत आहे, हें ऐकून तुला कांपरें भरल्यासारखें व्हावें ह्मणजे आश्चर्यच आहे! मला वाटतें देवनंदे, नेहमीं वीरोचित भाषण करणाऱ्या माझ्या प्रियपत्नीकडूनच असलें भाषण ऐकण्याचा प्रसंग माझेवर यावा, हाच मला शनिदेवतेचा खेळ दिसतो !

टीक, ती बातमी ऐकून मीही सर्व जय्यत तयारी ठेवण्यास आगाऊच सेनाधिपतींना आज्ञा केलेली आहे. आतां लवकरच येथून प्रयाण केलें, ह्मणजे रणभूमीचें सान्निध्यानेंच तुला आतां आराम वाटेल, असें दिसतें !

**वासंतिका:**-- [ प्रवेश करून; हळूंच देवनंदेस ] बाहेर सुमंत प्रधानजी कांहीं जरूरीचें कामासाठीं सरकारची वाट पहात उभे आहेत.

**विक्रमा०**:--काय आहे वासंतिके ? ( वासंतिका पुन्हां तेंच सांगते ) बरें, मी जातों; तुह्मीं सर्व आतां लवकरच स्वारीबरोबर निघण्याच्या तयारीला लागा.

( जातात )

[ बाहेरील दालन ]

**सारथी:**--( सुमंतास ) बस्स् सरकार; इतनीही मेरी हुजुरके पास हकिकत निवेदन करो. आपकी कीर्ति सुनकर मय पहिले आपके पासही मिलनेकू आया. सरकार, इतना काम करो. ( विक्रमादित्य येतो. )

**सुमंत:**--देशांतराहून कोणी एक सौदागर उत्तमोत्तम उमदे घोडे घेऊन आलेला आहे. चांगल्यापैकीं घोडे दिसल्यास आपल्यालाही आतां जरूर आहेच; तरी हुकूम झाल्यास त्या सौदागराला इकडेच बोलावून घेतों.

**सारथी:**-- हां हुजूर, परवरदिगर, इतनीही मेरी आपके चरणकेपास विनंति है. हमारे पास ऐसा ऐसा उमदा घोडा है के बस्स् ! जैसे पवनके माफक एकेक चलता है ! मय क्या कहूं सरकार; हुजूरनें आंखोसेही वो सब एकवार देखलेना; फीर हमारा तगदीरही हय ! हुजूरपाससे बराबर हम् इनाम लेजायगे, येही मेरेकू बिश्वास हय; हुजूर, हुकूम फर्माइये, सब घोडा इधरही लाके बतायेंगे.

**विक्रमादित्यः**-- शनिमहाराजांसारख्या ग्रहदेवतेचा कोप तुला प्रलय-कालासारखा वाटला, याचें नवल नाहीं ! पण प्रिये, जरा शांत होऊन असा विचार कर कीं, आज आपली सर्व प्रजा राजभक्तीनें प्रेरित होऊन या अभाग्या-साठीं ठिकठिकाणीं अनुष्ठानें आणि आराधना करीत असतां, ईश्वरी-अंश शनि-महाराजांचा कोप शांत होणार नाहीं असें तुला कसें वाटतें ? तुझी भिती आतां व्यर्थ आहे ! कारण त्या भीषण प्रसंगाला कांहीं काल लोटलेला आहे, अजून आपल्याला कांहींही त्रास झालेला नाहीं; तेव्हां कोप शांत झाला हेंच खरें.

**देवनंदाः**--महाराज, अशा समजुतीनें मला स्वास्थ्य कसें प्राप्त होईल!

## १७ पद. ( बाई तूं या आम्र० )

**शांति न हो वश छिन्न मनासी ॥ कुमुद–विकास न सूर्य-प्रकाशीं ॥धृ॥**
**ग्रह–अश्वासन जरि मज मिळतें ॥ तरि तें विषम मना उल्हासी ॥१॥**

महाराज, बावरलेल्या चित्ताला प्रत्येक चांगली वाईट गोष्ट सारखीच भेसूर दिसते ! रत्नपूराधिपती चंद्रसेन सैन्याची जमवाजमव करीत आहे, ही नुकतीच आलेली बातमी ऐकून मला कांपरेंच भरल्यासारखें झालें आहे ! महाराज, असे आश्चर्यचकित होऊं नका; पण मी ह्मणतें, हाच शनिदेवतेचा खेळ नसेल कशावरून !

**विक्रमादित्यः**-- देवनंदे, देवनंदे, तूं देवनंदाच काय ! धारानगरीच्या विजयशाली विजयसेन महाराजांची वीरकन्या ती तूंच कां ! ! शकजेत्या विक्र-मादित्याची वीरपत्नी साम्राज्ञी ती श्रेष्ठ देवनंदा हीच काय ! ! ! देवनंदे, हें मी तुझें तोंडून आज काय ऐकत आहे ! चंद्रसेन सैन्याची जमवाजमव करीत आहे, हें ऐकून तुला कांपरें भरल्यासारखें व्हावें ह्मणजे आश्चर्यच आहे! मला वाटतें देवनंदे, नेहमीं वीरोचित भाषण करणाऱ्या माझ्या प्रियपत्नीकडूनच असलें भाषण ऐकण्याचा प्रसंग माझेवर यावा, हाच मला शनिदेवतेचा खेळ दिसतो !

टीक, ती बातमी ऐकून मीही सर्व जय्यत तयारी ठेवण्यास आगाऊच सेनाधिपतींना आज्ञा केलेली आहे. आतां लवकरच येथून प्रयाण केलें, ह्मणजे रणभूमीचें सान्निध्यानेंच तुला आतां आराम वाटेल, असें दिसतें !

**वासंतिका:**-- [ प्रवेश करून; हळूंच देवनंदेस ] बाहेर सुमंत प्रधानजी कांहीं जरूरीचें कामासाठीं सरकारची वाट पहात उभे आहेत.

**विक्रमा०**:--काय आहे वासंतिके ? ( वासंतिका पुन्हां तेंच सांगते ) बरें, मी जातों; तुह्मी सर्व आतां लवकरच स्वारीबरोबर निघण्याच्या तयारीला लागा.

( जातात )

[ बाहेरील दालन ]

**सारथी:**--( सुमंतास ) बस्स् सरकार; इतनीही मेरी हुजुरके पास हकिकत निवेदन करो. आपकी कीर्ति सुनकर मय पहिले आपके पासही मिलनेकू आया. सरकार, इतना काम करो. ( विक्रमादित्य येतो. )

**सुमंत:**--देशांतराहून कोणी एक सौदागर उत्तमोत्तम उमदे घोडे घेऊन आलेला आहे. चांगल्यापैकीं घोडे दिसल्यास आपल्यालाही आतां जरूर आहेच; तरी हुकूम झाल्यास त्या सौदागराला इकडेच बोलावून घेतों.

**सारथी:**-- हां हुजूर, परवरदिगर, इतनीही मेरी आपके चरणकेपास विनंति है. हमारे पास ऐसा ऐसा उमदा घोडा है के बस्स् ! जैसे पवनके माफक एकेक चलता है ! मय क्या कहूं सरकार; हुजूरनें आंखोसेही वो सब एकवार देखलेना; फीर हमारा तगदीरही हय ! हुजूरपाससे बराबर हम् इनाम लेजायगे, येही मेरेकू बिश्वास हय; हुजूर, हुकूम फर्माइये, सब घोडा इधरही लाके बतायेंगे.

**विक्रमादित्यः--** सुमंत, चला, आपण यांचेच ठिकाणाकडे जाऊं.

[ इतक्यांत युवराज येतो. ]

**युवराज**:--महाराज, महाराज, घोडे पहायला चला. तिकडे मोठे चपळ घोडे आलेले आहेत; मला समजलंय. चला, चला; मला पाहिजे घोडा.

**सारथीः**--हां, हां, छोटे हुजूर, बराबर, चलो; बहोत उमदे घोडे है, चलो. आपके माफक छोटे उमदे घोडेही है. चलो.

**युवराजः**--तूंच कांरे घोडेवाला? मला कांरे नाहीं अगोदर सांगायला आलास? चलाना महाराज लवकर, चांगले घोडे घेऊन येऊं; चला.

[ जातात ]

---

## प्रवेश ३ रा.

[ अश्वांचा मायावी बाजार ]

**शनीः**--चलो, चलो, लेवो, हजार मोहोरोंकू एकेक घोडा, हजार मोहोरोंकू एकेक घोडा. चलो, देखो; बैठो; फिराके देखना; फीर दाम देना. चलो. घोडा पवनके माफक जाता है. देखो. खानेकूभी उसकू बहोत थोडा लगता हय. चलो, लेवो; ये घोडेपर बैठनेवाला कबी किसकू हार नहीं जानेका ! चलो.

( याप्रमाणें पुन्हां पुन्हां ह्मणतो; कांहीं मंडळी घोडे फिरवून आणतात. )

**एकः**--शेटजी, हा घोडा मी पसंत केला; पण याची किंमत बोला पाहूं?

**शानी:**--एकही किंमत; एकही किंमत ! जिसकू जरूर होयगी, उसने हजार मोहरा देके घोडा लेजाना. चलो, चलो.

**दुसरा:**--( एकीकडे ) शेटजी बेटा अडाऊच दिसतो.

**तिसरा:**--त्याचा मालही तसाच आहे; ह्मणून किंमतही तशीच ! जरूर असेल त्यानें हे घोडे घेऊन महाराजांचे बरोबर लढाईवर जावें; ह्मणजे खात्रीनें यश मिळून सरकारची मर्जी बहाल होईल !

**चवथा:**--पग आपण घ्याच एक ?

[ कांहीं घोडे घेतात; कांहीं एकाच घोड्यासाठीं भांडतात. इतक्यांत भालदार चोपदार इशारा देऊन गर्दी मोडते. विक्रमादित्य सुमंत, सारथी-येतात. ]

**युवराज:**--ए घोडेवाल्या कोणता घोडा सगळ्यांत उत्तम आहे? मला दाखव पाहूं ?

**सारथी:**--ये लेना, छोटे हुजूर; आपके माफक छोटाही हय, और बहोत पलनेवालाही हय !

**युवराज:**--नाहीं; मला मोठा पाहिजे. महाराजांचे बरोबर मला लढाईवर जावयाचें आहे. तेव्हां त्यांचे घोड्याबरोबर चालणारा घोडा मला पाहिजे. महाराज घेतील तोच मी घेईन.

**विक्रमादित्य:**--हा घे बाळ, हा चांगला आहे. मी असाच दुसरा घेतों.

**युवराज:**--बरें मीं हा फिरवून पाहतों.

( जातो )

**शनी०:**--सरकार, घोडे देखिये. हुजूरकी कीर्ति सुनकर मय इधर घोडे बेचनेकू आया. मय बहोत दूरदेसका रहनेवाला हूं. सरकार, देखिये; सब घोडे एकजात असल हय! उनकी गती इधरके कोनसेही घोडेसे जादा है! देखो सरकार, एक जरा बैठके देखो. खास आपनेलायक ये एक घोडा मयने पसंत किया हय. ये घोडा, सरकार, एक घंटेमे सब दुनियेकू चक्कर मारके आनेवाला तेजी हय! देखो सरकार इसका मोल तो बिलकुल अमोल है! हुजूर ये घोडा जैसी जादूकी कल रहिती हय, वैसा हय! सरकार, बैठके प्रचिती देखना, इतनीही मेरी चरणकेपास प्रार्थना हय.

**सुमंत:**—अच्छा, ये घोडा सरकारकू पसंत होगा, तो इसकी किमत क्या लेवगे?

**शनी:**—सरकार, आपपाससे हमने किमत क्या लेना? हुजूरकू चाहे वो इनामही देना. बस्स् सरकार; आपके सरदार लोकही अबीके अबी मेरे बहोत घोडे बेचके लेगये है.

**विक्रमादित्य:**—सुमंत, हे घोडे खरोखरच जरा पाणिदार दिसतात! आपल्याला चंद्रसेनावर आतां निकराचा हल्ला करावयाचा आहे, तेव्हां परमेश्वरानेंच आपल्याकडे या सौदागराला पाठविलें, असें ह्मटलें पाहिजे!

[ युवराज येतो. ]

**युवराज:**—महाराज, हा घोडा फारच चांगला आहे हो! आपल्याजवळ तर असा पळणारा एकही नाहीं! हा मला पाहिजेच; तुह्मीही असाच एक घ्या. ह्मणजे आपले घोडे नेहमीं बरोबर चालतील.

**विक्रमादित्य:**--हं! ठीक आहे. तुला आवडला ना हा? मग जा हा घेऊन पुढें. मीं मागून असाच एक घोडा घेऊन येतों.

**युवराज:**—हो, जातोंच मी. हा आईला अगोदर दाखवितों.

(जातो)

**विक्रमा०:**—सुमंत, सेनापतींची आणि या सौदागराची गांठ घालून त्यांना आपले सैन्याकरितां जरूर तेवढे घोडे घेण्याविषयीं सांगा; आणि किंमत खजिन्यांतून देऊन टाका.

**सुमंत:**—जशी आज्ञा.

**विक्रमा०:**—अरे, तेरे पाससे हमारे सैन्यकेलिये बहोत घोडे लेना हय. और फीर उनकी किमतही तेरेकू मिलेगी. लेकिन् ये हमारे खास घोडेकेलिये ये हार तेरेकू इनाम ले.

**शनी:**—सरकार, पाहिले घोडा बैठके पसंत करना; और फीर इनाम देना.

**विक्रमा०:**—नहीं, मेरा कायदाही ऐसा हय. ले; पहिले इनाम. घोडेकी मेरेकू खात्री हय.

**शनी:**— (घेतो) आहा! क्या हुजूरकी दानत!!

**विक्रम:**—सुमंत, मी या अश्वाची परीक्षा पाहून लवकरच येतों; तोंपर्यंत तुह्मींही कांहीं पसंत करून घ्या.

**सुमंत:**—जशी आज्ञा.

[विक्रमादित्य जातो, बरोबर दुसरेही सेवक घोडे घेऊन जातात; व लागलीच तो देखावा अदृश्य होतो! आणि सुमंत आश्चर्यचकित उभा राहतो!]

**सुमंत:**—हा काय चमत्कार! मी स्वप्नांत तर नाहीं!! (डोळे मिटून चिमटे घेऊन) छे; मी पूर्ण जागृतावस्थेंत आहे! मग मी हा पिशाच्चलीला पाहतों कीं काय? आतां इतक्यांत येथें उत्तमोत्तम अश्वांचा बाजार भरलेला होता;

आणि एकाएकीं सर्वच गुप्त होऊन हें एक निर्जन अरण्यच मी पहात आहे ! हा घटोत्कची मायावी बाजार तर नव्हता ! छे; सर्वच चमत्कार ! हा ढोंगी सौदागर खास कोणीतरी अजब जादुगार असला पाहिजे ! किंवा मी निद्रावस्थेंतच हें सर्व पहात आहे ! ( विचार करीत उभा राहतो ) छे; मला तर अगदींच भांबावल्यासारखें झालें आहे ! आतां प्रथम राजमंदिरांत जाऊन, तेथें महाराज आहेत कीं नाहींत, हें पाहिलें पाहिजे. मग सर्व उलगडा होईल'

[ जातो ]

---

## प्रवेश ४ था.

[ स्थळः—धनशेटाचा बाग ]

**धनशेटः—** **१८ पद.** ( झिंझोटी—केरवा )

लीला मम दैवाची अघटित ही न कळे ॥
मी अभागि भाग्यशालि वदती मज जन खुळे ॥ध्रु०॥
बहु विवाह करुनि पुत्र-प्राप्ति-हेतु सिद्ध नसे ॥
एकलि गुणि कन्या हो उपवर, या हृदयिं जळे ॥१॥

पहा, आज माझी कुबेरासारखी संपत्ती ! या रत्नपूरामध्यें हा धनशेट म्हणजे नवकोटनारायण, म्हणून जिकडे तिकडे प्रसिद्धी !! इतकेंच नाहीं, पण खुद्द रत्नपूराधिपति चंद्रसेन महाराज या गर्भश्रीमंत धनशेटाशीं स्नेह ठेवूं इच्छितात; असा हा सकृद्दर्शनी वैभवशाली दिसणारा धनशेट निपुत्रिकत्वामुळें अगदीं दीन बनून गेला; तस्मात् 'दैवीविचित्रागतिः' हेंच खरें !!! या

दुर्दैवानें पुत्रप्राप्तीसाठीं अनेक विवाह करूनही, शेवटीं पुत्र पुत्र ह्मणून रात्रं-दिवस तळमळत पडण्याचा प्रसंग यावा; आणि या विपुल संपत्तीला एकही औरस पुत्र वारस असूं नये; असा कोणता अन्याय परमेश्वरा माझे हातून घडला! दांत आहेत, तर चणे नाहींत; चणे आहेत, तर दांत नाहींत; हा तुझा विपरीत खेळच दिसतो! असो, मला निदान तूं एक गुणवान कन्या तरी दिलीस, हेंच मी माझें भाग्य समजतों! माझ्या लाडक्या अलोलिकेनें आपल्या सद्गुणांनीं मला आजपर्यंत पुत्राची उणीव भासूं दिली नाहीं! पण आतां ती उपवर झाल्यामुळें वृद्धपणीं कदाचित् तिचा वियोग होईल, या विचारानें अंतर्यामीं कालवाकालव सुरूं होते! परमेश्वरा, हाच प्रसाद जर तूं मला पुत्ररूपानें दिला असतास, तर आज माझेसारखा भाग्यवान् या भूतलावर कोणी नसता! पण, पण काय, हाच तर तुझा खेळ! माझ्या या ऐश्वर्य--संपन्न वाड्यांत या हिरकणीनें सर्वांचे डोळे कसे दिपवून टाकले आहेत! काय करावें, मीं पुष्कळ पाहिलें; परंतु इच्या रूपगुणांला योग्य असा एकही राजबिंडा वर मला घरजांवई ह्मणून मिळत नाहीं! तिला या अभाग्याला वृद्धापकाळीं विव्हळत टाकून गेले, तरच संसारसुख भोगतां येईल; असा माझा दैवयोग दिसतो! हर हर, कांहीं सुचत नाहीं! बाळे अलोलिके, या तुझ्या वृद्ध पित्याची कांहीं तरी कींव कर; नाहीतर हा लवकरच राम ह्मणेल! (अलोलिका येते)

**अलोलिका:**—काय ह्मणालांत बाबा तुह्मीं इतक्यांत?

**धन०:**--बाळे, काय सांगूं! तुला सर्व समजतेंच आहे.

## १९ पद.

**तव गुण करि मम चित्ताकर्षण ॥ विरह-विचार छळी रात्रंदिन ॥ध्रु०॥**
**बालपणीं केलें मनरंजन ॥ परि वरिलेसि अतां नवयौवन ॥**
**जाशिल पतिगृहिं केवि दशा मम ॥ चिंता जाळी ही रात्रंदिन ॥१॥**

**अलो०:**—बाबा, या नसत्या कल्पना उगाच मनांत आणून असे उदासीन कां होतां बरें ! बाबा,—

## २० पद.

जन्म दिला तुम्हिं देहा या मम ॥ मन भंगाया जरि तो कारण ॥ जनन निष्फला, गतिहि न उत्तम ॥धृ०॥ सुख--साधन-कार्यी रत प्राणी, सुख-विन्मुख करणें न सुलक्षण ॥ जें सुख तुह्मां, तें प्रिय मजला; विवाह न करा, विनती ही मम ॥ १ ॥

**धन०:**—बाळे, स्वसुखासाठीं आपल्या प्रिय कन्येला अविवाहित ठेवण्यास कोणता सहृदय पिता तयार होईल ! उलटपक्षीं तिला योग्य वराची जोड मिळून तिची संतती खेळविण्यांतच त्याला खरें सुख वाटेल; आणि ह्मणूनच बाळे मी तुझेसाठीं चांगल्या वराची निवड करण्यांत सध्यां गुंतलों आहे. फक्त चिंता इतकीच कीं, तो घरजांवई होण्यासारखा मिळेल, किंवा नाहीं; कारण तसा तो न मिळाला, तर मात्र तुझें वियोगजन्य दुःख भोगावें लागेल, या विचारानें माझें मन उद्विग्न होतें !

**अलो०:**—बाबा, मला तरी तुह्मांला वृद्धापकाळीं सोडून जाणें कसें आवडेल ! आजपर्यंत कधीं सुद्धां तुह्मीं मला, किंवा मी तुह्मांला सोडून एकटी कुठें गेले नाहीं; मग आतांच तुह्मांला कायमचें सोडून माझ्यानें कसें जाववेल ! बाबा, ज्यापासून आपणां उभयतांनाही सुख नाहीं, असली गोष्ट मुद्दाम करून मला परस्वाधीन कां करतां ? नका मला अशी दूर लोटूं.

**धन०:**—बाळे, तूं पितृप्रेमामुळें असें ह्मणत असशील; पण तें केव्हांही इष्ट होणार नाहीं. जनलज्जेसाठीं तरी निदान तुला विवाहितस्थितींत गेलें पाहिजेच. आणि विवाह लावल्यानें आपला वियोग होईलच असेंही नाहीं; ती सवड

आपल्या ताब्यांतील आहे. आणि त्याप्रमाणेंच मी सर्व व्यवस्था करीन. जा बाळ, तूं आनंदानें रहा. नसती चिंता मागें लावून घेऊं नकोस. मी सर्व इष्ट तेंच करीन. ती पहा, राजकन्या पद्मसेना इकडेच येत आहे, तर मी जातो आतां. चालूं द्या तुमचें हितगूज. (जातो)

**अलोलिका:**—[स्वगत] **२१ पद.**

**विनवी पितया न विवाह करा ॥ नवयौवन गांजित या शरिरा ॥धृ०॥**
**मन विवश सम साम्यसमीरा ॥ उभय विरोधी प्रबल विकारा ॥**
**निशिदिनिं चिंता केवि द्विधा मन चंचल पावत शांति सुरुचिरा॥ १ ॥**

[पद्मसेना येते]

**पद्मसेना:**—अलोलिके, आज अगदीं एकटीचशी बागेंत फिरतेस ? परिचारिकांना कुठें प्रियाराधनसंबंधीं कांहीं नाजूक कामगिरीवर पाठविलेस कीं काय ? मी आल्यानें तुला त्रास व्हावयाचा नाहींतर ! सांग बाई, तसें कांहीं असलें तर; मी आपली जातें. उगीच प्रेमलीलांत व्यत्यय नको !

**अलो०:**—पद्मसेने, काय हें; तुझें हें भाषण कुणीं ऐकलें, तर काय ह्मणतील! तूं एक राजकन्या, ह्मणून बाई तुला कांहीं भिती नसेल ! पण माझें तसें नाहीं. इथें माझ्या वडिलधाऱ्यापैकीं कुणीं जर हें ऐकलें; किंवा त्यांना कुणाकडून जर हें समजलें; तर माझी मात्र चांगली परीक्षा व्हावयाची !

**पद्म०:**—अग वेडे, त्यांत तुझी परीक्षा काय व्हावयाची ? हें सर्व जाणूनच असतात ! अग, मुली वयांत आल्या, ह्मणजे हे साहजिक खेळ खेळले जायचेच ! हा सर्वांचाच अनुभव असतो. आतां तसले खेळ खेळायचे नाहींत, मग काय ह्मातारपणीं कां खेळायचे ! तो मदन किनई बाई हे आपोआप सर्वांना शिकवितो !

आणि हे खेळ खेळायच्या जागा सुद्धां अशाच पुष्पवाटिका, लताकुंज वगैरे कांहींतरी असतात. ह्मणून ह्मणतें; मग खरें सांग पाहूं, आतां तुझ्या मनोवृत्ति कशा काय आहेत ? ( अलोलिका तिरस्कार दाखविते ) सांग, सांग; लाजूं नकोस. मी तुझी बालपणापासूनची जीवाची मैत्रीण ना ? मग माझ्याजवळ इतकी लाजतेस !

**अलो०:**—पद्मसेने, पुरे कर बाई; दुसरा कांहीं विषय काढ. तुला नेहमीं हेंच बोलणें कसें आवडतें ? ( एकीकडे ) काय करावें, ही राजकन्या पडली, नाहींतर इच्या वाऱ्याला सुद्धां उभें राहणें धोक्याचें वाटतें !

**पद्मसेना:**—अलोलिके, मी बाई आपली साधी भोळी आहे हो ! मला तुझ्यासारखें डांवपेंच अन् लपंडाव कांहीं खेळतां येत नाहींत ! काय पण अविर्भाव दाखविते ! जसा कांहीं मनापासून या गोष्टींचा कंटाळा. मनांतून तर अशा गुदगुल्या होत असतील, कीं नेहमीं हाच विषय ऐकावासा वाटत असेल ! पण, पण जाऊं दे बाई; मी नाहीं आतां जास्त बोलत. तुला नाहींतर राग यावयाचा ! सर्वांचीच रीत आहे ही ! या वयांत एकांतच प्रिय वाटतो; आणि आपल्या प्रीतिचें एखादें माणूस असेल, त्याचेंच भाषण मात्र ऐकावेसें वाटतें ! बाकी सर्व कांहीं तुच्छ वाटतें. खरें कीं नाहीं ?

**अलो०:**—मला नाहीं माहीत.

**पद्म०:**—कशाला असेल माहीत ! आजपर्यंत तूं अशी बागेंत एकटी कधीं फिरत होतीस कां ? नेहमीं कुणी घरांतील दासी वगैरे सेवेला जवळ तयार असायच्या; मग आजच अशी एकटी कशी येथें आलीस ? सांग पाहूं, काय सांगतेस तें ?

**अलो०:**—एकटी कशाची पद्मसेने, आतां बाबा इथें होतें. तूं येण्यापूर्वीच ते गेले.

**पद्म०:**—बरें; असेल. पण आज तुझें असें तोंड उतरलेलें कां? बाबा कांहीं बोलले कां?

**अलो०:**—बाबा निपुत्रीक असल्यामुळें केव्हां केव्हां उदासीन असतात; त्यामुळें मलाही वाईट वाटतें. (स्वगत) इला जास्त सांगून उपयोग नाहीं; नाहींतर इचा वात्रटपणा पूर्वींप्रमाणें सुरूं होईल!

**पद्म०:**—आतांच त्यांना कांग एवढें वाटायला लागलें! तुझा वियोग होईल ह्मणूनच ना! मला सगळें कांहीं समजलेंय; आतांशा आपल्याच बाबतींत महाराजांचा आणि तुझे बाबांचा खल चाललेला असतो. दोघांनाही सध्यां आपल्या विवाहाची काळजी लागली आहे. तुझ्या बाबांचा विचार तर घरजांवई पहावयाचा आहे! ह्मणजे तुझा वियोग टाळतां येईल. पण तें अजून जमत नाहीं. चांगला राजबिंडा वर घरजांवई मिळाला ह्मणजे महाराजही त्यांना पहिल्या मानाची सरदारी देणार आहेत. तेव्हां तुला कांहीं असें चिंताक्रांत होण्याचें कारण नाहीं. लवकरच सर्व कांहीं तुझ्या मनासारखें होईल.

**अलो०:**— (उपहासानें) बरें झालें बाई, मी त्याच काळजीनें वाळून चाललें होतें! पण आतां एकदम सर्वांगावर मूठभर मांस चढलें! आतां राजकन्येची काय व्यवस्था चालली, ती सांगा बरें? माझें कथानक पुरें आतां!

**पद्म०:**—राजकन्येच्या नशिबीं आहे मैत्रिणीचें वैवाहिक सुख पाहून आनंद मानणें. कारण महाराज पडले मानी; तेव्हां त्यांच्या तोडीच्या स्वतंत्र राजघराण्यांतलाच फक्त वर मिळाला तर राजकन्या विवाहित होणार. आणि तें तर आतां बहुतेक अशक्यच! कारण जो पहावा तो महाराजांचा हाडवैरी जो उज्जनीचा विक्रमादित्य-त्याचा मांडलिक! तेव्हां तसा वर मिळत नाहीं; आणि राजकन्येचा विवाह होत नाहीं! आणि राजकन्याही एखाद्याची बटिक होऊं इच्छित नाहीं! तीही स्वातंत्र्यप्रियच आहे!

**अलो०**—पद्मसेने, हें मात्र अगदीं मनापासून भोळेपणानें बोललीस ना? परिस्थितीनें तूं इतकी स्वातंत्र्यप्रिय झालीस वाटतें! पण जप हो; नाहींतर ही तुझी स्वातंत्र्यप्रीति तुझे मानी कुळाला कलंक लावून तुझे धिंडवडे काढील! मला तर तुझी कठीण अवस्था दिसते! पद्मसेने, तुला किनई मला आपलें वाटतें तें सांगतें हो,

## २२ पद.

यौवनमद गुंग करी, टोंचुनि मृदुतर स्मरशर ॥ ध्रु ॥
अनुकुल धन, ऐश्वर्या न्यून नसे तुज किमपिहि ॥
स्थिति मोहिल संन्यासी, अल्पकाल निकटि राहि ॥
जनन तुझें राज–कुलीं, बहुविधा विलास पाहि ॥
अबला तूं स्त्रीदेही; उद्दीपित स्मर–विकार ॥ १ ॥

**पद्म०**—अलोलिके, कसें पण अगदीं अनुभवसिद्ध बोललीस! आतां बरी वठणीवर आलीस!

**अलो०**:—ह्मणजे, हें काय बाई! मी तुझ्याविषयीं ह्मणते. राजकुलांत मी नाहीं जन्म घेतला!

**पद्म०**:—अलोलिके, हें कोणाला तूं सांगतेस! तुझे आणि माझे स्थितींत अंतर काय तें सांग पाहूं? नांवाला मात्र माझा राजघराण्यांत जन्म; आणि नवकोट नारायणाचें कुलांत तुझा जन्म. पण धन, ऐश्वर्य, विलास यांची अनुकूलता तुलाच माझेपेक्षां कांकणभर जास्त आहे! तुझे बाबा रत्नपूराधिपति चंद्रसेन महाराजांचे धनको आहेत!

**अलो०**:—पण पद्मसेने, मान तुझा मोठा आहेना ! मी विवाहित झाले तरी माझे स्थितींत फरक व्हावयाचा नाहीं. पण तेंच तुला माझेसारखा वाटेल त्याच्याशीं विवाह लावतां येणार नाहीं. राजघराण्यांतच जाशील आणि कोणत्या तरी राजाची राज्ञी किंवा राजस्नुषा होशील !

**पद्म०**:—अलोलिके, असें या जन्मांत तरी महाराजांचे मानी पणामुळें होईल कीं नाहीं, शंकाच वाटतें; आणि मला तर तुझी स्थिती सहस्रपटीनें आवडते ! काय सांगूं अलोलिके, माझा जीव कसा कासावीस होतो ! तूं वर्णन केलेंस, तें तंतोतंत खरें आहे ! आणि असल्या विचारांनींच माझ्या शरिराचा दाह होतो, ह्मणून मी तुझेकडे वारंवार येते. पण तूं मात्र बाई नेहमीं शांत दिसतेस ! माझे विकार तर क्षणोक्षणीं अनावर होतात !

**अलो०**:—पण पद्मसेने, त्याच विकारांचा विचारानें नायनाट केला पाहिजे. ते विचार मनांत फारसे आणूंच नयेत. चल, आपण आतां जरा दुसऱ्या कामाकडे वळूं; ह्मणजे हा विचार नाहींसा होईल.

(जातात)

[ त्याच बागेंत विक्रमादित्य येतो. ]

**विक्रमा०**:—हा अश्व एकाएकी अदृश्य कसा झाला ? खास ही शनिमहाराजांचीच लीला असली पाहिजे ! सौदागर—वेषधारी शनिमहाराजांचे कळसुत्री अश्वानें मला येथें कोणीकडे आणून सोडले आहे, कांहींच समजत नाहीं ! हें तर एक फारच बहारीचें रमणीय उद्यान दिसत आहे ! शनिमहाराज, या अपरिचित ठिकाणीं आतां कोणता चमत्कार दाखविण्याचा आपला बेत आहे ! ग्रहपीडेचा हा प्रारंभच ह्मणायचा ! सार्वभौम विक्रमादित्या, आतां नानाप्रकारच्या आपत्ती सोसण्यास तुला तयार झालें पाहिजे. आणि प्रत्येक प्रसंगीं माझ्या हृदयानंद—विकासिनी प्राणेश्वरी देवनंदेचा कळकळीचा धीरोपदेश सतत अंतर्यामीं जागृत ठेविला पाहिजे !

## २३ पद. (जिल्हा–ठुंबरी, ताल-त्रिताल)

धीर मना दे संकटसमयीं ॥ इश–हेतु सन्मानुनि कार्यीं ॥ धृ ॥
भुवनीं संचित–योगें फल तें ॥ पूर्वजन्मिं घडतें निजहातें ॥
कधिंहि घडो न कुकर्म कुसमयीं ॥ १ ॥

(दासी येते.)

**दासी:--** (स्वगत) आह्मां दासीजनांना अगाऊ वर्दी मिळाल्याखेरीज कोणाही परपुरुषाचें पाऊल इथें पडायचें नाहीं; असा बंदोबस्त असतांना, हा कोण अपरिचित तरुण या ठिकाणीं इतक्या धिटाईनें उभा आहे बरें! याचे पेहेरावावरून तर हा कोणीतरी सरदार असावा, असें दिसतें; पण मला त्याला विचारलेंच पाहिजे. (उघड) महाराज, आपण मालकांची परवानगी घेऊन इथें आल्याचें दिसत नाहीं?

**विक्रमा०:--**नाहीं; मी या अपरिचित ठिकाणीं केवळ दैवयोगानेंच असा अकल्पित येऊन पडलों आहे! मला तुमच्या मालकांची भेट करवून द्याल, तर मी त्यांचेजवळ याबद्दल माफी मागेन.

**दासी:--**मग या तर महाराज माझे मागून; मी त्यांची गांठ घालून देते.

(जातात.)

### [ बागेचा दुसरा भाग ]

**धनशेट:--**(आश्चर्यानें) माझें या उद्यानांत परवानगीवांचून कोणालाही शिरण्याची बंदी असतांना इतक्यांत त्या बाजूनें हा कोण इसम घोडा भरधांव फेकीत तिकडे चालता झाला! [इकडे तिकडे पाहून] अं, आणि हा कोणी झोंकदार पोषाक केलेला तरुण एका स्त्रीसह इकडेच येत आहे! हें आज आहे तरी काय? कां नेहमींच माझे अपरोक्ष असले प्रकार इथें घडत असतात!

[ विक्रमादित्य व दासी येतात. ]

**दासी:**-- [ हळूंच ] महाराज, हे धनीसाहेब उभे आहेत.

**विक्रमा०:**--महाराज, मी आपल्याला अगदींच अपरिचित आहे; आणि या आपल्या उद्यानांत परवानगीवांचून फिरण्याची मनाई असतांना मी अपराधी ह्मणून सांपडलों आहे! परंतु माझा या गोष्टीला अगदींच नाइलाज होता. माझा घोडा बेफाम झाल्यामुळें मला आपल्यापुढें येण्याचा प्रसंग आलेला आहे.

**धन०:**-- (स्वगत) काय, आतां त्या बाजूनें घोड्यावरून गेलेला हाच इसम; मग हरकत नाहीं. हा इथें चुकून आलेला दिसतो! [ उघड ] कांहीं हरकत नाहीं; आपण कोण आहां ?

**विक्र०**– (स्वगत) आतां कोणत्याही प्रसंगीं जरा सावधगिरीनेंच वागलें पाहिजे! (उघड) महाराज, हें कोणतें नगर आहे ?

**धन०:**– (स्वगत) अरे, माझ्या प्रश्नाचें उत्तर न देतां मलाच आणखी प्रश्न करतो! आणि याच्या या प्रश्नावरून हा अगदींच नवखा दिसतो. मात्र याच्या मुखचर्येवरून आणि पोषाखावरून हा उच्च कुलांतील असावा, हें खास. [ उघड ] ही चंद्रसेन महाराजांची रत्नपूर राजधानी आहे.

**विक्र०:**– [ स्वगत ] हर हर, सत्यवादी विक्रमादित्या, तुझेवर आतां असत्य बोलण्याचाच प्रसंग आलेला आहे! काय ही कर्मगती! शत्रूचे राजधानींत माझें आगमन! शनीराज, मला हल्लीं चंद्रसेनासमोरच तर उभे केलें नाहीं! ह्मणजे चमत्काराची परमावधी झाली!

**धन०:**--आपण जरा गोंधळल्यासारखें दिसतां, असें कां ?

**विक्र०:**–नाहीं, मला माझे घोड्यानें किती लांब आणून टाकलें; या विचारांत मी गुंग होतों. महाराज मी उज्जनीचा एक सरदार असून, कांहीं कारणानें

तिथल्या सार्वभौम विक्रमादित्य महाराजांची मजवर अवकृपा झाल्यानें मला आतां त्यांचें राज्यांत राहणें धोक्याचें वाटूं लागलें; ह्मणून मी बाहेर पडलों आहे. आजपर्यंत मजल दरमजल करीत चाललों असतांना, आज एकाएकी घोडा भडकल्यामुळें मी हा इथें येऊन पडलों आहे. एवढें बरें झालें कीं, मी विक्रमादित्य महाराजांचे शत्रूचें राजधानींत आतां येऊन दाखल झालों आहे.

**धन०:**--अहाहा परमेश्वरा, धन्य आहे तुझ्या अतर्क्य लीलेची! महाराज, मी हें विश्वसनीय समजूं काय?

**विक्र०:**–[ स्वगत ] असें विचारण्यांत याचा हेतू काय असेल बरें? [ उघड ] महाराज, माझी जिव्हा आजपर्यंत कधींच असत्य बोलण्यास धजली नाहीं.

**धन०:**–बरें, आपला विवाह झालेला आहे काय?

**विक्र०:**– [ स्वगत ] आतां समजलों; हरकत नाहीं. मग याला बरें वाटेल, असेंच सांगावें. [ उघड ] विवाह झालेला आहे; पण सध्यां झाला न झाला, सारखाच आहे; कारण मात्र मी आतां सांगणार नाहीं.

**धन०:**--हरकत नाहीं. [ स्वगत ] याचेविषयीं खात्री पटण्याकरितां चंद्रसेन महाराजांकडून बारीक रीतीनें तपास करवावा, आणि हा दिसतो, तसा खराच लायक ठरल्यास परमेश्वरानेंच माझें गाऱ्हाणें ऐकलें ह्मणायचें! अलोलिकेस अगदीं योग्य दिसतो. तेव्हां आतां याला तिचे नजरेसमोर ठेवला, ह्मणजे बरें. [ उघड ] महाराज आपण कांहीं काळजी करूं नये; मी येथील नवकोटनारायण सावकार असून रत्नपूराधिपति चंद्रसेन महाराजांचा धनको आहे. तर मी आपली आतां बरोबर सोय लावून देतों. मात्र धीर धरून माझेजवळ आपल्याला कांहीं दिवस राहिलें पाहिजे.

**विक्र०:**--ठीक आहे; काय दैवयोग असेल तसें होईल. [ स्वगत ) आजपर्यंत रत्नपूरांतील धनशेट नवकोटनारायण ऐकत होतों; तों आज त्याचेकडून पाहूण-चार घेण्याचा प्रसंग आला आहे! काय काय खेळ व्हावयाचे आहेत, शनी-देवच जाणे!

**धन०:**--मग चला तर सरदार साहेब, आपण आतां स्वस्थ चित्तानें माझे वाड्यांत विश्रांती घ्यावी. हळूंहळूं सर्व कांहीं जमेल.

**विक्रमा०:**--चलावे महाराज. [जातात ]

---

## प्रवेश ५ वा.

[ स्थळः—देवनंदेचा महाल ]

**देवनंदा:--** **२४ पद.** ( तिलक—कामोद )

**गगनींचा तेजोमणि हंस तमिं बुडाला ॥ भीषणता भूला ॥ ध्रु० ॥**
**भगवति माते मनधरणीला, दारुण समयाला ॥ तारी दावुनि कुमुद–**
**बांधवा ने निज सदनाला ॥ १ ॥** ( मूर्छित पडते )

[ वासंतिका सुमंतासह येते. ]

**वासं०:**--महाराज, महाराणी सरकारची ही शोकमय अवस्था आपण समक्षच पहावी! मी शांतवन करण्याचे सर्व उपाय करून हरलें; आणि आपल्याला इकडे घेऊन आलें. आतां आपण तरी कांहीं पहावें.

**सुमंतः**-- ( स्वगत ) या सिंहिणीचें- बुद्धिमान् साम्राज्ञीचें शांतवन मी कोणत्या शब्दांनीं करूं ! ( उघड ) वासंतिके, हळूंच महाराज्ञींना मी आल्याची वर्दी दे बरें.

**वासं०ः**--( देवनंदेस ) बाईसाहेब, सुमंतांची स्वारी आपल्याकडे आलेली आहे.

**देव०**:--काय ग ? कांहीं बातमी का त्यांनीं आणली आहे ?

**वासं०**:--बाईसाहेब, नाहीं; दुसरें कांहीं काम आहे वाटतें.

**देव०**:--आण त्यांना इकडे. ( उभी राहते. )

**सुमंत**:--- ( हात जोडून ) मातोश्री, ( स्तब्ध उभा राहतो. )

**देव०ः**--कांहो सुमंत, तुह्मी असें स्तब्ध का ? कांहीं कटुतम वार्ता आहे कीं काय ? सांगा, सांगा; मला असें बुचकळ्यांत नका टाकूं !

**सुमंतः**--तसें कांहीं नाहीं मातोश्रीः सरकारचे शौर्य, धैर्यादि लोकोत्तर गुण सर्वत्र महशूरच आहेत. आणि शिवाय सांप्रत चारी बाजूला स्वार पिटाळून आणि परराज्यांतून गुप्त हेर पाठवून जारीनें तपास चालू आहे तेव्हां विनंती इतकीच कीं, आपण आतां असें शोकमग्न न होतां, सरकारस्वारी येईपावेतों आपल्या पुत्रवत् प्रजेचें परिपालन करावें. सरकार लवकरच येऊन भेटतील. मी सौदागरासंबंधीं अद्‌भूत प्रकार पाहिलेला सांगितला, तरी सरकारस्वारी कुठें तरी सुरक्षितच असेल.

**देव०ः**--प्रजेचें पालन करणें, राज्यकारभार चालवणें, राजकारण करणें, सुमंत, निर्जीव देहाकडून असलीं कार्यें कशीं पार पडणार ! माझीच उलट आपल्याला विनंती आहे,--

**सुमंतः**--मातोश्री आज्ञा करावी.

**देव०:**—सुमंत, शनी-देवतेच्या कोपाचा परिणाम साडेसात वर्षें निदान भोगावा लागेल, असें माझें ठाम मत आहे; तेव्हां तात्पुरती तरी नष्टैश्वर्य, निर्बल बनलेली देवनंदा आपल्याला विनंतीच करते कीं, आपण महाराजांचे पश्चात् बाल--युवराजांना त्यांचें ठिकाणीं समजून राज्य--कारभार कुशलतेनें चालवावा. महाराजांना आपल्या प्रामाणिकपणाबद्दल फार भरंवसा असे; तेव्हां आपणच त्यांचें प्रियकार्य करावें. मी मात्र आतां स्वैरिणीप्रमाणें,—

## २८ पद.

सोडुनि मंदिर शोधिन प्रियकर प्राण कुडीचा भूवरि आतां ||
प्रखरातप–शीत–जला–वाता सोशिन मोदें मी कार्य–रता ॥
धर्म सतीचा पाळुनि फिरतां, जरि भाग्यें मज यश ये हातां ॥
भोगिन इंद्राणीपद भुवनीं, वा स्वर्गीं सामोरी नाथा ॥ १ ॥

अंक २ रा समाप्त.

—:X:—

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

[ स्थळ:—दिवाणखाना ]

( चंद्रसेन आणि शंखनाद, पशुपति संवाद )

**शंख०:**—सरकारनी ही असली सोन्याची संधी मुळींच दवडूं नये ! यावेळीं उज्जनीमध्यें जो गोंधळ माजलेला आहे, त्यावरून मी तर खात्रीनें असेंच सांगतों कीं, परमेश्वराचा सरकार स्वारीला खास पाठिंबा आहे; आणि ह्मणूनच हे असले योगायोग वारंवार जुळून येतात ! मागें तरी विक्रमादित्य महाराज सरकार स्वारी-वर चाल करून आले खरें; पण अशाच कांहीं दैवी आपत्तीमुळें त्यांना परत फिरावें लागलें ! आतां सरकारचा थोडासा मुलूख गेला हें खरें; पण तो परत घ्यायलाच कीं काय ही नामी संधी वर्षाचें आंतच ईश्वरानें आणून दिलेली आहे ! तेव्हां सरकार स्वारीनें आतां मुळींच विलंब न लावतां, ताबडतोब उज्जनी-वर चाल करून जावें, एवढीच या नम्र सेवकाची प्रार्थना आहे.

**पशु०:**—( स्वगत ) हें वर्तमान ऐकून सरकारला अत्यानंद होईल, ही आमची कल्पना आतां सपशेल चुकीची ठरून उलट सरकारची मुद्रा अधिकाधिक क्रुद्धच होत आहेसें वाटतें ! आणि या शंखानें तर पुन्हां पुन्हां तेंच सांगण्याचा सपाटा चालविला आहे ! [ एकीकडे ] शंखनादा, अरे आपली सुवार्ता ऐकून सरकार तर उलट रागावलेलेच दिसतात; असें कां बरें !

**शंख:**— [ एकीकडे ] अरे मित्रा पशो ! सरकार रागावले नसून विचारांत गढून गेले, ह्मणून तसे दिसतात. एवढें कां तुला समजूं नये ! पशूच आहेस.

**पशु०:**— ( ” ) शंखनादा, पुरे कर तुझ्या अकलेचें प्रदर्शन ! आतां तरी जरा चूप बैस; शंख.

**चंद्र०:**—पशुपती, शंखनाद सांगतो ही हकीगत खरी आहे काय ?

**पशु०:**—हकीगत तर अक्षरशः खरी आहे, सरकार.

**चंद्र०:**—मग इतक्या गरबडीनें तुह्मांला इकडे येण्याचें कारण काय, तें तुला सांगतां येईल काय ?

**पशु०:**—[ स्वगत ] हं, हेंही कांहीं खोटें नाहीं ! आतां तिकडचें वर्तमान कोणी कळवावयाचें ! आतां सावरलें तर ठीक; नाहींतर डोकेंच उडायचें !

**शंख०:**— [ गरबडीनें ] इकडे येण्याचें कारण काय सरकार, आह्मां गरिबांना ह्मटले सरकारच्या चरणाचें दर्शन होईल, आणि एकदां मुलामाणसांची भेटही होईल.

**चंद्र०:**—चूप बेस मूर्खा, मी तुला विचारलें नाहीं; पशुपती, कारण सांगतोस कीं, कोतवालाचे ताव्यांत जातोस; बोल. मी तुला हुषार ह्मणून मुद्दाम या कामगिरीवर पाठविलें, आणि हा गाढवपणा करून परत आलास; तुला काय वाटलें ?

**पशु०:**—सरकारनीं जरा शांत व्हावें, ह्मणजे कारण सांगितलेलें बरोबर पटेल. मज गरिबावर सरकारची इतराजी होईल; असला मूर्खपणा मी कसा करीन ! तसें होईल, तर मी चतुर गुप्त हेराच्या कामाला लायकच नाहीं असें ठरणार !

**शंख०:**— (एकीकडे) ह हं, सांग पशुपती, चांगलें कारण सांग आणि सरकारची मर्जी अगदीं खुष करून सोड; तर खरी शिताफी.

**पशु०:**— (त्वेषानें) शंखनादा, एक शब्द माझेशीं बोलूं नकोस; तुझ्या मूर्खपणानेंच मला इकडे यावें लागलें, आणि आज हे असले शब्द सरकारचें तोंडून ऐकून घ्यावें लागलें.

**चंद्र०**:--पशुपती, तो तर बोलून चालून शंखच आहे; पण तुझीच शिफारस ह्मणून त्याला तुजबरोबर पाठविलें. मग आतां त्याला दोष दिल्यानें तुझी सुटका होईल असें तुला वाटतें काय?

**शंख०**:--सरकार, असलें हें अकांड--तांडव करण्याची त्याला नेहमींचीच संवय आहे.

**चंद्र०**:--[ मोठ्यानें ] कोण आहे रे तिकडे (सशस्त्र शिपाई येतात.) या मूर्खाला नेऊन कोतवालाचें स्वाधीन करा; आणि याला सध्यां नजरकैदेंत ठेवण्या-विषयीं सांगा.

**शंख०**:-- ( मोठ्यानें ) पशुपती, मला तर सरदारी मिळाली ! आतां तुलाही तुझें प्रमाणानें मिळेल, हाच माझा तुला शेवटचा आशिर्वाद ! नीच पशो, माझे-वर एकदम असा उलटलास काय ? पण जंबुका, तुलाही या निंद्य सेवेचें फळ असेंच कांहींतरी मिळणार, हाच परमेश्वराच्या दरबारांतील न्याय आहे ! राम राम. ( त्याला नेतात )

**पशु०**:--सरकार, ह्या मूर्खाच्या संगतीचा मला तिथें फार त्रास होऊं लागला, आणि ह्मणून मला ह्याला घेऊन इकडे यावें लागलें. तेथील दरबारांत प्रवेश करून घेण्याला याचे खणखणीत आवाजाचा चांगला उपयोग होईल, ह्या हेतूनें सरकारजवळ याची शिफारस करून प्रथम याला बरोबर घेतलें खरें; परंतु तिथें ह्या केव्हां कोठें काय बोलेल, याचा कांहींच नियम नसल्यामुळें मला याची नेहमीं फार भिती वाटूं लागली; आणि यासाठीं त्याला जपून इकडे आणून सोडावें, या कारणानें बरोबर घेऊन आलों. यांत सरकारची भेट अनायासें होऊन पुढील गोष्टीविषयीं कांहीं आज्ञाही घ्याव्यात, हाही हेतू होताच. सरकारजवळ प्रतिज्ञेवर सांगतों कीं मी पुन्हां एका साथीदारासह बरोबर त्या दरबारांत प्रवेश करून घेईन, तरच नांवाचा पशुपती; नाहींतर तिकडेच या देहाचा शेवट होईल!

**चंद्र०:**—ठीक आहे, पण पुन्हां आतां साथिदार मात्र नीट पाहून घेऊन युक्तिप्रयुक्तिनें विक्रमादित्याचे दरबारांत प्रवेश करून घे. मध्यंतरी जर कांहीं मला दगा देण्याचें मनांत आणलेंस, तर ध्यानांत ठेव, तुझीं बायकापोरें आणि मालमत्ता इकडे माझ्रे राज्यांत आहे.

**पशु०:**—सरकारनी ही शंकाच घेऊं नये. आणि इतक्यावर स्वतःचीं बायकापोरें कोणाला नकोशीं होतील ! पशुपतीचा उज्जनींतील दरबारांत प्रवेश होण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं.

———:×*×:———

## प्रवेश २ रा.

[ स्थळ:--जंगलरस्ता—शनी, सारथी प्रवेश करितात ]

**शनी:**—जशीं कर्मे, तशीं फळें; विषवृक्षास आम्रफल लागणें केव्हांहि शक्य नाहीं. आणि तात्पुरतें कदाचित् लागलेलें दिसलें, तरी तें परिणामीं विषकारकच असणार. या भूमितलावर सर्व प्राणीमात्र कामक्रोधादि षड्रिपूनीं थोडे बहुत ग्रासलेले दिसतातच. सुखसंपादन करण्याचा राजमार्ग सोडून तें अन्य कुमार्गांनींच मिळविण्याचा प्रयत्न करितात; आणि शेवटीं त्यांना सुखोपभोगाऐवजीं दुःखोपभोगच भोगण्याचा प्रसंग येतो. कोणी निंदा चहाडी करण्यांत पुरुषार्थ मानतो; कुणी दुरभिमान, गर्व यांनींच फुगलेला दिसतो; कोणी द्वेष मत्सरादि दुर्गुणांनीं ग्रासलेला असतो; तर कुणी विश्वासघात, अधमपणा करण्याच्या विचारांतच गर्क असतो. सारांश, जो पहावा तो पापकर्माचे घडे भरण्यांत गुंग झालेला आहे. आणि याचें अंतिम साध्य काय, तर स्वतःची बडेजावी ! परंतु, या

दुर्गुणप्रिय मानवांच्या लक्षांत हें त्रिकालाबाधित सत्य रहात नाहीं कीं, यापासून सुखप्राप्ति नसून, हे अधोगतीचे राजमार्ग आहेत. मनुष्य आपल्या दुष्कर्मांनीं आपल्याला क्षणोक्षणीं बद्धच करून घेत आहे. आणि ' प्रारब्ध कर्मणां भोगादेव क्षयः ' हा परमात्म्याचा कायदा त्याला त्याचे दुष्परिणाम दाखविल्यावांचून कदापि रहात नाहीं ! विक्रमादित्यासारखा सर्वगुणसंपन्न सार्वभौम राजा, कीं, जो आपल्या सद्गुणांनीं प्रत्यक्ष आपल्या शत्रूलाही वश करून घेतो; परंतु तोही एकचवार या निंद्य दुर्गुणाला बळी पडला असतां, त्याला कशीं फळें भोगावीं लागतात; हें या मानवांना कृतीनेंच दाखविलें पाहिजे. ( सारथी येतो. ) सूता, काय हकिगत आहे ?

**सारथीः**—महाराज, आज्ञेप्रमाणें विक्रमादित्य हल्लीं रत्नपूरांत धनशेटाकडे आलेला असून तो आतां विषयासक्त पद्मसेनेच्या दृष्टिटप्प्यांत येईल, अशी व्यवस्था झाली आहे. त्याचप्रमाणें हेरकर्म करणाऱ्या शंखनाद, पशुपती जोडीपैकीं शंखनादास सांप्रत साधा कारागृहवास प्राप्त झालाच आहे; आणि आतां पशुपतीची पुन्हां उज्जनीकडे रवानगी झालेली आहे.

**शनीः**—ठीक आहे, शंखनाद हाडाचा तितका दुष्ट नसल्यामुळें त्याला नजरकैदेची साधी शिक्षा झाली, हेंच बस्स् आहे. आतां पशुपतीच्या समाचाराला मात्र तुला गेले पाहिजे. कारण त्या दुष्टबुद्धि पशूच्या प्रयत्नास कांहीं फळ येण्यापूर्वींच त्याचा नायनाट झाला पाहिजे ! याकरितां त्याचा साथीदार ह्मणून आतां तूं जा; आणि त्याला आपल्या कृतकर्माचें प्रायश्चित्त देऊन, साध्वी देवनंदा विक्रमादित्याचे शोधाकरितां निघेल, तिचें संरक्षण कर. मी इकडे विक्रमादित्याची व्यवस्था करितो.

**सारथीः**--पण महाराज, पशुपती आपली नेहमीं मनःपूर्वक आराधना करीत असतो.

**शनीः**—सूता, तसें जरी असलें तरी—

## २६ पद. (कृष्ण गुरु जसा०)

भक्ति प्रिय न हो, शुद्ध न ती, ईशाला ॥ सुगुण, सदाचारा,
इष्ट नसे भक्ताला ॥ ध्रु० ॥
पूज्य ह्मणोनी मस्तकीं नमिला ॥ आचरि व्रत जें
अप्रिय त्याला ॥ १ ॥

परमेशाची भक्ति करून, त्याला अप्रिय अशीं कार्यें करण्यानें, तो कधींही संतुष्ट होत नाहीं. उलटपक्षीं सन्मार्गवर्तनानेंच परमात्मा लवकर साध्य होणारा आहे. तेव्हां पशुपतीला त्याच्या निंद्य आचरणाचें योग्य फळ मिळालेंच पाहिजे. दुर्जनांस शिक्षा आणि सुजनांस मदत हेंच ईश्वराचें प्रियकार्य आहे.

**सारथी:**—मग आज्ञेप्रमाणें व्यवस्था करण्यास जातो महाराज.

**शनी:**--ठीक आहे, जा; मात्र हें सदोदीत ध्यानांत असूं दे—

## २७ पद. (उग्रमुख बहु०)

कार्य-वश हो न कधिं शासितां दुर्जनां ॥
कंटकें कंटका काढि हस्ताविना ॥ ध्रु० ॥
झिजवी तनु ही सुजन-कार्यीं सदा ॥
श्रेष्ठ नच भूवरि अन्य सुजनाविना ॥ १ ॥

---

## प्रवेश ३ रा.

[ स्थळ:--रस्ता--पशुपती ]

**पशु०:**--' मनसा चिंतितं कार्यं, दैवमन्यत्र चिंतयेत् ' मनांत होतें काय,

आणि झालें काय ! मोठ्या उत्कंठेनें रत्नपुरास गेलों, -जातांना हर्षभरानें क्षणोक्षणीं माझें मन उचंबळून हळूंच आंतून सांगत असे कीं, पशुपती तुझें स्थितींत आतां रत्नपुरास गेल्यावर अपूर्व स्थित्यंतर होणार ! तुझेवर चंद्रसेन महाराजांची पूर्ण कृपा होऊन तूं त्यांचे दरबारांतील एक कंठमणि सरदार होऊन बसणार ! पण दैवानें मध्येंच कच खाल्ली ! ( विचार करून ) मीं जरा या कामीं उतावळेपणा केला, हेंच चुकलें. असो; पुन्हां चंद्रसेन महाराजांची कशीतरी समजूत करून निघालों तर खरा; पण आतां उज्जनीस गेल्यावर बतावणी कशी करावी ! तिथून तर कोणालाही न कळवतां आह्मीं निघून आलों; आणि आतां बरोबर शंखनादही नाहीं. आणि आशेची निराशा झाल्यामुळें मन उदासीन होऊन, बरोबर कोणी साथीदार घेण्याचेंही मला भान राहिलें नाहीं!

[ सारथी पडद्याआड दवंडी पिटतो. ]

**सारथी**:--ऐका हो ऐका, सर्व लोकहो ऐका; सांप्रत् मालवाधिपतीचा सूड उगवण्याकरितां शनीमहाराजांची स्वारी पृथ्वीतलावर अवतीर्ण झालेली आहे. त्यांचा गुप्तरूपानें सर्वत्र संचार असतो. तरी निंदा, द्वेष, मत्सर, पापमूलक महत्वाकांक्षा, अधमपणा इत्यादि दुर्गुणांना वश होऊन कोणाचे हातून निंद्याचरण घडल्यास त्या प्राण्याला तात्काळ अतिभयंकर असा नरकवास भोगावा लागेल हो ऽऽऽऽ ( नगारा वाजवतो )

**पशु०**:--असली ही विलक्षण दवंडी पिटणारा हा कोण असावा बरें !

[ सारथी गळ्यांत नगारा अडकवून पुन्हां तेंच ह्मणत येतो. ]

**पशु०**:--अरे तूं कोण आहेस ? आणि असली ही दवंडी कोणाचे हुकमानें पिटतोस ?

**सारथीः**--अरे मी शनीमहाराजांचा एक सेवक आहे; आणि लोकांना पापकर्मांपासून परावृत्त करण्याकरितां स्वतःचे हुकमानें मी दवंडी पिटतो.

(नगारा वाजवतो)

**पशु०**:--अरे, तूं खरोखरच शनीमहाराजांचा सेवक आहेस काय ?

**सारथी**:--अरे, शहाण्याच्या कांद्या, मी सत्याचरणाची द्वाही फिरवीत असतांना मला असला प्रश्न करणारा तूं एक अकलेचा खंदक, नाहीं--नाहीं, मोठा समुद्र, नव्हें चुकलोंच, अफाट सागरच दिसतोस ! तुझ्या या प्रश्नावरून मीच खोटें बोललों असें झालें! (नगारा वाजवतो)

**पशु०**:--(स्वगत) अरे हा वेडा तर नाहीं ! (उघड) अरे, तुझें नांव काय ?

**सारथी**:--माझें नांव हें........ (नगारा वाजवतो) दुंदुभी.

**पशु०**:--(स्वगत) खास हा वेडा आहे ! (उघड) अरे, तुझी दवंडी या निर्जन प्रदेशांत कोण ऐकणार ?

**सारथी**:--(हंसून) एकूण तूं मनुष्य नाहींस तर ! डंका. (नगारा वाजवतो) बरें, तूं तरी असा निर्जन प्रदेशांत फिरणारा कोण आहेस ?

**पशु०**:—अरे, मी विक्रमादित्य महाराजांचा सेवक आहे. उज्जनींतून विक्रमादित्य महाराज नाहींसे झाल्यामुळें त्यांच्या शोधासाठीं मी असा फिरत आहे. (स्वगत) हीच बतावणी उज्जनीस गेल्यावर करावी; ह्मणजे भिती नाहीं. 'शोधासाठीं आडमार्गी रानावनांतून फिरत असतांना शंखनाद व्याघ्राचें भक्ष्यस्थानीं पडला; व मी बचावून परत आलों !' ठीक जुळलें; अगदीं अशीच बतावणी करावयाची ! ह्मणजे अनायासें स्वामिभक्तिही दिसेल; आणि एक पंथ दो काज ! (उघड) चल मित्रा, आपण एकमेकांचे सोबतीनें प्रवास करूं;

रस्त्यानें तूं तुझी दवंडी पिटवीत जा, आणि मी माझें स्वामिशोधनाचें कार्य करतों. अशा रीतीनें फिरत फिरत आपण उज्जनीस जाऊं. ( सारथी त्याचे गळ्यांत नगारा अडकवितो ) हं हं हें काय ?

**सारथी**:—अरे मित्रा, तुजजवळ आतां हा नगारा असूं दे. रस्त्यानें सारखा बडवीत चाललास ह्मणजे वाटेंत कुठें दऱ्याखोऱ्यांतून तुझा विक्रमादित्य महाराज असला, तर तो याचे ध्वनीनें तुझ्याकडे धांवत येईल ! असा या दुंदुभीचा विशेष गूण आहे ! अनायासें तुझ्या स्वामिशोधन कार्याला माझीही मदत.

**पशु०**:—नको बाबा, हा तुझेच गळ्यांत बरा शोभतो ! ( त्याचे गळ्यांत अडकवतो. )

**सारथी**:—बरें मित्रा, मी तुझ्या ह्मणण्याप्रमाणें जर उज्जनीस आलों, तर तिथें माझी खाण्यापिण्याची व्यवस्था काय ?

**पशु०**:—हल्लीं काय आहे ?

**सारथी**:—अरे रानावनांतून फळफळावळ खायला मिळते; आणि एखादे वेळीं तुझ्यासारखा मित्रही भेटतो.

**पशु०**:—एकंदरींत हा देह फुकटचेंच अन्नावर पोसला आहे ! बरें तिथें तुला कांहीं नोकरी सांगितली तर करशील कां ?

**सारथी**:—अगदीं इमानें इतबारें; बोल, काय नोकरी सांगतोस ? असलें एखादें दवंडी पिटण्याचें काम मला विशेष पसंत. आवाज अगदीं खणखणीत; या नगाऱ्याच्या आवाजावरही ताण ! आणि ह्मणूनच माझें नांव दुंदुभी. बोल, पिटवूं मघाचीच दवंडी ?

[ नगारा वाजवून त्या आवाजांत दवंडी ह्मणतो. ]

**पशु०:**—शाबास, शाबास; चल तर मित्रा, अगदीं योग्य काम देतों तुला; माझाच जोडीदार करतों म्हणजे झालें. चल.

**सारथी:**—चल मित्रा, [स्वगत] तुझ्यासाठींच तर हा सध्यांचा अवतार आहे!

[ जातात. ].

## प्रवेश ४ था.

[ स्थळ:—धनशेटाचा वाडा ]

**अलोलिका:**—बाबांच्या चिंतेचें सध्यां तरी निवारण झालें, हें बरें झालें. देव करो, आणि त्यांचा माझेविषयींचा सांप्रत् असलेला हेतू सिद्धीस जावो. बाबांच्या इच्छेप्रमाणें मलाही त्यांना वृद्धापकाळीं सोडून जाणें मुळींच आवडणार नाहीं. त्यापेक्षां सहस्रपटीनीं मला हाच मार्ग पसंत होईल.

### २८ पद.

**सुखवीन सदा मम दैवत ताता ॥ उपवरता वरि देह अतां**
**परि राहिन मी अविवाहिता ॥ ध्रु० ॥**
**वृद्धपणीं यष्टीसम मी, मज मानिति ते सुखसाधन प्राणा ॥**
**सेवुनि मी अधमाचरणा तरि होइन कां कुलहीन सुता ॥ १ ॥**

पण माझा दैवयोग हा आश्चर्यजनक योगायोग घडून आल्यामुळें, आतां तातसेवा घडून वैवाहिक सुख भोगण्याचाही दिसतो; मला वाटतें माझी मानसिक व्यथा त्या दयाघन प्रभूनें जाणून, हा दैवी गुण—तेजाचा मूर्तिमंत पुतळा घरबसल्या इथें आणून सोडला! बाबांच्या एकंदर शोधावरून विक्रमादित्य महाराज नाहींसे झाले, आणि त्यांचे शोधाकरितां बरेचसे सरदार बाहेर पडलेले असून

त्यापैकींच हे एक असावेत. आणि त्यांच्या स्वतःच्या सांगण्यावरून विक्रमादित्य महाराजांची अवकृपा झाल्यामुळें ते इकडे आलेले आहेत, असें बाबा ह्मणतात; पण याला कारण मला कांहींतरी हेंच दिसतें कीं, ही चंद्रसेन महाराजांची रत्नपूर राजधानी; ह्मणजे त्यांच्या शत्रूचें ठिकाण, ह्मणून ही सावधगिरी असावी! बाबांची तर याविषयीं मुळींच वाच्यता न करण्याबद्दल सर्वांना सक्त ताकीद आहे. तेव्हां माझाच तर्क खरा असला पाहिजे! कारण यांच्यासारखे मोहक गुण अंगीं असतांना विक्रमादित्य महाराजांची अवकृपा होणें शक्यच वाटत नाहीं. विक्रमादित्य महाराज तर गुणांचे चाहते ह्मणून जिकडे तिकडे प्रसिद्धी! तेव्हां मी तर ह्मणतें कीं, हे त्यांच्या विशेष प्रितींतले सरदार असावेत, ह्मणूनच इतक्या धिटाईनें यांनीं त्यांचेसाठीं मुद्दाम शत्रूचें राज्यांत प्रवेश करून घेतला! बाबासुद्धां हें जाणून असतील; आणि ह्मणूनच त्यांनीं चंद्रसेन महाराजांजवळ यांचेविषयीं कांहीं निराळीच माहिती सांगितली; कारण पद्मसेना यांना उज्जनींतले एक मुखवस्तु श्रीमान् समजत असून ती माझी नेहमीं यांचेविषयीं थट्टा करीत असते. पण वर्तन किती सभ्यतेचें! परमेश्वरा, ही मला जन्माची जोड मिळण्याइतकी मी भाग्यशाली आहे काय? ते तिटकारा दाखवीत असतांही पद्मसेना त्यांचेशीं लोंचटपणा करते, यामुळें त्यांचें मन माझेविषयीं मात्र कलुषित न होवो ह्मणजे झालें. (विचार करून) बाबांचा हेतू पण यांत साध्य कसा होणार, तें मला समजत नाहीं! कारण माझ्या समजुतीप्रमाणें हे जर विक्रमादित्य महाराजांचे प्रीतींतले सरदार असले, तर बाबांना माझा वियोगच होणार! पण त्यांनीं ज्याअर्थी बाबांना आशा लावलेली आहे, आणि बाबांचा हेतू ते जाणत असतीलच; त्याअर्थी बाबांची निराशा करण्यास ते सहसा धजणार नाहींत. त्यांचा पहिला विवाह झालेलाही मी घरांत ऐकतें! तेव्हां हा एकंदर काय घोंटाळा आहे हें मला कांहींच समजत नाहीं! माझ्यासारख्या ज्या कुलवती उपवर वधू असतील, त्यांची अशा कामांत मनाची फारच त्रेधा उडत असली पाहिजे! कारण त्यांना अशा बाबतींत कुणापाशींच कांहीं बोलतां येत नाहीं; उलट असा कांहीं विषय बोलण्यांत निघाला, तर तिथून मोठ्या नाखुषीनें निघून जावें लागतें.

## २९ पद. [ सांवरिया मन० ]

नव कुलिना बाला युवतीचा हा धर्म बिकट जगतांत ॥ ध्रु० ॥
लज्जा-विनयें शंकित मन हो मार्दव-जाच मनांत ॥ १ ॥

अगबाई तेच येत आहेत वाटतें इकडे ! आणि बरोबर बाबाही आहेत. (इकडे तिकडे पाहून) बरें झालें, आतां इथें कोणी नाहीं. मग इथें बाजूला उभी राहून काय बोलतात तें ऐकूं कां आतां ! म्हणजे कांहींतरी समजेल. पण नकोच बाई, बाबांना मी जर चुकून दिसलें, तर ते काय म्हणतील ! जावेंच इथून आतां. पापमूलक इच्छेच्या आधीन होणें केव्हांही बरें नाहीं.

(जाते)

[ विक्रमादित्य व मागून धनशेट असे येतात. ]

**विक्रमादित्यः--** (स्वगत)

## ३० पद. (चारा सोडुनिया० )

कांता शिशुसह ती ॥ प्रियजनही ॥ राज्या अंतरुनी मी ॥
पडलों या धार्मीं ॥ येवोनी ॥ वियोग साहिल कैसा ॥
सुकुमारी रमणी ॥ मत्करणी ॥ शासित विमला सुगुणी ॥१॥

**धन०:--**परदेर साहेब, मी आपल्याला कांहीं शंका विचारली, तर आपण तिचें मेहेरबानीनें मनापासून निरसन कराल काय ?

**विक्रमा०:--**महाराज, इंद्राच्या नंदनवनाशीं स्पर्धा करणाऱ्या आपल्या उद्यानांत मी अकल्पित रीतीनें गुन्हेगार म्हणून सांपडलों असतांना आणि माझे-विषयीं आपल्याला पूर्वीं कोणत्याही प्रकारची माहिती नसतांना आपण मला सन्मानपूर्वक आपल्या या वाड्यांत ठेवून घेतलेंत, आणि आजपर्यंत माझेशीं

ममतेनें वागून मला अत्यंत ऋणी करून ठेवलेंत! असें असतांना आपण मला असा याचक वृत्तीचा प्रश्न विचारण्यासारखा माझेकडून कांहीं प्रमाद घडलेला आपल्या केव्हां निदर्शनास आला आहे काय ?

**धन०:**—छे, छे, तसें मुळींच नाहीं; आपल्याला कदाचित् त्यापासून त्रास होईल, ह्मणून मी जरा भीत भीत तसें विचारलें; त्याबद्दल वाईट वाटण्याचें मुळींच कारण नाहीं.

**विक्रमा०:**—तरें मग आपणांला माझेकडून निरसन करून घेण्यासारखी शंका काय आहे ? [ स्वगत ] हे मला माझें पूर्वचरित्र तर विचारणार नाहींत ! तें विचारलें ह्मणजे मोठीच पंचाईत ! कारण अत्यादरपूर्वक यांनीं मला आजपर्यंत वागविलें, तेव्हां माझेकडून निदान यांचेशीं तरी प्राणांतीही असत्य भाषण होणार नाहीं. काय होईल तें होवो, सध्यां ग्रहदशा आहे खरी !

**धन०:**—शंका माझी इतकीच कीं,—

**३१ पद.** [ मांड मारवाडी–दादरा ]

**रम्य सदन इंद्रभवन जणुं वसलें रत्नपुरीं ॥ धृ० ॥**
**सुख–साधन विपुल, सिद्ध वचनिं तसे किंकरही ॥**
**स्थिति असतां काय व्यथा वसत हृदय–मंदिरीं ॥ १ ॥**

आपण इथें आल्यापासून मी पाहतों, नेहमीं आपण खिन्नवदन असतां ! कितीही व्यग्र मन असलें, तरी तें कांहीं काल तरी या स्थानीं प्रफुल्लीत व्हावें, अशा रीतीची निदान आपल्यापुरती तरी मी खास व्यवस्था ठेविली असतांना, त्याचा परिणाम आपले चर्येवर कधींच यशस्वी झालेला दिसला नाहीं ! अशी आपल्याला चिंता तरी कोणती आहे ? राजकीय बातमीसंबंधीं केव्हांही मी आजपर्यंत आपल्याशीं बोललों नाहीं ! आणि पुढेंही तत्संबंधीं विचारण्याची माझी इच्छा नाहीं. आणि त्याचप्रमाणें मी येथें सर्वांची आपले विषयीं उज्जनींतील एक श्रीमान् गृहस्थ ह्मणून समजूत करून दिली आहे. तेव्हां राजकारणसंबंधीं

अ. क्र. ... १००३
दि. ... आठवण

नाजूक विचार आपणांस जाचत असेल ह्मणावें, तर त्यास कांहीं आधार नाहीं. मी आपल्याशीं आजपर्यंत केव्हांही परकेपणा ठेवला नाहीं; व आपणही दिवसें-दिवस मला आणि माझे कुटुंबांतील मंडळींना आपले गुणांनीं अधिकाधिकच प्रिय होत आहां. आणि याचें पर्यवसान शेवटीं निकट प्रेमसंबंधांतच व्हावें, ही माझी इच्छा मीं अनेक वेळां पर्यायानें दर्शविली आहे. अशी स्थिती असतांना आपल्याला नेहमीं असें चिंताक्रांत असण्याचें कांहीं विशेष कारण आहे काय? आणि तसें तें असल्यास मला समजण्यासारखें आहे किंवा नाहीं? माझेकडून कांहीं उपाय होणेंसारखा असेल तर ठीक; आपली समाधान-वृत्ति पाहण्याची आह्मां सर्वांना फार उत्कंठा लागली आहे.

**विक्रमा०:**—महाराज, मी चिंताक्रांत असण्याचें कांहीं विशेष कारण असेल, तर तें अनेक गुंतागुंतीच्या विचारामुळें मनाचा झालेला गोंधळ, हें आहे! आज आपण अनायासें गोष्ट काढलीत, हें बरें झालें. कारण आपण ज्या हेतूनें मला इथें ठेवून घेतलेंत, तो सिद्धीस नेण्याला मी स्वतंत्र नाहीं. आणि ह्मणूनच मीं इथून जाणेंसंबंधीं एक दोन वेळां गोष्ट काढली; पण त्यापासून आपल्याला फारच वाईट वाटलेलें दिसलें, त्यामुळें नाइलाज झाला. आपलें माझेशीं असलेल्या सरळ वर्तनामुळें, केव्हांही आपल्याला दुखवणें माझे फारच जिवावर येतें. आपले मनाचा थोरपणा प्रत्यहीं मला चित्ताकर्षक होतो. राजकीय बाबींसंबंधीं आपण बोलत नाहीं, हें आपल्या दैवी स्वभावाला अनुरूपच आहे. परंतु मी खिन्नवदन असण्याचें खरें कारण तें नसून खाजगी गोष्टीच आहेत.

**३२ पद.** (आज शाम मोहि०)

देहाची स्वामिनि या सुशिल गुणी प्रिय ललना ॥
कुलललाम लीलाप्रिय मंजु बाल विरह मना ॥ध्रु०॥
अंतरलों सहवासा श्रेष्ठ अशा प्रिय जनां ॥
सुखद हेतु अपुला परि स्मृति खिन्नवि या वदना ॥१॥

महाराज, प्रथम विवाहानें हा देह एका श्रेष्ठ साध्वीशीं वचनबद्ध झालेला आहे. प्रथमदर्शनीं मी आपल्याशीं स्वभावधर्म न जाणतां कांहींतरी बोललों, याचा मला आतां पश्चात्ताप होत आहे. आपला हेतू सिद्धीस नेणें सर्वस्वी माझ्या सहधर्मचारिणी अर्धांगीवर अवलंबून आहे. महाराज, असें निराश होऊं नका. आपलें सर्व अभिष्ट चिंतन आतां मजकडे लागलें. आपली कन्या सुस्वरूप असून सद्गुण-संपन्नही असल्याबद्दल माझें मनाची खात्री झाली आहे. तेव्हां आपले इच्छेप्रमाणें सर्व कार्य करणें आतां मजकडे लागलें. आतां आपण अगदीं बेफिकीर राहून मला रजा मात्र द्यावी; माझेकडून अद्याप कोणाचीही कधीं निराशा झालेली नाहीं.

**धन०:**—सरदारसाहेब, माझें अंतःकरणाची अत्यंत नाजूक बनलेली स्थिती मी कोणत्या शद्बांनीं आपल्याला बोलून दाखवूं ! एकुलती एक स्वतःचे प्राणा-पेक्षांही प्रिय अशी लाडकी कन्या, तिचें जर मनासारखें कल्याण झालेलें या नेत्रांनीं आतां वृद्धापकाळीं पाहिलें, तरच हा तुष्टात्मा होऊन शांतपणें देह ठेवणार; नाहींतर हाय हाय करीतच शेवट होणार ! सरदारसाहेब माझेविषयीं जर आपल्याला कांहीं सहानुभूती वाटत असेल, तर आपणच तिला पदरांत घेऊन मला कृतार्थ करावें, एवढीच या अभाग्याची आपलेजवळ याचना आहे. आपलेखेरीज माझ्या अलौलिकेस अनुरूप वर या भूमंडळावर विधात्यानें दुसरा खास निर्माण केलेला नाहीं. सरदारसाहेब मी आपले अर्धांगींना विनंती करून अनुमति मिळवीन; आणि वाटल्यास मी आपलेजवळ उज्जनीस येऊन राहीन; पण आपण या माझे इच्छेचा भंग करूं नये. सरदारसाहेब, आपला उज्जनींतील पत्ता मला सांगा; मी समक्ष जाऊन आपले मंडळींना इथें आणून आपल्याला भेटवतो, परंतु आपण आतां मला सोडून जाण्याची मुळीं गोष्टच काढूं नये.

**विक्रमा०:**— (स्वगत) ही तर बिकट परिस्थिती झाली ! शनी महाराजांनीं हा चांगलाच फांसा टाकला ! आतां एकपत्नीव्रत साधावें कां कृतज्ञताबुद्धि कायम राखावी ! प्रभो, या अवघड कूटांतून आतां आपणच या पामराची मुक्तता

करावी. हा अपराधी आपल्याला अनन्य भावानें शरण आहे. ( उघड ) महाराज आपण मला सोडूं इच्छीत नाहीं तर कांहीं काल थांबावें; ह्मणजे तरी याला कांहीं तोड निघेल.

**धन०:**—कांहींही करा, पण माझ्या अलौलिकेचें पाणग्रिहण करून या अलोट संपत्तीचे धनी व्हा. परमेश्वर आपणांस सद्बुद्धि देवो, चला.

( जातात. )

———:+:———

## प्रवेश ५ वा.

### [ स्थळ:--उज्जनींतील विक्रमादित्याचें राजमंदीर ]

**सुमंत:**— ( स्वगत ) संकट परंपरा एकदां सुरूं झाली, ह्मणजे एका मागून एक नवीं नवीं संकटें निर्माण होतच जातात ! राजाच्या साडेसातीचे अनिष्ट परिणाम सर्व राज्याला भोगणें भाग असतें ! आपल्या निरुपम सद्गुणांनीं जगप्रिय झालेले विक्रमादित्य महाराज ग्रहराज शनी देवतेच्या कोपाला बळी पडल्यानें या रामराज्यावर आतां काय काय संकटें ओढवणार आहेत, याची कल्पना मुळींच होत नाहीं ! संग्राम—केसरी विक्रमादित्य महाराजांच्या सार्वभौमत्वाची मर्यादा रत्नपूराधिपती चंद्रसेनाचें राज्यापर्यंत गेलेली; परंतु अधोगतीस सुरवात झाल्यामुळें चंद्रसेनानें आपले सरहद्दीवर पुंडावा माजवून त्याचा या राज्यांत सामील झालेला सर्व मुलूख त्यानें परत घेतला; आणि आतां या राज्यांतही शिरल्याची बातमी नुकतीच आली ! अशा प्रसंगीं राज्यकारभार चालविणें किती धोक्याचें आहे, याची कल्पना शब्दचित्रांनीं होऊं शकणार नाहीं ! या प्रसंगीं आतां धारा नगरींचे विजयसेन महाराज केव्हां एकदां येऊन राज्यकारभाराचीं सुत्रें आपल्या हातीं घेतात, असें मला झालें आहे. येथल्या बहुतेक सैन्याची रवानगी अगाऊ झालेलीच आहे; आतां कांहीं निवडक सैन्य राहिलें, त्यापैकीं कांहीं महाराज्ञी स्वत: महाराजांचे शोधाकरितां निघणार, त्यांना द्यावें लागेल. ( विचार करून )

महाराजांचा तपास इतका कसून चालला आहे, पण महाराज्ञी स्वतः बाहेर पडण्याचा आपला हट्ट कांहीं केल्या सोडीत नाहींत ! अशा प्रसंगीं सर्व बाजूंनीं यश मिळणें दैवाधीन आहे. साम्राज्ञींचे वडील विजयसेन महाराज माझे विनंतीवरून येथें येणार आहेत, हें अद्याप कोणाला माहीत नाहीं. ते एकदां येथें येऊन दाखल झाले, ह्मणजे या सर्व जबाबदारींतून माझी सुटका होईल. (बाजूला पाहून) ठीक, ही वासंतिका बोलावण्याप्रमाणें इकडे आलीच. आतां इच्चेकडून महाराज्ञींचा सर्व बेत समजून घ्यावा; आणि एकंदर रंग पाहून योग्य वाटल्यास विजयसेन महाराजांच्या लवकरच होणाऱ्या आगमनाची बातमी महाराज्ञींना द्यावी. (वासंतिका येते.) वासंतिके, महाराज्ञींचा निश्चय अजूनही कायम आहेना ?

**वासं०:**—होय महाराज, आतां जवळ जवळ कायमच ह्मणायचा; कारण मधून मधून बाल युवराजांचा त्यांना मोह पडतो; पण अखेर नाथ विरहाचाच जोर अधिक होणार, असें दिसतें ! राणी साहेबांनीं आतां लवकरच निघण्याचा आपला बेत मला इतक्यांत सुचवला. त्यांचा तर्क असा आहे कीं, इथली ही हकिगत धारा नगरीस पोंचून विजयसेन महाराज आतां लवकरच येथें येतील; तेव्हां ते येण्यापूर्वीच आपण गेले पाहिजे, असें त्यांचें ह्मणणें आहे. त्या ह्मणतात, मी आशा स्थितींत बाबांना मुळींच दिसणार नाहीं ! तेव्हां आतां बेत कायम झाल्यासारखाच आहे.

**सुमंत:**— (स्वगत) महाराज्ञींच्या तर्काचीही कमाल झाली ! आतां ताबडतोब स्वार पिटाळून विजयसेन महाराज शक्य तितक्या लवकर येथें येऊन दाखल होतील, असें केलें पाहिजे. नाहींतर त्यांचेसमोर सर्वस्वी दोषी ह्मणूनच मला उभें राहिलें पाहिजे ! (उघड) वासंतिके, तूं आपली शिकस्त करून महाराज्ञींना कांहीं काल थांबवशील तर या सुमंताची आतां प्रतिष्ठा राहणार आहे. तूं महाराज्ञींच्या विशेष सलगीतली आहेस, तेव्हां या वृद्ध सुमंताच्या सांगण्याला मान देऊन एवढी कामगिरी करच.

**वासं०:**–(हात जोडून) महाराज, आपले आज्ञेबाहेर मी केव्हांही जाणार नाहीं. माझेबरोबर आपणही राणीसाहेबांचे महालाकडे चलावे, आणि तेथें माझी शिकस्त झाल्यावर आपण स्वतः कांहीं सांगून पहावें, कारण त्या एकदां बोलूं लागल्या म्हणजे मी अगदीं वचनमूढ होऊन माझेकडून त्यांचेसमोर जास्त कांहीं बोलवतच नाहीं! त्यांनीं मला आतां बाल–युवराजांना घेऊन येण्याविषयीं सांगितलें आहे; तेव्हां मी त्यांना घेऊन तिकडेच जाते. आपणही जवळपासच असावें, म्हणजे वेळ येतांच मीं बोलावून घेते.

[ देवनंदेचा महाल. ]

**देवनंदाः—** **३३ पद.** (धृपद–चौताल)

**विरहव्याकुल नाथ असतिल संकटीं दुर्गम कशा? ॥**
**गुप्त वासीं छळिसि ईशा विपिनिं अथवा घोरशा? ॥**
**मन तरंगीं भंग पावे, नाथसुखरत जीव हा ॥**
**इष्ट तरि ने अर्धभागी नाथनिकटीं छलवशा ॥ १ ॥**

शनीमहाराज, या कलीकालांत प्रत्यही सृष्टीमध्यें असंख्य पातकें मानवजातीकडून घडत असतील! त्या मानानें माझे नाथ सत्ययुगांतीलच ठरतील, पण त्यांचेकडून आपलें ऐकल्याबरोबर साहाजिक जरा चमत्कारिक वाटणारें चरित्र ऐकून निंदाव्यंजक दोन शब्द निघाले; तोंच आपलें साक्षात् दर्शन होतांच त्यांनीं आपले चरणीं या अर्धांगीसह लीन होऊन अपराधाची क्षमा मागितली. आणि तेव्हांपासून सतत सर्व राजनिष्ठ प्रजेसह आम्हीं आपली अनन्यभावें आराधना करीत असूनही या दीन पामरांवर आपला इतका असह्य रोष कायम असावा, हें आमचें दुर्भाग्यच म्हणायचें! शनीराज, आपले शांतिसाठीं काय झालें पाहिजे, हें या दीन कन्येला दर्शन देऊन कळविलेंत, तर ही तसें तात्काल करून आपला प्रलय–कोप शांत करील. मालवधिपतींच्या या दीन धर्मपत्नीचा आपण बलीही मागितला, तरी ही आनंदानें तयार होईल. पण नाथावरील आपला कोप शांत

होऊन त्यांना आपण सुखी करावें. महाराज, या विरहव्याकुल दीन दासीचा आर्त स्वर आपलें अंतःकरणाला दयेचा पाझर फोडील काय? ('आई' ह्मणून मधून हांक येते) अगबाई, माझा बाळ आला वाटतें. सोन्या ये रे.

[युवराज येऊन मिठी मारतो.]

**युवराजः**--आई, महाराज अझून कसे ग येत नाहींत? तूं ह्मणाली होतीस ना, लवकरच येतील ह्मणून?

**देव०ः**--हो बाळा; पण अझून आले नाहींत.

**युव०ः**--आई, मला वाटतें, ते किनई परभारेच लढाईवर गेले असतील! तिकडे कुठें लढाई सुरू झाली आहे, असें सुमंत सांगत होते ना? तिकडेच त असतील. चल, आपण त्यांना जाऊन भेटूं; ह्मणजे त्यांना आश्चर्य वाटेल! ते नाहीं आपल्याला घेऊन गेले, तर आपणच जाऊं.

**देव०ः**--पण बाळा, ते तेथें नाहींत! नाहींतर आपण केव्हांच गेलों असतो.

**युव०ः**--मग ते कुठें ग गेले असतील?

**देव०ः**--तेंच पहायला मी जाणार आहे बाळ. मी लवकरच त्यांना घेऊन येते. तोंपर्यंत तूं येथें आनंदानें राहशील ना? धारा नगरीहून आतां बाबा, आई येतील, तेव्हां तूं राहशील ना त्यांचेजवळ? मी त्यांना घेऊन येते.

**युव०ः**--आई, मी येथें एकटा कसा राहूं? मलाही घेऊन चल बरोबर; ह्मणजे तुझ्याबरोबर मलाही महाराज भेटतील.

**वासं०ः**--बालमहाराज, येथेंही कोणीं पाहिजेना? तुह्मांला राजा व्हायची हौस आहे; मग आतां महाराज येईपर्यंत तुह्मी येथें राज्य चालवा ना?

**देव०ः**--होशील ना बाळ राजा? मग आह्मी येऊन भेटूं या बालराजाला!

**युव०ः**--मी तुमच्यामागें नाहीं होत राजा. आई, मी तुझ्याबरोबर येईन नाहींतर मला असें कांहींतरी सांगून तूंही महाराजांच्यासारखी जाशील. महाराज

सुद्धां ह्मणाले होते– ‘ तूं जा पुढें; मी असाच एक घोडा घेऊन येतो. ’ –आणि जे गेले, ते अद्यून येत आहेत ! तूं जर मला असें कांहीं सांगून एकटे टाकून गेलीस, तर मग मी तुमच्याशीं कधीं बोलणारच नाहीं ! आणि मीही केव्हांतरी तुह्मांला टाकून असाच जाईन. आई, नाहीं ना तूं मला एकटा टाकून जाणार ? मला घेऊन चल बरोबर; मी तुला त्रास नाहीं देणार.

**देव०**:--बाळा, कसें रे तुझें हें हृदयद्रावी दीनवाणी भाषण.

### ३४ पद.

**काळिज मम चरचरतें, बाळा ॥ हृदयीं तिळ तिळ तुटतें, बाळा ॥ध्रु०॥**
**केसरिच्या छाव्या तूं ऐसा ॥ वाणी कैसा ॥ वदसि दीनसा ॥**
**दुःखद हो ही मजला, बाळा ॥ १ ॥**

**युव०**:--आई, किती ग रडतेस ?

**देव०**:--बाळ, मला वेळीं अवेळीं रानावनांतून हिंडावें लागेल; तेव्हां माझ्या सुकुमार सोन्याला तो भयंकर ताप सहन होणार नाहीं; ह्मणून मी बरोबर नेत नाहीं. माझ्या छकुल्याचा मला कधीं त्रास कां होणार आहे ! [ एकीकडे, वासंतिकेस ] वासंतिके, याची समजूत घालून जाणें फार कठीण आहे ! आणि तसेंच याला टाकून गेले, तर याच्या कोंवळ्या मनावर त्याचा फारच अनिष्ट परिणाम होईल ! तूं तरी याची कांहीं समजूत घालून पहा.

**वासं०**:--बाईसाहेब, मी कशी समजूत घालूं ? आपल्या या जाण्यापासून बालमहाराजांना त्रास होईलच. पण आणखीही कांहीं व्यक्तींना बरेंच दुःख होणार आहे !

**देव०**:--तें कांग ! आणि कोणांला दुःख होणार आहे ?

**वासं०**:--बाईसाहेब, धारानगरीहून आतां आपले वडील आणि मातोश्री येथें आल्यावर, त्यांना आपलीही भेट नाहीं ह्मणजे किती वाईट वाटेल ! तसेंच आपल्याला जाऊं कसें दिलें, ह्मणून कदाचित् वृद्ध सुमंतांना जाब देण्याचाही प्रसंग आईसाहेबांपुढें येईल ! ह्मणून ह्मणतें, जाणेंही अवघड; आणि राहण्यापासून

तर मनाला सदोदित तळमळ ! बाईसाहेब, मला वाटतें या कामीं वृद्ध सुमंतांच्या सल्ल्यानें चालणेंच बरें.

**देव०**:--वासंतिके, जाण्याला तूं दाखवितेस या अडचणी माझ्या मानसिक व्यथे-पुढें मला कांहींच वाटत नाहींत ! कारण मला अगदीं असें झालें आहे कीं,

३५ पद. ( घर्मबिंदुमाला० )

**स्वामिच्या ग पायां ॥ ही लोटिन कधिं काया ॥ ध्रु० ॥ सुतविरहा गिळुनि मनीं ॥ नाथ–शोध करिन वनीं ॥ विरहाकुल जाया, मी ॥१॥**

**युव०**:--आई, महाराजांच्या वियोगाचें तुला इतकें दुःख होतें ! आणि मग तूंही गेल्यावर मी मात्र तुमच्यावांचून येथें एकट्यानें राहावें; हें मला तूं कसें सांगतेस ? मला तुझेबरोबर घेऊन चल; ह्मणजे तुला रानावनांतून फिरण्याची जरूरच नाहीं. मी शूर सैनीक बरोबर घेऊन, वाटेल त्या भयंकर ठिकाणीं जाऊन महाराजांना आणीन. तुला अवघड ठिकाणीं फिरण्याची संवय कुठें आहे ? मी महाराजांचे बरोबर पुष्कळ फिरलों आहे ! आई, तूं मुळींच शोक करूं नकोस; मी पहा किती लवकर महाराजांना आणतों तें ! तूं येथेंच रहा पाहिजे तर.

**वासं**:-- ( स्वगत ) पोरवय, पण भाषण किती गोड ! किती झालें तरी अलौकिक महात्म्याचेंच बीज तें ! महाराज्ञी आतां यापुढें जास्त काय बोलणार ! [ उघड ] बाईसाहेब, मग सध्यां आपला जाण्याचा बेत रहीत करून धारानगरीहून आपली मंडळी आल्यावरच निघावें; ह्मणजे मग बालमहाराजांना आईसाहेब संभाळतील, स्वामिकार्यतत्पर सुमंतांनाही बरें वाटेल, आणि विजयसेन–महाराजांचे पोक्त विचारानें सर्वच ठीक होईल.

**देव०**:–वासंतिके, तुझा हेतू मी समजलें. आमच्या कल्याणाकरितां अहर्निश झटणारे आणि या गादीचा अभिमान बाळगणारे स्वामिभक्त वृद्ध सुमंत, त्यांना मी कधींही दुखवून जाणार नाहीं. त्यांची समजूत घालून त्यांच्या संमतीनेंच मी नाथ शोधासाठीं बाहेर निघेन; आणि तेंही मला साजेल, अशा योग्य तजविजीनेंच फिरेन. कोणाचाही दुर्लौकीक होईल, असें वर्तन माझेकडून कालत्रयीं

होणार नाहीं ! मी स्वच्छंदानें बाहेर पडतें, असें तुला वाटत असल्यास ती तुझी चुकीची समजूत आहे ! मला अशा विरहग्रस्त स्थितींत पाहून माझ्या प्रेमळ माता–पित्यांस किती वाईट वाटेल याची तुला कल्पना नाहीं ! माझ्या सुखासाठीं नाथांच्या लोकोत्तर गुणांवर लुब्ध होऊन आमची विवाहग्रंथीनें जन्माची गांठ घालून, नाथांचें मांडलिकत्वही बाबांनीं खुषीनें पत्करिलें; आणि नाथांनींही उदात्त बुद्धीनें तें मांडलिकत्व कबूल न करितां ते बाबांशीं वडील या नात्यानें आजपर्यंत अत्यंत सन्मानानें वागत आले ! तेव्हां त्यांनीं मला आतां अशा शोकाकुल स्थितींत पाहिलें, तर त्यांना अतोनात दुःख होईल ! त्यांनीं स्वतः कष्ट सोसून ज्या नरोत्तमाची गांठ घालून दिली, त्यांविरहीत शोकमालिन कन्येला पाहून त्यांचें दुःख द्विगुणित नाहीं कां होणार ? ह्मणून वासंतिके, ते येथें येण्यापूर्वींच मी निघण्याचा बेत करितें. त्यांच्या पवित्र चरणांचें दर्शन नाथांसह घेणेंच मला योग्य वाटतें. वासंतिके, सुमंतांना इकडे बोलावून आण; ह्मणजे मी त्यांचें बरोबर समाधान करून अनुमति घेतें. माझा हा बालराजा मात्र मला कशी परवानगी देईल ती देवो ! बाळा, तूं येथें राहशील, तर आईसाहेबांना कांहींतरी बरें वाटेल. नाहींतर त्यांनीं येथें कसे दिवस काढावे बरें ? त्यांच्यासाठीं तरी बाळा राहशील काय ?

**युव०**:–आई, तुला फारच वाईट वाटतें तर राहतों मी थोरल्या आईसाहेबा-साठीं येथें. जा तूं; मात्र अगदीं लवकर महाराजांना घेऊन ये. नाहींतर थोरल्या आईसाहेबांना घेऊन मी तुझ्याकडे येईन.

**देव०**:–बाळा येईन बरें, अगदीं लवकर येईन. मला तरी माझ्या सोन्यावांचून कसें करमेल ! वासंतिके, सुमंतांना बोलावणें पाठीव, ह्मणजे ते आल्यावर मी त्यांची संमती घेतें.

**वासं०**:--बाईसाहेब, ते केव्हांच या हेतूनें येथें आले असून पलिकडच्या दाल-नांत आपली वाट पहात आहेत !

**देव०**:–मग चल, तिकडेच जाऊं. (जातात)

———X:*:X———

## प्रवेश ६ वा.

[ स्थळः—चंद्रसेनाचा राजवाडा. ]

**पद्मसेनाः**—माझ्या ललाटरेषेंत काय काय आहे, हें तो विधाताच जाणे! जगामध्यें एकापेक्षां एक वरचढ अशीं सुंदर नररत्नें असतांना, पद्मसेने, तूं या विलासपूर्ण राजमंदिरांत यौवनाच्या नांवानें रडत बसावेस; तेव्हां धिक्कार असो तुझ्या निर्माल्यवत् जीविताला! माझ्या समवयस्क मैत्रिणी संसारसुखांत निमग्न झालेल्या पाहिल्या, म्हणजे माझें मदनपीडित अंतःकरणांत प्रबल विकारांचें प्रचंड काहूर माजतें! आणि देह सारखा प्रहरानुप्रहर तळमळत पडतो! अशा वेळीं माझी बाल-मैत्रिण नवकोटनारायणकन्या अलोलिका हिचीही तीच अवस्था समजून तिजकडे जावें, तर तिचा एखाद्या पोक्त स्त्रीप्रमाणें वेदांतच सुरूं होतो! वास्तविक तिची आणि माझी समान स्थिती असतांना आमच्या स्वभावधर्मांतच असें जमीन अस्मानाचें अंतर कां असावें, हें मला समजत नाहीं! मला वाटतें; तिलाही मजप्रमाणें असह्य मदनबाधा असेलच; पण ती दुसऱ्याला कळूं देत नाहीं, इतकेंच. ती आतां लवकरच विवाहीत होऊन, ज्याचेसाठीं माझें मनाला सध्यां चटका लागून राहिला आहे, त्याचेसह मजा मारूं लागेल; आणि मी राज-कुळांत जन्म घेऊन फाजिल उच्चकुलत्वामुळें अशीच तळमळत पडलें आहे. ( विचार करून ) पण मी तरी बाबांना दोष कां द्यावा; कारण त्यांची माझेसाठीं वरशोधनाची सारखी खटपट चालू असून केव्हांतरी विवाहीत होऊन मी माझ्या सर्व मैत्रिणीहून जास्त अशा अतुल सुख विलासांत लोळत राहणार! पण बाबांनीं उपस्थित केलेल्या लढाईमुळें मला कांहीं काल थांबलें पाहिजे. आणि माझी तर क्षणोक्षणीं वेड्यासारखी स्थिती होत आहे! पद्मसेने, तुझ्या जिवलग मैत्रिणीच्या भावी वराशीं, त्याच्या सौंदर्यावर मोहित होऊन, तूं चोरून लगट करण्याचा अनेक वेळां प्रयत्न केला असतां, त्यानें तुला झिडकारूनही त्याचेंच ध्यान तूं

सदोदित मनश्चक्षूपुढें चालवावेस, अशी त्याची तुला भुरळ कशी पडली! ( विचारमग्न होते ) पण छे, पद्मसेना ह्मणजे कांहीं यःकश्चित् खुळचट पोर नसून ती मानी राजकन्या आहे! आणि तिचा असला अपमान ती केव्हांही सहन करणार नाहीं. मी त्याला आतां इकडे बोलावून घेतलेच आहे; जर माझ्या मनासारखा वागला तर ठीक; नाहींतर ही खुनशी राजकन्या त्याचें नखही कोणाला दिसूं देणार नाहीं! बाबा आतां दोन दिवसांसाठीं येथें आले आहेत, तेव्हां मला जरा सावधगिरीनेंच वागलें पाहिजे. आणि या गुप्त कामीं माझे जे विश्वासू दासदासी आहेत, त्यांना बक्षिसें देऊन सदोदित खूष ठेवले पाहिजे.

( दासी येते. )

**दासीः**--बाईसाहेब, मसलत व्हावी तशी साध्य झाली नाहीं! त्या गृहस्थाला पुष्कळ सांगून पाहिलें कीं, सरकारस्वारीनें तुह्मांला असाल तसें बोलाविलें आहे. पण तो कांहीं केल्या येण्यास तयार होईना! मालकांच्या परवानगीवांचून मी येणार नाहीं, असें त्यांनीं निक्षून सांगितलें! तेव्हां ही बातमी आतां धनशेटजींना समजलीच. आतां आपल्याला कांहींतरी बंदोबस्त केला पाहिजे!

**पद्म०**:--वरून दिसण्यांत सुंदर आणि सरळ, पण गुणांनीं फारच बाई वांकडा आहे! ठीक आहे; पण तो आतां येईल ना?

**दासीः**--हो बाईसाहेब, आपल्या इसमाबरोबर तो आतां निघालाच असेल.

**पद्म०**:--पण कांग, तुह्मांला तेथें कोणीं पाहिलें नाहीं ना?

**दासीः**--छे बाईसाहेब; त्याविषयीं आह्मीं अगदीं खबरदारीनें वागलों.

**पद्म०**:--बरें तर; मी आतां गुप्त महालांतच जाऊन बसतें. तुह्मांला सांगून ठेवल्याप्रमाणें बरोबर खबरदारी घ्या.

**दासीः**--आज्ञा बाईसाहेब, ( जातात )

[ स्थळः—रस्ता विक्रमादित्य सेवकासह येतो. ]

**विक्रमा०:—** **३६ पद.** (तेचि पुरुष दैवाचे०)

**अरिमीलन जणुं वाटे ॥ नेणुनि रिपु अहि विवरीं भेटे ॥ ध्रु० ॥**
**संशयपीडित कां नृप झाला ॥ दावी अघटित कांहीं लीला ॥**
**ग्रहकोप न कां अजुनि निमाला ॥ ईशकृती ही, मति दाटे ॥ १ ॥**

आज चंद्रसेनानें मला इतक्या तांतडीनें बोलावण्याचें काय कारण असेल बरें! माझेविषयीं त्याला कांहीं संशय तर उत्पन्न झाला नसेल! कांहींही असो; मी केव्हांही तयारच आहे. माझी गुप्त कव्यार केव्हांही आपला प्रताप दाखविण्यास कमी करणार नाहीं! धनशेटांची परवानगी घेऊन निघालों तर खरा; आतां जें होणें तें होईल. बाकी चंद्रसेन, मी त्यांचा सन्माननीय पाहुणा ह्मणून कदाचित् दगा करूं शकणार नाहीं, हीही धनशेटांची उक्ती मला कांहीं अंशीं पटते. [थांबून] पण चंद्रसेन लढाई सोडून मध्येंच येथें कां आला असावा बरें? आपला कट्टा शत्रू विक्रमादित्य उज्जनींतून अस्तंगत झालेला पाहून मोठ्या उमेदीनें त्यानें लढाई सुरूं केली; आणि थोड्याच अवधींत या विक्रमादित्यानें त्याचा जिंकून घेतलेला सर्व मुलूख त्यानें परत आपल्या ताब्यांत घेतला. हें ऐकून माझ्या मनोवृत्ति रणसंग्रामाच्या उत्तुंग विचारलाटांनीं हेलकावे खाऊं लागल्या! परंतु माझे पूज्य श्वशूर विजयसेनमहाराज यांनीं तात्काल येऊन माझ्या शूर सैनिकांचें अधिपत्य स्वीकारिलें; आणि तेव्हांपासून चंद्रसेनाची सारखी पिछेहाट होत आहे. ही बातमी ऐकल्यापासून मात्र मी निश्चित झालों आहे. विजयसेन महाराजांची वृद्धापकाळींही स्वजनांसाठीं ही किती कार्यतत्परता! त्यांना आपले कन्येला विरहस्थितींत पाहून फारच दुःख होत असेल; पण मी एखाद्या अचेतन दगडाप्रमाणें या रत्नपूरांत खिळून राहिलों आहे! माझेकडून घडलेल्या अपराधाबद्दल शनीदेवतेचा कडकडाट झालेला पाहिल्यापासून या देहांतील सर्व शक्तींचें पार निर्मूलन झालें, असेंच मला वाटतें! माझें आजपर्यंतच्या भरभराटीनेंच मी अंध

बनून देवी शक्तीचाही उपहास करण्यासारखें घोर पातक माझे हातून घडलें असावें ! शनिराज, आपण या देहास कितीही यातना भोगण्यास लावल्या, तरी घडलेल्या अपराधाचें परिमार्जन केव्हांही होणार नाहीं. मोहवश ऐश्वर्याचा मी मनानें त्याग केलाच आहे, पण माझ्या सुकुमार साध्वीला मात्र मानसीक वेदना असह्य होत असतील, या विचारानें मी वारंवार मोहवश होतो. धनशेटांपुढें एकदां हृदय उकलून जाण्याची परवानगी मागावी, आणि माझे सैनिकांना मिळून प्रियतमेचीही गांठ ध्यावी, असे विचार मनांत येतात; परंतु दैवगती सांप्रत् अनुकूल नसल्यामुळें अंगीकृत कार्याचा कांहीं अनिष्टच परिणाम होईल, अशीही भीति वाटते ! त्यापेक्षां शनीदेवतेनें ठेविलें याच स्थितींत राहून काय काय होतें तें पहावें, हेंच बरें; असें वाटतें. त्या दयाघनाला पतिव्रतेची कांहीं कींव आल्यास, तोच सर्व इष्ट करील. ( जातात )

[ स्थळ:—गुप्तमहाल ]

**पद्मसेना:**--माझा बेत धनशेटांना समजला, तर मला या जगांत इतःपर तोंड दाखविण्यासही जागा राहणार नाहीं ! त्या तरुणाला या गुप्त महालांत आज मी वश करून घेईन, तरच ठीक; नाहींतर त्याला येथून जाऊं देणें मला फारच अपायकारक होईल ! यावेळीं बाबा इथें आले नसते, तर मी अगदीं निर्धास्त असते. पण ते येथें लढाई सोडून अकल्पित आल्यामुळें, माझे उरांत जरा धडकी भरल्यासारखें झालें आहे ! पण आज तो तरुण या ठिकाणीं मला वश झालाच पाहिजे, असें मला वाटतें. कारण राजैश्वर्यानें सुशोभित असा हा एकांतवासांत असणारा गुप्तमहाल; आणि त्यांत माझ्यासारखी नवयौवनसंपन्न सुंदर राजकन्या आपण होऊन विनवीत असतांना कोणता पुरुष तिला वश होणार नाहीं ! तसें न होईल तर मग त्यांत पुरुषार्थच नाहीं, असें ह्मटलें पाहिजे ! त्याला तेथें धनशेटांनीं मुद्दाम आपल्या प्रिय कन्येसाठीं आणून ठेविलें, ह्मणून कदाचित् माझेशीं त्याचें तसें बेपर्वाईचें वर्तन असेल ! पण आतां तो खात्रीनें मनमोकळा वागेल.

[ इकडे तिकडे पाहून ] अझून पण माझी दासी त्यांना येथें कशी आणीत नाहीं ! कां धनशेट स्वतःच त्यांना घेऊन बाबांकडे जातील! असें झालें तर मग मात्र माझे फजितीला पारावारच नाहीं ! इतका वेळ लागल्यामुळें माझें काळीज कसें अगदीं भीतीनें उडतें आहे. ( दासी येते. )

**दासी**:–बाईसाहेब, त्यांना इकडे आणूं ना ? ते बाहेरील दालनांत खोळंबले आहेत.

**पद्म०**:--असें कां; मग जा, आणि त्यांना इकडें पाठवून तूं बाहेर उभी रहा.

**दासी**:--आज्ञा, बाईसाहेब. ( जाते )

**पद्म०**:–एकंदरींत मला व्यर्थ भीति वाटत होती. आतां मी आनंदानें.........

[ विक्रमादित्य येतो. ]

**विक्रमा०**:-- ( आश्चर्यानें ) हा सर्व प्रकार राजकन्येचाच काय ?

**पद्म०**:–होय महाराज, आपल्या दर्शनासाठीं चातक पक्ष्याप्रमाणें उत्कंठेनें मार्गप्रतिक्षा करणारी ही आपली परिचीत राजकन्या पद्मसेनाच आहे. महाराज, माझे बाबा चंद्रसेनमहाराज यांचें नांवानें मींच माझे सेवक पाठवून आपल्याला गुप्तपणें येथें बोलावून घेतलें, याबद्दल आपल्याला आनंदच झाला ना ?

**विक्रमा०**:--पद्मसेने, तुझी काया अबलेची, पण अन्तःकरण मात्र एखाद्या उन्मत्त नराधमाला साजेल, असेंच आहे ! आजवर अशा गुप्त जागांतून कित्येक नराधमांनीं कुलस्त्रियांवर बलात्काराचा प्रयत्न केलेला मी ऐकला; परंतु आज मला हेंही समजलें कीं, तुझ्यासारखी नीतिमान् स्त्रीजात त्याचे उलट प्रकार करतांनाही भूतलावर आढळते ! पद्मसेने, तूं हें धाडस केलेंस, याबद्दल तुला कांहींच क्षिती वाटत नाहीं काय ?

**पद्म०**:--महाराज, केवळ नानाविध सुखोपभोगासाठीं परमेश्वरानें हा मानवदेह निर्माण केला; तेव्हां तो प्राप्त झाला असतांना मी माझे सुखासाठीं प्रयत्न करीत

असतांना आपण मला दूषण कां द्यावें! आजपर्यंत असलीं प्रेमकलें कितीक झालीं असतील, आणि पुढेंही होतील. देवलोकांतील धार्मिक ज्ञाते जनही जर या मोहाला बळी पडल्यावांचून राहिले नाहींत; अशीं आपण कैक उदाहरणें पुराणांतून ऐकतों. तेव्हां मी तर एक सुखविलासांत कालक्रमणा करणारी अजाण राजकुमारी! तेव्हां सहाजिक गुणधर्माला अनुसरून आपल्यावर माझें प्रेम बसलें, तर आपण तरी असला अनायासें साध्य झालेला सुवर्णयोग दवडून मला असा कर्णकटु उपदेश करण्याचा आंव कां आणावा? माझ्यासारख्या उपवर राजकन्येचें परपुरुषाला नखही दिसायचें नाहीं, ती मी आपल्याला वारंवार विनवीत असतांना हें असलें नीतीचें कांहींतरी थोतांड माजवून अमोल सुखाला पारखें व्हावें, याचें मला फारच आश्चर्य वाटतें! महाराज, आपल्याला तेथें कदाचित् संकोच वाटत असेल, म्हणून मी मुद्दाम आपल्याला या निवांत ठिकाणीं आणवलें, तरीही आपलें पूर्वीसारखेंच माझेशीं वर्तन कां असावें! आपण जसें हें अन्तःकरण आकर्षण करून घेतलें, तसें अशा अनुकूल परिस्थितींतही आपल्याला माझें कांहींच आकर्षण होत नाहीं, असें कसें होईल! महाराज, माझा असा अंत कां बरें पाहतां?

**विक्रमाः**--पद्मसेने, तुझें हें भाषण ऐकून मला तर तुझ्या स्त्रीत्वाची शंकाच येते! ही असल्या उज्वल प्रेमाची मूर्तिमंत पुतळी लाभली, म्हणूनच तुझ्या पित्याला नेहमीं अपयशाची गांठ पडत असली पाहिजे! पद्मसेने, तूं राजकुलांत जन्म घेतलास; पण तुझें वर्तन मात्र एखाद्या वारयोषितेला शोभेल, असेंच आहे! तुझें हें दिव्र्टें प्रेम आजपर्यंत कित्येक तरुणांना लाभलें असेल; आणि पुढेंही कित्येकांना लाभेल, पण माझेवर मात्र तुझें प्रेमाकर्षण मुळींच चालणार नाहीं, हें खास समज.

**पद्म०:**--महाराज, आपण माझें मन हिरावून घेतलें, म्हणूनच मी आपलें हें भाषण मुकाट्यानें ऐकून घेतें. नाहींतर असे शद्ब उच्चारणारी जिव्हां केव्हांच बाहेर खेचली गेली असती! महाराज, आपण मला समजतां, तशी ही पद्मसेना

चवचाल नसून आपल्या अलौकीक सुंदर तारुण्यावरच फक्त ही मोहीत झालेली आहे. माझ्या शुद्धाचरणाची आपणांला खात्री पाहिजे असल्यास मी आजन्म अविवाहीत राहीन; परंतु आपल्यावरचें प्रेम केव्हांही कमी होणार नाहीं. मी यौवनांत प्रवेश केल्यावर मला आपलें दर्शन झालें, आणि तेव्हांपासून मी आपलें यौवन आपणांला कायावाचामनेंकरून अर्पण केलें आहे; तेव्हां आपण मला आतां अशा दुरुत्तरांनीं व्यर्थ त्रास न देतां माझें मनाप्रमाणें वागावें, यांतच आपलें खरें हीत आहे. आपण उज्जनी सोडून आतां या रत्नपूरांतच पद्मसेनेचे प्रेमसर्वस्व होऊन राहावें. महाराज, मी माझें स्वतःचें प्रेमासाठीं दुसऱ्यावर प्रेम करण्यास मुळींच प्रतिबंध करीत नाहीं; उलट मी आपणांला असेंच सांगते कीं, आपण माझ्या प्रिय मैत्रिणीचा धनशेटांच्या एकुलत्या एक अलोलिकेचा स्वीकार करून अलोट संपत्तीचे धनी व्हावें; आणि या रत्नपूरांतच राहून एका रूपयौवनभर राजकन्येच्या समागमसुखांत आनंदानें कालक्रमणा करावी.

**विक्रमाः**--पद्मसेने, असल्या चोरट्या प्रेमांत धन्यता मानून राहणारा हपापलेला तरुण मला तूं समजूं नकोस. ज्यांच्या रूपगुणांपुढें तुझी काडीइतकीही किंमत नाहीं, असल्या अप्रतीम लावण्यवती ललना या अभाग्यासाठीं तळमळत आहेत; तिथें तुझ्यासारख्या मलीन प्रेमपुतळीच्या समागमांत मला सुख वाटणें शक्य आहे काय? पद्मसेने, तूं अलोलिकेला तुझी जिवलग मैत्रीण समजतेस, पण तिच्या एकाही गुणाची तुला सर येणार नाहीं! केवळ तिच्यासाठीं तिच्या पित्यानें मला सन्मानानें ठेवून घेतले असतांना, आजपर्यंत तिचें माझेशीं कधीं भाषणही नाहीं! आणि तुझ्या प्रेमाची चर्पटपंजरी मी येथें आल्यापासून सुरू झाली! पण हें लक्षांत असूं दे कीं,--

### ३७ पद. (मानत नाहीं लंगरवा०)

**कुलवधुगुणभूषणा विमुख जी॥वश तिज नरवर सूज्ञ न हो कधिं ॥ध्रु०॥**
**दांभिक प्रेमें सुख न जगतिं, परि हानि होत ॥ खर नरकाप्रति ती स्वकुल नेत ॥ १ ॥**

शालीनता हा स्त्रीचा मुख्य अलंकार आहे ! विनयवती स्त्री रूपानें कमी असतांही जितकी चित्ताकर्षक होते, तितकें चित्ताकर्षण तुझ्यासारख्या वाचाळ प्रेमपुतळीला पाहून मुळींच होत नाहीं ! पद्मसेने, तुझ्या या हिडिस प्रेमयाचनेचा स्वीकार तुझ्या जातीचाच एखादा तरुण करील; आणि त्यापासून तुला सुखही त्या योग्यतेचेंच मिळेल. माझेविषयीं मात्र तूं साफ आशा सोडावी, हेंच बरें; कारण निरुपम अशा मुग्ध प्रेमलीलांत सुख मानणारा हा प्राणी आहे. माझें चित्ताकर्षण पवित्र रमणीच्या विनयशील प्रेमलीला पाहूनच होतें ! प्रसंगविशेषीं प्रणयप्रकर्षानें कुलस्त्रियेच्या लुसलुशीत आरक्त वदनावर उमटणारी लज्जेची सुंदर छटा मला स्वर्गसुख तुच्छ भासवते ! निर्मल प्रेमसरितेंत कौतुकानें क्रीडा करणारा भाग्यवान् गलिच्छ प्रेमजलानें तुडुंब भरलेल्या डबक्याकडे पाहण्याची तरी इच्छा करील काय ?

**पद्म०:**—बस्स् पुरे तुमचें हें काल्पनीक प्रेमसुख. तुह्मीं या पद्मसेनेला खूष केलेत तर कांहीं अंशीं तें सुख तुह्मांला या यौवनभरानें मुसमुसलेल्या राजकन्येच्या सहवासांतच भोगायला मिळेल ! पण हट्टानें तुह्मीं जर आपलाच हेका चालवला, तर त्या काल्पनिक सुखाच्या मनोराज्यांत एखाद्या भयंकर ठिकाणीं तुह्मांला पुढील दिवस कंठावे लागतील ! महाराज, पुन्हां एकदां आपणांला सांगतें कीं मी माझें प्रेम आपल्याला बोलून दाखवतें, ह्मणून माझी योग्यता एखाद्या नीच स्त्रीप्रमाणें समजणें ह्मणजे आपल्या काल्पनीक शक्तीचा दुरुपयोग करण्यासारखें आहे ! महाराज, आपण मला गोड्या दिमाखानें सांगितलें, तसें मींही आपल्याला सांगूं शकेन कीं, आपल्यासारखे कित्येक सुज्ञत्वाची घमेंड मारणारे तरुण या राजकन्येच्या सहवासाची इच्छा धरून झुरणीला लागतील ! महाराज, येथें मी असला पोकळ वितंडवाद मांडण्यासाठीं आपल्याला मुद्दाम बोलावून आणलें नाहीं. जर माझ्या इच्छेला आपण मान दिलांत तर आपल्याला आवडणारे सर्व गूण या पद्मसेनेजवळ आपल्याला आढळतील. महाराज, माझा विनाकारण संताप करून माझी परीक्षा पाहूं नये. किती झालें तरी आपण एक सामान्य जन,

आणि मी राजकुलोत्पन्न राजकन्या; तेव्हां माझी विनंती ह्मणजे स्वर्गीय देणगी समजायचे सोडून आपण विनाकारण मला असें दुरशद्बांनीं दुखवणें आपल्याला केव्हांही श्रेयस्कर होणार नाहीं.

**विक्रमा०**:–पद्मसेने, तुझ्यासारख्या दुर्गुणप्रिय विषयाधीन कुलटेबरोबर भाषण करणेंही मी कमीपणा समजतो! जननामुळें तूं उच्च–कुलोत्पन्ना असशील; परंतु उच्चकुलत्वाला शोभणारा एकही गुण तुझेजवळ मला दिसत नाहीं. जा; तुजबरोबर व्यर्थ बडबड करण्यानें मीही तुजबरोबर मूर्ख ठरेन. आपल्या उच्चकुलत्वाचा टेंभा तुला कायम राखणें असेल, तर निमुटपणें मला आल्या मार्गानें परत जाऊं दे. नाहींपेक्षां तुझें बिंग विनाकारण बाहेर फुटलें जाईल!

**पद्म०**:--मलाही आतां जास्त बोलण्यास सवड नाहीं. माझा निश्चय मी अगोदरच कळविला आहे. आपल्याला जर येथें माझ्या इच्छेप्रमाणें वागावयाचें नसेल, तर आपल्याला भयंकर बंदिखान्यांत हाल–अपेष्टांत दिवस काढण्याचा प्रसंग येईल! आणि या पद्मसेनेच्या कृपाछत्राखालीं राहण्याची इच्छा केलीत, तर आपल्याला असें वाटूं लागेल कीं, आपल्यासारखा भाग्यवान् या जगामध्यें दुसरा कुणीच नाहीं! स्वर्गसुख भोगणें किंवा नरकयातना जवळ करणें, हें तुमच्या खुषीवर आहे. पहा, नीट विचार करा, आणि आपला निश्चय मला कळवा, ह्मणजे................ (गरबडीनें एक दासी येते.)

**दासी**:--बाईसाहेब, बाईसाहेब, महाराज इकडेच आले; आटपा, लपा कुठें तरी; नाहींतर या दारानें बाहेर निघून जा. आटपा, आलेच महाराज जवळ!

[एकच धांदल उडते.]

**पद्म०**:– (घाबरून गरबडीनें) महाराज, लपा, लपा कुठेंतरी; मी आपल्याला कांहींही आतां ह्मणत नाहीं. नाहींतर त्या दारानें आपण निघून जा. जा, जा महाराज, व्हा पुढें.

**विक्रमा०**:–पद्मसेने, तुझ्या ... ... ...

**दासी**:–बाईसाहेब; आलेच महाराज, पळाना लवकर.

**पद्म०**:–अगबाई, कसें करूं आतां; हे तर हालत नाहींत! (ओरडते) धांवा हो धांवा; हा कोणी चांडाळ दरोडेखोर माझ्या आंगाला स्पर्श करीत आहे, धांवा.

**चंद्रसेन**:– (गरबडीनें येतांना) कोण, कोण तो निमकहराम!

[ विक्रमादित्याची मान धरतो, तो हिसडा मारून दूर होतो. ]

**पद्म०**:– (गद्गद स्वरांत) बाबा, बाबा, तुह्मीं आतां आलांत, ह्मणून बरें झालें; नाहींतर या दुष्टानें माझा येथें प्राणच घेतला असता! (त्याला धरते.)

**चंद्र०**:–बाळे, शांत हो, शांत हो. नीचा तूं कोण? आणि या माझ्या गुप्त महालांत तुझा प्रवेश कसा झाला?

**पद्म०**:–बाबा, माझेकडे अलोलिका आलेली आहे, असें सांगून या चांडालानें मला इकडे एका अनोळखी दासीकडून बोलावून घेतले; आणि येथें मी आल्यावर मला दरडावून हा माझें आंगावरील दागिने मागूं लागला. आणि बाबा मी घाबरून कोणाला हांक मारणार असें पाहून हा चोर माझें तोंडाला बोळा देणार होता, तों तुह्मीं आलेच, ह्मणून मी आज बचावलें. (पुन्हां त्याला कवटाळते.)

**चंद्र०**:–बाळे, शांत हो, घाबरूं नकोस; आतां तर मी तुझेजवळ आहे ना.

**विक्रमा०**:– (ओरडून) चांडाळणी, तूं स्त्री आहेस, कीं कोणी राक्षसिणी आहेस! मजवर खोटें कुभांड रचून अशा रीतीनें आपलें नीच कर्म छपवूं पाहतेस काय? पण—

**चंद्रसेन**:–बेवकूब, एक शब्द बोललास तर तुझी जिव्हांच छाटून टाकीन! अधमा, आतां नसता कांगाव करून तूं दोषमुक्त साव होऊं पाहतोस काय? कोण आहे रे तिकडे. [सशस्त्र शिपाई येतात.] या मूर्खाला एकदम पकडून बेड्या घाला. (धरून बेड्या घालतात.)

**विक्रमा०:**– (स्वगत) खास ही शनीमहाराजांचीच लीला! आतां मी कांहींही बोललों तरी तें असत्य ठरणार! हर हर, परमेश्वरा, यापेक्षां तूं माझा या नीच राजकन्येकडून शिरच्छेद करविला असतास, तरी मी आनंदानें तयार झालों असतो. पण आतां हा दुर्लौकीक मी कसा सहन करूं! [ हताश होतो ]

**चंद्रसेन:**–कायरे नीचा, बोल, तूं कोण आहेस?

**विक्रमा०:**– (स्वगत) आतां मी धनशेटांचें नांव सांगून त्यांनाही दुखवूं काय? त्यापेक्षां एकही शब्द न बोलतां जें होईल तें निमुटपणें सहन करणेंच बरें.

[ एक नोकर येतो. ]

**नोकर:**–सरकार, धनशेट आलेले आहेत.

**विक्रमा०:**–हाय, हाय, परमेश्वरही माझ्या सहनशीलतेची कसोटीच पहात आहे! महाराज, येऊं द्या, त्यांनाही येऊं द्या; आणि मजवरचा हा प्रसंग त्यांना पाहूं द्या.

**पद्म०:**--बाबा, याला एकदम बंदिखान्यांत अडकवा. याला समोर पाहून मला अजूनही याची भीति वाटते!

**चंद्र०:**–पण याचा आणि धनशेटांचा कांहीं संबंध दिसतो! बाळे, तूं या दासी-बरोबर जा; आणि जरा विश्रांती घे. मी याची धनशेटजी समोरच चौकशी करतो. जारे, त्यांना इकडे लौकर घेऊन ये. [ नोकर जातो. ]

**पद्म०:**– (स्वगत) माझें आंगाचा कसा थरकांप होत आहे! धनशेट तरी यावेळीं न येते तर बरें होते; पण तेही आले! आतां मी आड होऊनच पहाते काय होतें तें. (जाते)

**चंद्र०:**–अरे भामट्या, तुझा आणि धनशेटजींचा कांहीं परिचय आहे काय?

**धनशेट:**– (येऊन, आश्चर्यानें) अं! महाराज, हें काय! या निरुपद्रवी सालस इसमाला असें गुन्हेगाराप्रमाणें एकदम पकडण्याचें कारण काय?

**चंद्र०:**--काय धनशेटजी, हा आपल्या परिचयाचा आहे ?

**धन०:**--होय महाराज, मी आपल्याला माझ्या अलोलिकेसाठीं जी वरयोजना केलेली सांगितली, तेच हे उज्जनीचे श्रीमान् गृहस्थ. आपण बोलाविल्यावरून ते इकडे आले, आणि मीही मागोमाग आलोंच.

**चंद्र०:**--काय, मी बोलावणें पाठविलें !

**धन०:**-- (आश्चर्यानें) ह्मणजे! (विक्रमादित्यास) काय हो, आपल्याला महाराजांकडून एकाएकी बोलावणें आल्याचें मला आपण सांगितलेंत ना ?

**विक्रमा०:**--महाराज, ज्याप्रमाणें मी अकल्पीत रितीनें आपलें उद्यानांत आलों; तसाच हाही प्रकार समजावा ! मजवर सध्यां ग्रहदशेचा फेरा असल्यामुळें काय काय होत आहे, याचा मलाही कांहीं उलगडा होत नाहीं.

**चंद्र०:**--धनशेटजी, त्या चोराचें आपण आतां ऐकूंच नका. मी समजलों ! आपल्याला एक भोळसर श्रीमान् समजून या भामट्यानें राजकन्येच्या मौल्यवान् अलंकारांचा अभिलाष धरून हा सगळा कपटव्युह रचलेला होता ! धनशेटजी, आपण आपला जामदारखाना नीट तपासून पहा ! तोंपर्यंत या भामट्याला पद्मसेनेच्या ताब्यांत ठेवतों; कारण मला सध्यां अशा बाबतींत लक्ष घालण्यास सवड नाहीं. मी एका विचारांत गर्क होऊन या गुप्त-महालांत कांहीं कामासाठीं येत होतों, तों पद्मसेनेची किंकाळी मीं ऐकली; आणि येऊन पाहतों, तों हा प्रकार ! आतां आपण आणि पद्मसेना मिळून या भामट्याचा वाटेल तसा निकाल लावावा. मला पुन्हां आजचेआज रणभूमीकडे जावयाचे आहे. जारे या दरोडे-खोराला चांगला बंदोबस्तांत ठेवून राजकन्या फर्मावील, त्याप्रमाणें याची व्यवस्था लावा. धनशेटजी या; मला आपल्याशीं कांहीं बोलावयाचें आहे. मी इतक्यांत आपणांला बोलावणेंच पाठविणार होतो. चला तिकडे.

**धन०:**--हा काय चमत्कार असावा ! मला हा चमत्कार पाहून कांहींच उमज पडत नाहीं! हे सद्गृहस्थ भेटल्यामुळें मी जरा निश्चिंत झालों होतों, तों हा प्रकार

पाहून मीं एका विषारी सर्पालाच मोठ्या प्रेमानें उराशीं धरल्यासारखें झालें! मलाही घरीं जाऊन आतां याची चौकशी केली पाहिजे!

**पद्म०:--** (स्वगत) अहाहा, काय पण मजा झाली! मी अगदीं मृतवत् झालें होतें; पण बाबांनीं या तरुणाला माझ्याच ताब्यांत दिल्यामुळें मी आतां हर्षातिशयानेंच मरतें कीं काय, असें मला झालें!

**विक्रमा०:**--नवकोटनारायणमहाराज, आपण लवकरच आपला जामदारखाना तपासून पहावा; त्यांतही आपल्याला कांहींतरी चमत्कार दिसेल! असा कांहीं अपूर्व दैवयोग ईशकोपामुळें माझा सांप्रत् बनलेला आहे! परंतु महाराज, माझी आपल्याला आतां विनंती इतकीच कीं, आपण मला कांहीं कालपर्यंत आश्रय दिलांत, याबद्दल कृतज्ञताबुद्धिपूर्वक मी आपल्याला ही हिरेजडीत मुद्रिका नजर करतों; ही आपल्याला कदाचित् माझें नशीब उघडल्यास माझें निष्पाप चरित्र निवेदन करील; आणि चंद्रसेनमहाराज, आपल्यालाही अविचाराचें योग्य प्रायश्चित्त ही देईल असा मला पूर्ण भरंवसा वाटतो. प्रिय मुद्रिके, जा; आणि तुझी स्वामिनी कधीं भेटल्यास तिला माझें सर्व वृत्त निवेदन करून धीर दे.

**३८ पद.** (राग–बहार–ताल धुमाळी)

**जाई, तव दिव्य दीप्तिसम शुभ्र कीर्ति मम दावि जनांसी ॥ ध्रु० ॥**
**प्रतिकुल घटना दैवाची ही लांछन लावि यशासी ॥**
**न कळे देहा व्याधीपीडन! भ्रांत चित्त हें होई ॥ १ ॥**

———×:※:×———

अंक तिसरा समाप्त.

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

[ स्थळः–छावणींतील पशुपतीचें ठिकाण ]

**दुंदुभीः**--मित्रा पशुपती, मी तुला वारंवार या पापकर्मापासून अलिप्त होण्याविषयीं बजावीत आहें; परंतु तूं तिकडे मुळींच लक्ष न देतां मलाही त्यांत आणखी गोंवून घेतोस, याला काय ह्मणावें !

**पशु०ः**--मित्रा दुंदुभी, माफ कर; तुझ्या उपदेशाप्रमाणें वागायची वेळ आतां नजिकच आलेली आहे. या लढाईच्या निकालाबरोबर माझ्या या सेवेचाही शेवट समज. मित्रा, या लढाईंत रत्नपूराधिपती हरला जावो किंवा विजई होवो; मी ताबडतोब जाऊन त्यांचेपाशीं माझ्या या नोकरीचा मोबदला मागून स्वस्थ बसणार. पुढें मग केव्हांही अशा निंद्य सेवेला तयार होणार नाहीं. पण दुंदुभी, आतांपर्यंत तूं मदत केलीस तशी आणखीही थोडे दिवस कर; ह्मणजे तुलाही या कामाबद्दल चंद्रसेनमहाराजांकडून उत्तम मोबदला मिळेल !

**दुंदुभीः**--आणि त्यापूर्वीं येथेंच योग्य मोबदला मिळाला ह्मणजे !

**पशु०ः**--अशी शंकाच घेऊं नकोस. आपण इतक्या दक्षतेनें वागत असतांना अशी भीति बाळगण्याचें तुला कारणच नाहीं. मित्रा दुंदुभी, तशी भीति मला फक्त एकदांच वाटली होती ! मी तुला खरोखरीच वेडा समजून वाटेनें सोबतीसाठीं आणि करमणुकीखातर बरोबर घेऊन आलों; आणि येथें मी एकदां नेहमींप्रमाणें इकडची बातमी जासुदाबरोबर देत असतांना, तूं चोरून तें सर्व ऐकिलेलें मी पाहिलें, तेव्हां मात्र माझी पांचावर धारण बसली होती; पण,—

**दुंदुभीः**--माझा योगच तसा आहे ! मी ज्याला एकवार मित्र ह्मटलें, त्याचेशीं मग अगदीं खऱ्या भावानें वागतो. पण पशुपती तूं माल मित्र मित्र ह्मणून

माझेशीं असत्याचरण करीत होतास. पण माझ्या प्रामाणिक मित्र–भावानें त्यावेळीं तेथें मला खेंचून आणून तुझ्या गुप्त कृत्याची मला माहिती करून दिली !

**पशु०**:–किंवा त्यांत सामील केले ह्मणेनास ? मित्रा खरोखरच मी तुझे उपकार कालत्रयीं विसरणार नाहीं ! तेव्हांपासून मात्र आपली खरी जिव्हाळ्याची मैत्री जमली. मित्रा दुंदुभी, तुझ्या उपदेशांत कांहींतरी सार आहे, हें खरें; पण एकदां जें कार्य हातीं घेतलें, तें सोडून मध्येंच जर रत्नपूरास गेलों, तर माझी काय अवस्था होईल, या विचारानें आतां थोडे दिवस काढावेत, हेंच बरें वाटतें. आणि शिवाय मित्रा, यापासून लाभही बराच होण्याचा संभव आहे; मग आतां थोड्यासाठीं कसूर करून जन्मभर दारिद्र्य कां भोगावें; ह्मणून मित्रा यांत मी असाच चिकटून बसलों आहे. दुंदुभी, तुझाही कल्पनेबाहेर लाभ होणार आहे, मग मला असा वारंवार परावृत्त करण्याचा कां प्रयत्न करतोस ?

**दुंदुभी**:– ( स्वगत ) नशीब बेट्याचें ! मी आतांपर्यंत शक्य तितका प्रयत्न करून पाहिला, तरी याचें अजून आहे तेंच आहे; आतां मात्र विलंब न लावतां या पशूला पिंजऱ्यांत अडकवून साध्वी देवनंदेकडे प्रभू–आज्ञेप्रमाणें धांव घेतली पाहिजे.

**पशु०**:–मित्रा, बोलत कां नाहींस ? अशा कोणत्या विचारांत तूं इतक्यांत गढून गेलास ?

**दुंदुभी**:–मित्रा पशुपती, मला राहून राहून याचें आश्चर्य वाटतें कीं, जंगलांतून फिरणारा मी एक वनचर असतांना, तुझी एकाएकी गांठ पडून माझा या राजदरबारांत भाट ह्मणून प्रवेश झाला ! आणि पुढें तर तूं आतां रत्नपूराधिपतीकडून अलभ्य लाभही होणार ह्मणून सांगतोस ! ! तेव्हां एकंदरींत माझा दैवयोग सध्यां फारच जोरावर आहे ! ! !

**पशु०**:–खरोखरीच मित्रा, तुझें नशीब सध्यां फळफळलें आहे ! आणि ह्मणूनच माझ्यासारख्या...........

**दुंदुभी**:– ( मध्येंच ) पशूची गांठ जंगलांत पडली ! असेंच ना ?

**पशु०:**–दुंदुभी, थट्टा करूं नकोस; पण हा अपूर्वच योग नाहीं का ! मी तर असेंच समजतों कीं, तुला त्यावेळीं शनीमहाराजांचा सेवक होऊन दवंडी पिटण्याची इच्छा झाली, याचें कारण हेंच कीं तुला माझ्या सहाय्यार्थ पाठविलें, हा शनीदेवाचा उद्देश मला उमजावा ! खरें कीं नाहीं ? तुला काय वाटतें ?

**दुंदुभी:**–अगदीं असेंच वाटतें. ( एकीकडे ) फक्त फरक इतकाच कीं, 'सहाय्यार्थ' च्या ठिकाणीं 'नाशार्थ' ह्मणावें ! ( उघड ) मित्रा, शनी–महाराजांचा इथल्या विक्रमादित्य महाराजांवर कोप झाला; आणि तुझ्यावर इतकी कृपा झाली ! याचें कारण कायरे ? मलाही तें तूं समजूं दे, ह्मणजे मींही तसें करून शनीदेव संतुष्ट करीन.

**पशु०:**–अरे कारण भक्ति; दुसरें काय ? रत्नपुराबाहेर शनीमहाराजांचें देऊळ आहे. तेथें माझ्या ब्राह्मणाकडून तेलाचा अभिषेक दर शनिवारीं सुरू आहे. आणि घरीं लोहाचा नाल करून त्याचीही दररोज पूजा वगैरे सर्व कांहीं यथा–स्थित होत आहे ! तसेंच मित्रा, शनीदेवाला कृष्णवर्ण प्रिय आहे, ह्मणून घरच्या मंडळींना काळ्या रंगाचीं वस्त्रें वापरण्याची मीं व्यवस्था केली आहे. बायकोनें लुगडें नेहमीं काळेंच नेसलें पाहिजे. मुलांनीं कपडेसुद्धां काळे वापरावयाचें; फार काय पण........

**दुंदुभी:**–पुजेला ब्राह्मण लावला आहे, तोही काळ्या कुळकुळीत रंगाचा आहे, हेंच सांगणार होतास ना ?

**पशु०:**–हो; आतां इथें मला राजसेवक ह्मणून कृष्णवस्त्र वापरतां येत नाहीं, तर मीं हातीं कृष्ण कुत्यच घेतलें आहे !

**दुंदुभी:**–हं आतां कळलें; तूं हें काम यासाठीं पत्करलेंस तर ! मग तुला दूषण देणें केव्हांही योग्य होणार नाहीं. मीही तुला आतां मनोभावानें मदत करीत जाईन. मित्रा, तुझा आहारसुद्धां सगळा उडदाचाच असेल; नाहीं ? पाणीसुद्धां उडीद भिजवून पीत असशील ! आणि हें सर्व सुवर्ण मिळण्यासाठीं

आहेच. जुळलें; एकंदरींत तू खरा शनीभक्त आहेस तर! मित्रा पशुपती, पशूंतसुद्धां तुला म्हैस, रेडा, हींच जनावरें प्रिय असतील! खरें ना?

**पशु०**:--हं सांभाळ हो! ही तुझी शनिदेवतेची थट्टा होत आहे!! पहा; विक्रमादित्य महाराजांसारखा बेपत्ता होशील!!!

**दुंदुभी**:--(एकीकडे) व्हायचेंच आहे आतां. आपल्याला अडकविलें, कीं, चाललोंच! [उघड] मित्रा ही थट्टा नाहीं; मी हें एकदां ब्राह्मणाचें तोंडून ऐकिलें आहे; ह्मणून विचारिलें! बरें पण आतां आपली जासूद येण्याची वेळ झाली.

**पशु०**:--हो, तेंच मी तुला आतां सांगणार आहें. (लांब हात करून) तो त्या ठिकाणीं आतां दिसला, कीं खुणेनें इकडे बोलावून घे; आणि तूं मग नेहमींप्रमाणें बाहेर कोणी येतो कीं काय, हें पहात रहा.

**दुंदुभी**:--ठीक आहे; पण मित्रा, आज जासुदाबरोबर काय बातम्या देणार?

**पशु०**:--आतां विजयसेनमहाराज मोर्चा कसा लावणार; पुढें त्यांचा बेत काय आहे; याची कच्ची हकिगत कळवायची आहे. आणि हेंही कळवायचें कीं इकडील मंडळींना विक्रमादित्यमहाराज आपलें राज्यांतच आहेत, असें खात्रीनें वाटतें; तरी त्यांचा बारीक रीतीनें तपास करावा, ह्मणजे जमल्यास आपला मुख्य शत्रू आपल्या हातीं अनायासेंच लागेल. आणि उज्जनीच्या राणीसाहेब त्यांच्या शोधासाठीं आपल्या राज्यांत शिरल्या आहेत, वगैरे गोष्टी कळवूं; कां?

**दुंदुभी**:-- (स्वगत) अं:, आतां कांहीं कां सांगेनास! ही तुझी बाह्य जगांतील शेवटचीच घटका आहे! आज तुझें कृत्याचा स्फोट होईल, अशी कांहींतरी युक्ति मला केलीच पाहिजे! [उघड] बरें, मी जासुदाला पहातों, तुला कांहीं घरीं निरोप द्यावयाचा असल्यास त्याचाही विचार करून ठेव; ह्मणजे तो आल्याबरोबर चटचट सर्व सांगून (एकीकडे) अंधार कोठडींत जायला [उघड] मोकळा!

**पशु०**:--बरें मग पहा त्याला. [तो जातांना] सावधगिरीनें हं?

[तो मान डोलावून जातो.]

## [ सुमंतांचें ठिकाण. ]

**सुमंतः**--माझ्या इच्छेप्रमाणें बहुतेक गोष्टी घडल्यामुळें मला अशा प्रसंगींही जरा समाधान वाटत आहे! विजयसेनमहाराज उज्जनीस पुरा एक क्षणही न थांबतां, मला तिथें बंदोबस्त करून मागून बालयुवराजांना थोरल्या मासाहेबासह इकडे आणण्याविषयीं सांगून त्यांनीं तशीच तडक रणभूमीकडे धांव घेतली; आणि ते इथें सैनिकांना येऊन मिळाल्यापासून आमच्या पक्षाची सारखी सरशीही होत चालली आहे! महाराज्ञी देवनंदा बाईसाहेब महाराजांचे शोधासाठीं बाहेर पडलेल्या ऐकून विजयसेनमहाराज किंवा मासाहेब मला दूषण देतात कीं काय, अशी मला फार भीति वाटत होती; पण पाहिलें तें शेवटीं महाराज्ञींच्या सांगण्याप्रमाणें उभयतांनाही त्याबद्दल सखेद कौतुकच वाटलेलें मला आढळून आलें! विजयसेन महाराजांच्या आज्ञेप्रमाणें उज्जनींत जरूर तो बंदोबस्त करून मंडळींसह इकडे येऊन तर दाखल झालों. येतांना बरोबर बालयुवराजांच्या इच्छेसाठीं पशुपती आणि दुंदुभी या जोडीला आणलें; परंतु विजयसेनमहाराजांकडून आज कांहीं चमत्कारिक बातमी मला समजल्या-वरून मला सारखा त्याचाच संशय येऊं लागला आहे! इकडील हालचालींच्या बातम्या दुंदुभीकडून चंद्रसेनास समजत असाव्या, असें मला वाटतें. दुंदुभी हाच चंद्रसेनाचा येथें गुप्त हेर असला पाहिजे! कारण त्यानें, पूर्वींची त्याचे-संबंधीं पशुपतीला कांहीं माहिती नसतांना, त्याचे बरोबर येऊन नोकरीचें मिषानें दरबारांत प्रवेश करून घेतला. आणि आमचेबरोबर येण्यासाठीं बालयुवराजामार्फत त्यानें प्रयत्न केलेला दिसतो! आणि दुसरें संशय यायला कारण ह्मणजे विजयसेनमहाराजांचें असें ह्मणणें पडलें कीं, आह्मीं येथें आल्या-पासून असा प्रकार घडूं लागला आहे! आह्मीं आल्यापासून आमच्या हालचाली व्हाव्या तशा यशस्वी होत नाहींत! आमचा बेत शत्रूला जसा अगाऊच समजतो! असें खात्रीपूर्वक विजयसेनमहाराजांना वाटूं लागलें, ह्मणून

याविषयीं त्यांनीं मला तपास करण्यास सांगितलें. तेव्हांपासून मला दुंदुभीचाच संशय येऊं लागला आहे. त्याचेवर नजर ठेवण्याची मीं व्यवस्था केलीच आहे. आणि त्याचें ठिकाण माझेंजवळच असल्यामुळें त्यावर मलाही चांगली नजर ठेवतां येईल. (पाहून, उत्सुकतेनें ) ठीक, शेवटीं माझा तर्क खरा ठरणार असें दिसतें ! इतक्यांत दुंदुभीनें कोणालासें खुणेनें बोलावून घेतलें ! ( पाहून ) आणि हा कोणी आमच्या सैनिकाच्याच वेषांत असलेला इसम येऊन मध्यें शिरला ! आणि हा सारखा कावरा बावरा पहात आहे ! ठीक; आतां त्याला न दिसेल अशा बेतानें जवळ जाऊन पाहतोंच काय आहे तें ! (जातो )

[ स्थळः-- पूर्वीचेंच. दुंदुभी कावराबावरा पहात आहे. मध्यभागीं पशुपती जासुदाचे कानांत सांगत आहे असा देखावा. ]

**दुंदुभीः**--( स्वगत ) माझ्या या चोरट्या हावभावांचा इष्ट तोच परिणाम सुमंतावर झालेला दिसतो. पहा, ते लपून छपून इकडेच येत आहेत ! या; सुमंत, नजीक या. आणि या आपल्या स्वामिकार्यघातकी पशूचा समाचार घ्या.

**सुमंतः**-- ( बाजूस चोरून उभा राहून, स्वगत ) माझ्या कल्पनेप्रमाणें ही जर खरीच निमकहरामी ठरली, तर या चांडाळांना एकदम पकडण्यासाठीं कांहीं सैनीक जवळ असलेले बरे. ( खूण करून कांहीं बोलावितो, व तयारीनिशीं जवळ येऊन कानोसा घेतो. )

**पशु०ः**-- [ हलक्या स्वरांत ] समजलास ना ? आणि विक्रमादित्य महाराजांच्या राणीसाहेबसुद्धां आपल्या राज्यांत त्यांच्या शोधासाठीं शिरल्या आहेत. आणि हें पहा............

**सुमंतः**-- ( स्वगत ) हं ! हा पशुपतीही त्यालाच सामील ! ! ठीक आहे चोरांनो, बरें लवकरच सापडलांत ! ! ! मला सध्यां दैव अनुकूल आहे खरें !

पशु०:—रत्नपूरावर केव्हां छापा येईल, याचा नियम नाहीं ह्मणावें; तिकडेही जय्यत तयारी नेहमीं असूं द्यावी. आणखी...........

दुंदुभी:—हं आटप मित्रा लवकर. कोणी येईल नाहींतर!

[ कांहीं खूण करून सुमंत दाखवितो. ]

सुमंत:—( पुढें येऊन ) पकडा, पकडा या हरामखोरांना एकदम! पहा, तो दुंदुभी पळून चालला!!

दुंदुभी:—जाऊं द्या सुमंतमहाराज; माझा नाद सोडा. मी मर्त्य मानवाच्या हातीं लागणारा प्राणी नाहीं! रामराम मित्रा पशुपती, येतों आतां.

[ पशुपती व जासूद पकडून बेड्या घालतात. व कांहीं दुंदुभीचे मागें धांवतात. ]

सुमंत:—पशुपती, नीचा बोल, तूं चंद्रसेनाचा गुप्त हेर आहेस कीं नाहीं? चांडाळा, तुझें कृष्ण कारस्थान लवकरच प्रकाशांत आलें! बोल, आणखी तुझे कोण कोण साथीदार येथें आहेत?

पशु०:—( शोकानें ) हायहाय, शेवटीं माझा घातच झाला! दुंदुभी, मित्रा दुंदुभी, तुझ्या उपदेशाप्रमाणें मी जर या नीच कर्मापासून पराङ्मुख झालों असतों, तर आज असा बंदिवान होण्याचा प्रसंग खास आला नसता! दुंदुभी, तुला मी त्यावेळीं वेडा समजून, तुझे सद्हेतुमूलक दवंडीकडे दुर्लक्ष केलें, त्याचाच हा परिणाम!! मित्रा शंखनादा, तुझाही शाप फळाला आला!!!

सुमंत:—काय तो शंखनादही तुझा साथीदार होता? दुष्टांनो, मग तुह्मीं बरेंच दिवसांपासून या नीच हेरकर्मासाठीं या दरबारांत प्रवेश करून घेतलांत! ठीक; तो शंखनाद आणि दुंदुभी माझे हातून निसटलेले दिसतात, पण...........

१ सैनीक:—( येऊन ) सरकार, दुंदुभी एकाएकीं दिसेनासा झाला!

पशु०:—महाराज, तो खराच कोणी दैवी पुरूष असेल! तो आपणास शनि-

महाराजांचा सेवक ह्मणवून घेत असे; तेंच खरें असेल. आणि महाराज, शंखनाद चंद्रसेन-महाराजांनीं अडकविलेला आहे. आतां माझा कोणीही साथीदार नाहीं. सरकार, मला जीवदान द्या.

**सुमंतः**--पशुपती, खरें सांग; नाहींतर एकदम तुझें शीर धडापासून अलग होईल ! बोल, तुझे आणखीही साथीदार असले पाहिजेत !

**पशु०ः**--नाहीं सरकार; माझेखेरीज कोणीही नाहीं ! पूर्वी शंखनाद आणि आतां दुंदुभी हेच काय ते माझे साथीदार. महाराज, मी अशा प्राणांतसमयींही खोटें कसें बोलेन ! सरकार, मला जीवदान द्या. मी आपल्याला तिकडची वाटेल ती माहिती सांगतों.

**सुमंतः**--खेंचा या हरामखोराला; विजयसेनमहाराजांचे समोर याला उभा करा. पशुपती, तुला काय सांगणें असेल, तें आतां तेथेंच सांग.

**पशु०ः**--( सुमंताचे पाय धरून ) सरकार, मीं आपल्याशीं हरामखोरी केली, याची क्षमा असावी. महाराज, मला जीवदान द्या. मीं हें खोट्या महत्वाकांक्षेनें धाडस केलें, याबद्दल तुरुंगांत ठेवा सरकार. पण घरीं कोवळीं पोरें आहेत सरकार; त्यांची तरी कांहीं दया येऊं द्या. महाराज, मला धीर मिळाल्याखेरीज मी हे पाय आतां सोडीत नाहीं.

**सुमंतः**--पशुपती, दूर हो. आतां या तुझ्या विनवण्यांत कांहीं अर्थ नाहीं. भयंकर कर्म करायला तयार होणें, ह्मणजे तशी शिक्षा भोगण्यासही तयार असण्यासारखेंच आहे ! रात्रीचे वेळीं भयाण अंधःकारांतून चौरकर्मासाठीं फिरणारा चोर, हातावर शीर घेऊनच निघालेला असतो ! पशुपती, सोड माझे पाय. जरी तुला देहांतशासन मिळालें नाहीं, तरी मरेपर्यंत तुला कारागृहवास सुटायचा नाहीं ! असलें कृष्णकृत्य करणाराला प्रकाशाचें दर्शन होणें शक्य नाहीं ! ! न्या, सैनीकहो, आपल्या शौर्याला अडथळा करणाऱ्या या कृष्ण-सर्पाला विजयसेनमहाराजांपुढें नेऊन उभा करा. मागून मी येतों.

( सैनीक पशुपतीला खेंचतात. )

**पशु०**:--( कपाळास हात लावून ) झाला; पुरा घात झाला ! भलत्याच महत्वाकांक्षेनें या नीच सेवेला तयार होऊन, मी आतां माझ्या मुलांमाणसांनाही अंतरलों ! ! हर हर, परमेश्वरा, तुझ्या न्यायी सत्तेपुढें कोणतेंही दुष्कृत्य छपत नाहीं; हेंच खरें ! ! ! [ जातात ]

## प्रवेश २ रा.

( स्थळ:-- कारागृहांत असलेला विक्रमादित्य )

**विक्रमा०**:-- ३९ पद. ( मालकंस--धुमाळी )

**अतां दुःखसीमा कुठें दूर राहे। दावि विस्मय महा निंद्य वच दुरित हें ॥ ध्रु० ॥ काल येतां तरी, सार्वभौमाकरीं शृंखला ! केसरी धूर्तकाकरिं अरी ॥ १ ॥**

भव्य हर्म्य, प्रासादांतून राहणारा प्राणी काळ फिरतांच कारागृहवासी होतो ! असंख्य प्रजाजनांवर, विस्तीर्ण भूप्रदेशावर आणि कांहीं मांडलिकांवरही अबाधित सत्ता चालविणारा सम्राट ग्रहदशेच्या फेऱ्यांत सांपडला असतां, लोहशृंखलाधारी बनतो ! सर्व सत्ताधीश परमेशा, हा प्रारब्धभोग कीं तुझी अतर्क्य लीला ! प्रिये देवनंदे, देवी, हा तुझा निस्सीम भक्त सांप्रत शत्रूच्या बंदीखान्यांत पडला आहे, हें तुला कसें समजणार ? प्रिये, तुझ्या आल्हाद-दायिनी, निष्पाप मुखकमलाचें प्रिय दर्शन या देवदैवकोपार्धीन विक्रमादित्याला कधीं होणार ? प्रियतमे, तुझ्या स्वर्गसुखदायिनी पवित्र सहवासाच्या क्षणैक स्मरणानें मला या कटुतर प्रसंगींही समाधान वाटतें ! ये, पद्मसेने ये; अबला-हृदयाचे आणखीही कांहीं चमत्कार मला पाहूं दे. मला वाटतें, ही पद्मसेना ह्मणजे मायावी मानवी स्त्रीकाया धारण करणारी कोणी राक्षसकुलोत्पन्नाच

असावी ! अथवा माझेकरतां ह्मणून शनीदेवतेनें तरी या स्त्रीकार्येत प्रवेश केला असला पाहिजे ! सध्यां सर्वच चमत्कार चाललेले आहेत.

[ पद्मसेना येते ]

**पद्म०:--** ( स्वगत ) आतां स्वारी जरा निवळली असेल ! धनशेटांनीं मजजवळ पुष्कळ रदबदली केली; पण मीं त्यांचें मुळींच न ऐकतां त्याला येथें अडकवून ठेविलें ! आतां तरी राजकन्येचा प्रभाव समजून मुकाट्यानें माझें मनासारखा वागेल. बाबा येथें नसल्यामुळें मला आतां काळजी ह्मणून कशी ती राहिलीच नाहीं ! आतां मी करीन तें प्रमाण ! त्यावेळीं मी किती घाबरलें होतें; पण बाबांच्या अपत्यप्रेमानें मला नवजीवन देऊन माझें कार्याला मदत केली ! माझें मलाच एकादे वेळीं आश्चर्य वाटतें कीं, मी एक भेकड अबला असतांना माझे हांतून हें घडतें कसें ! पण हा सारा यौवनाचाच प्रताप ! अलोलिका मात्र मला याबद्दल दोष देईल. ती मजकडे हा प्रकार झाल्यापासून हजारदां येऊन गेली असेल; पण मी तिला प्रत्येकवेळीं कांहींतरी नवीन युक्ति योजून भेटण्याचें टाळीतच आलें! तिच्यापुढें उभें राहण्याला मला आतां धीरच होत नाहीं ! आणि लाजही वाटते. कारण माझें सर्व हृद्गत तिलाच काय तें फक्त ठाऊक ! हा तरुण मला वश झाला, ह्मणजे मग तिची कशीही समजूत करीन; पण तोंपर्यंत तिला भेटूंच नये, हें उत्तम. [ उघड ] महाराज, संतापातिरेकानें आपल्या सर्वांगाची अगदीं आग झाली असेल ! पण मला तरी त्यावेळीं तसें करण्यावांचून दुसरा इलाज काय होता ? मी तशी युक्ति केली नसती, तर महाराज, आपणा उभयतांचीही काय अवस्था झाली असती, तें मला कांहींच सांगतां येत नाहीं ! बाबांचा स्वभाव ठाऊक नसल्यानें त्यावेळीं माझा आपल्याला तिरस्कार वाटला असेल; पण मी तसें केलें, ह्मणून मी तर वाचलेंच; पण महाराज, आपलीही संकटांतून सुटका झाली ! आपल्याला येथें अडकवून ठेवण्याचा सारा नकली प्रकार मला मुद्दाम करावा लागला ! याबद्दल महाराज, या दासीला क्षमा होईल ना ? ह्या पहा कारागृहाच्या किल्ल्यासुद्धां मीं आपणांला सोडविण्यासाठीं आणिल्या आहेत. ( दार उघडून ) या, महाराज बाहेर या; ह्मणजे मी आपल्या शृंखलाही काढून

टाकते. [ थांबून ] या ना महाराज बाहेर. माझा आपल्याला फारच राग आलेला दिसतो ! पण मी त्या नकली प्रकाराबद्दलही क्षमा मागितली ना ? मग महाराज, या ना आतां बाहेर. ( वाट पाहून ) महाराज, आपण बोलत नाहीं; आणि बाहेरही येत नाहीं ! ( थांबून, एकदम ) हं समजलें. महाराज, मी आपल्यासाठीं मध्यें येऊन आपल्याला सन्मानानें बाहेर आणले पाहिजे, ह्मणून असें रुसून बसलांत; खरें ना ? मग ही पहा महाराज, मी मध्यें येतें. ( जाऊं लागते, तोंच दासी येते. )

**दासीः**--ताईसाहेब, अलोलिका--ताईसाहेब आलेल्या आहेत. त्यांचेबरोबर त्यांचे कांहीं खाजगी सशस्त्र लोकही आहेत. त्या एकदम मध्येंच येत होत्या; पण मीं त्यांना विनंती करून थांबवलें ! आणि आपल्याला सांगायला आलें. मीं त्यांना, आपण येथें नाहीं, असें सांगितलें; पण त्या अगदीं धरणेंच घेऊन बसल्या आहेत !

**पद्म०ः**--अग सांग जा; मी आतांच गेलें ह्मणून. आणि ह्मणावें,......

[ अलोलिका येते, व पद्मसेना ओशाळते ]

**अलो०ः**--काय ह्मणावें पद्मसेने; काय ह्मणावें हें मला तूं आतां समक्षच सांग. नेहमीं कांहींतरी थापा देऊन माझी भेट कां टाळीत होतीस ? माझेपुढें तरी तुला ओशाळल्यासारखें झालें, ह्मणजे आश्चर्यच आहे ! पद्मसेने, स्त्रीच्या कोमलत्वालाही चांगलीच हरताळ फांसलीस ! बालमैत्रिणीच्या मैत्रीचा असा दुरुपयोग केलास कां ? पद्मसेने, माझ्या वृद्ध पित्याचे विनंतीकडेही दुर्लक्ष करण्याइतकी तूं उद्दाम कशी बनलीस ? इतकी बेफाम वृत्ति व्हायला, तुलाच जगाविरहीत यौवन प्राप्त झालें कां ? चांडाळणी, चंद्रसेनमहाराज, फारच गर्दीनें निघून गेले ह्मणून; नाहींतर तुझें कारस्थान त्यांना सर्व कांहीं समजून दिलें असते ! पद्मसेने, अशी काळीं ठिकर कां पडलीस ! बोल; कुबेरालाही अभिलाष उत्पन्न करणारे तुझे अलंकार तरी कोणते आहेत, ते मला पाहूं दे !

**पद्म०ः**-- [ स्वगत ] अगबाई, माझ्या सर्व आंगाला अगदीं दरदरून घाम सुटला ! मला एक शब्दही बोलण्यास सुचत नाहीं ! ! कसें करूं ! ! !

**अलो०:**--पद्मसेने, तुझी कृती एखाद्या धाडसी नराधमालाही लाजविणारी आहे ! सत्शील महात्म्यांचें अनायासे माझें घरीं आगमन झालें; आणि बाबांनीं त्यांना माझेकरतां, त्यांचे इच्छेविरुद्ध ठेवून घेतले. पण माझ्याच बालमैत्रिणीकडून--छे, मला तुला आतां मैत्रीण ह्मणण्याचीही लाज वाटते !-- तुझ्यासारख्या आडदांड राजकन्येकडून त्यांची अशी दशा झालेली पाहून मला अगदीं मेल्याहून मेल्यासारखें झालें आहे ! (हात जोडून) महाराज, केवळ माझ्यासाठींच ही आपणांवर आपत्ती कोसळली, याबद्दल मला अत्यंत दुःख होत आहे ! (दरडावून) पद्मसेने, अशी दगडासारखी स्तब्ध कां उभी राहिलीस ? त्यांना अगोदर बंधमुक्त कर.

[ पद्मसेना बेड्या काढण्यास जाते; तो तिला लोटून देतो. ]

**विक्रमा०:**--अलोलिके, मला बंधमुक्त करून तूं काय करणार ? अशानें तुजवर चंद्रसेनाचा रोष होणार नाहीं कां ?

**अलो०:**--चालेल; महाराज, मला त्यांनीं दोष दिला तरी चालेल. त्यांनीं याबद्दल मला कांहीं शिक्षा सांगितली, तरीही मी ती सहन करीन ! पण आपणांला मी येथें आतां राहूं देणार नाहीं. आपल्यावर हा प्रसंग केवळ माझेमुळेंच आला ! महाराज, आपल्या हातांतील शृंखला काढून मी आपल्या हातांत चढवितें; आणि मी येथें आपल्याऐवजी राहतें. पण यापुढें मी आपणांला अशा स्थितींत राहूं देऊन पापाची वांटेकरीण होणार नाहीं. महाराज, आपण येथून त्वरेनें आपल्या मंडळीस भेटण्यास जावे. त्यांची तिकडे विरहानें फार कष्टमय स्थिती झाली असेल ! चंद्रसेनमहाराजांना खरी हकीगत समजल्यावर ते मला मुळींच दोष देणार नाहींत. महाराज, आपण निःशंकपणें जावें; परंतु प्रथम ह्या शृंखला काढल्या पाहिजेत.

**विक्रमा०:**--अलोलिके, तुझी सदिच्छा आहे, ही गोष्ट खरी. पण त्यापासून मला कदाचित् याहूनही भयंकर संकट सोसण्याचा प्रसंग येईल ! तेव्हां आहे

हीच स्थिती कांहीं कालपर्यंत बरी आहे. माझी ग्रहदशा संपतांच अनायासेच सर्व कांहीं ठीक होईल.

**अलो०:**–महाराज, आपणांस भिण्याचें मुळींच कारण नाहीं. आपल्या संरक्षणासाठीं मी आपले लोक थेटपर्यंत आपल्या सोबतीस देते.

**विक्रमा०:**--अलोलिके, मला संरक्षणार्थ दुसरे लोक बरोबर घेण्याची कांहींच जरूर नाहीं. मी मनांत आणलें असतें तर त्याचवेळीं चंद्रसेनाचे हत्यारबंद लोकांस यमसदनाचा मार्ग दाखवून मी माझ्या मार्गानें चालता झालों असतो. पण असल्या आडदांडपणानें आपली मागे नाचक्की होईल, असलें वर्तन करून निघून जाण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. माझेवरचा कलंक साफ धुतलेला मी येथें पाहीन; तेव्हांच येथून जाण्याची गोष्ट बोलावयाची. अलोलिके, मला असाच येथें कांहीं काल राहूं दे; ह्मणजे या नीच पद्मसेनेच्या पापाचें माप पुरेपूर तिचे पदरांत पडलेले मला दिसेल.

**अलो०:**–पण महाराज, येथें ही उलट्या काळजाची पद्मसेना आपल्यावर केव्हां काय घोरपड आणील, याचा कांहींच नियम नाहीं. महाराज, आपल्या निर्दोषीपणाची ग्वाही, ही अलोलिका सर्वत्र फिरवील; त्याबद्दल आपणांला चिंता नको. पण आपण या आगींतून पाय काढावा, हें बरें.

**पद्म०:**-- ( लीनपणें ) अलोलिके, मीं हें भयंकर कृत्य केलें खरें; पण मला याबद्दल पश्चात्ताप झाला किंवा नाहीं, याची तूं या महात्म्यांनाच विचारून खात्री करून घे. मी त्यांचेजवळ क्षमा मागण्यासाठींच आतां येथें आलें होतें; विचार त्यांना. त्यांच्या शृंखला काढून त्यांना बाहेर आणण्यासाठींच तूं आलीस, तेव्हां मी मध्यें जात होते. अलोलिके, मी त्यांचेवर ही विपत्ती आणली नसून प्राणसंकट टाळण्यासाठीं हें सगळें कपट–नाटक मला रचावें लागलें ! अलोलिके, त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांना येथेंच राहूं दे. ह्मणजे बाबा परत आल्यावर मी वाटेल ती युक्ती योजून, त्यांना दोषमुक्त ह्मणून सोडीन; आणि माझीही अब्रू सांभाळीन. अलोलिके, मी तुजपुढें पदर पसरते, पण माझी विटंबना करूं नकोस.

यांना मोकळेपणानेंच येथें राहूं दे. आणि तुझी त्यांचेवर देखरेख राहूं दे. मी आतां इकडे पाहणारसुद्धां नाहीं. पण मला या कृत्याबद्दल क्षमा करून माझी लाज आतां तूंच राख.

**अलो०:**–पद्मसेने, तुझी ही सध्यांची केविलवाणी स्थिती पाहून मला तुझी कींव येते. चंद्रसेनमहाराजांनीं सर्वस्वी यांना तुझे ताब्यांत दिले आहे; मग यांना निर्दोषी ह्मणून तूं कां सोडीत नाहींस ?

**विक्रमा०:**–पण अलोलिके, तिनेंच माझेवर हा आरोप लादला; आणि ती आतां असें ह्मणून आपलेकडे खोटेपणा कसा घेईल.

**अलो०:**--न घ्यायला काय झालें महाराज; इतक्या पापाला एवढें प्रायश्चित्त ह्मणजे कांहींच नाहीं.

**पद्म०:**– ( स्वगत, चिडून ) आतां यांना सध्यां होस हो ह्मणून या दोघांचाही मला चांगलाच सूड घेतला पाहिजे ! मी राजकन्या असून या सामान्य जनांपुढें माझी अशी विटंबना ह्मणजे मला अगदीं मरणप्राय दुःख देते ! [ उघड ] अलोलिके, इतका कमीपणा मी खुषीनें आपलेकडे घेण्यास तयार आहे. फक्त एकदां राजवाड्यांत जाऊन या बाबतींत वडील मंडळींची अनुमती घेते; आणि यांना आत्तांचें आत्तां निर्दोषी ह्मणून सोडून देते. तूं यांची ती मुद्रिका आणि बरोबर देण्यासाठीं कांहीं लोक वगैरे घेऊन लवकर तयारीनिशीं ये. आपण यांना सर्व मिळून सन्मानानें निरोप देऊं. महाराज, आतां आपण येथेंच बसावे. [दासीस] अग, यांना चांगलें आसन आणून दे. महाराज, मला आपल्या या शृंखला या अलोलिकेसमक्ष काढूं द्या.

[ विक्रमादित्य बेड्या तोडतो. ]

**अलो०:**-- नको, तुझ्या पापी हातांचा स्पर्श त्या हातांना व्हायला नको. पहा, त्यांनीं त्या तोडून टाकल्या.

**विक्रमा०:--** (स्वगत) माझ्या मनाचा सध्यां बराच गोंधळ उडालेला आहे ! एक वेळ असें मनांत येतें कीं, यांच्या सल्ल्यानें वागण्यांत मजवर आणखी कांहीं दुर्धर प्रसंग ओढवतो कीं काय ? पण पुन्हां असेंही वाटतें कीं, अनायासे प्रिय स्वजनांना मिळण्याची सुसंधी मिळत असतांना ती गमावणें ह्मणजे दैवाच्या नांवानें नाहक रडण्यासारखेंच आहे ! कांहीं होवो; देवी देवनंदेच्या भेटीसाठीं मी आतां जाणारच. (उघड) अलोलिके, जा; तुझ्या वृद्ध पितार्जीना माझे भेटीसाठीं इकडे घेऊन ये. माझे जाण्यानें त्यांना तुझे बाबतींत जरा दुःख होणार आहे; पण माझें मन सध्यां माझे साध्वीचें दर्शनासाठीं सारखें ओढ घेत आहे ! अलो-लिके, तोंड लपवूं नकोस; समजलों. तुझे अलौकिक गुणांनीं माझें चित्ताकर्षण करून घेतलें आहे ! पण प्रथम माझ्या धर्मांगनेची भेट आणि नंतर तुझे प्रिय हेतूचा विचार.

**अलो०:--** [लज्जाभीतियुक्त] महाराज, आपण आपल्या अर्धांगीच्या संतोषानें चालावें हेंच बरें. त्यांतच मलाही समाधान आहे. महाराज, मी आतां बाबांना घेऊन येते. पद्मसेने, चल; तूंही लवकर जाऊन ये. येथें माझे थोडे लोक मात्र आतां राहतील हं. (स्वगत) नभोमंडल मेघांनीं व्याप्त होऊन लागलीच त्यांचा धुव्वा उडावा, आणि शीतल चंद्रिकेचें शांत दर्शन घडावें ! तशीच आतां माझें मनाची स्थिती झाली !

### ४० पद. (शामरे मोरी०)

**वाटलें सुख जरा मनाला ॥ परिसुनि या गुणि दयित-वचाला ॥ध्रु०॥**
**तनुसेवा ही घडतां मजला ॥ वाटे कळस सुखाचा झाला ॥ १ ॥**

(जाते.)

**पद्म०:--** [स्वगत] शेवटीं माझे हातून या मूर्ख तरुणाचा नाशच व्हावा, असा याचा दैवयोग दिसतो ! आणि ह्मणूनच हा इतका हट्टाला पेटून माझा पदोपदीं अपमान करीत आहे. जा अभाग्या, या रूपयौवनभर राजकन्येसह मजा मारणें

तुझ्या नशिबींच नाहीं ! भोग आपल्या कर्मांचीं फळें ! मला तुच्छतेनें झिडकारणारे तुझे हात आतां लवकरच तुझे धडापासून वेगळे होतील ! अलोलिके, हा तुझा महात्मा आतां गलितहस्त होऊन भयाण अरण्यांत अन्नपाण्यावांचून तरफडत प्राण सोडील ! राजकन्येच्या अपमानाचें प्रायश्चित्त त्याला हेंच योग्य आहे ! आतां अगोदर मारेकऱ्यांना याचे दोन्ही हात सफाईनें छाटून टाकण्यास सांगतें ! आणि अलोलिका येथें येण्यापूर्वींच ताबडतोब या पुण्यप्राण्याची रवानगी जंगलांत झाली पाहिजे, ह्मणूनही बजावतें ! अलोलिके, तुलाही तोंडसुख घेण्यास बराच जोर आलेला आहे ! बैस आतां त्याच्या आणि माझ्या नांवानें मुळमुळ रडत ! आणि या पद्मसेनेचा सूड उगविण्यासाठीं सर्व जगाला वाटेल तें सांगत सूट. जर सर्व तें फोल समजतील, तरच या पद्मसेनेचें नशीब ! राजकन्येला खोटी ठरवून तुझ्या शब्दांवर विश्वास ठेवायला जगाला वेड लागलें नाहीं ! या मूर्ख तरुणाचा बेपत्ता झाला, ह्मणजे तुझेविषयीं मी मुळींच फिकीर करीत नाहीं. जा. (जाते.)

---

## प्रवेश ३ रा.

[ स्थळ:—रस्ता. देवनंदा व वासंतिका येतात. ]

**देवनंदा:—** ४१ पद. [ डोलेरे जोबन० ]

**सवती वसुमती नाथ लपवी कां ! ॥ ध्रु० ॥ जनिं काननिं पाहुनि जन थकले ! लीन भगिनि; करुणा न येई कां ? ॥ १ ॥**

**वासं०:**—बाईसाहेब, तें शनिदेवतेचें देऊळ आहे. येथून ती रत्नपुराची वेसही दिसतेंच आहे. आपले लोक रत्नपुरांतून तपास करून येईपर्यंत तिथें आपण जरा आतां विसावा घ्यावा. [ जातात. ]

[ रत्नपूराबाहेरील शनीचें देऊळ. ]

( शनीची निरनिराळे प्रकारांनीं पूजा अर्चा चालली आहे; नारळ फुटत आहेत; असा देखावा. सारथी येतो. )

**सारथीः**–अरे ए शनीभक्तांनो, पुरे करा तुमची आतां आराधना. नाहींतर नारळ फोडणारांचे स्वतःचे नारळ फुटतील; आणि शनीदेवतेची पूजा करणारांची पाद्यपूजा होईल! उठा; पळा. भटजीमहाराज, उचलतांना तेलाचें बुधलें? नाहींतर तुह्मींच येथें पाय घसरून आपटाल! ते पहा, कोणी मोठे लोक आज येथें दर्शनाला येत आहेत. व्हा बाजुला.

[ कांहीं सारथीला दटावतात; इतक्यांत देवनंदेचे वेष पालटलेले सशस्त्र शिपाई तेथें येतात. ]

**एकः**–ए चलो, जगा खाली करो; जरा ठेरके फीर आना. चलो; ए भटजी-महाराज उठाव तुमारा बुधला.

**भटजीः**–अरे बाबांनो, तुह्मीं असें काय करतां? या लोकांना पाहिजे तर जाऊं द्या; पण मला येथें राहूं द्या! माझी तुमच्या मालकाला जरूरी लागेलच!

**सारथीः**–हो भटजीबुवा तुमची जरूर लागेल! पण तुह्मीं त्यांच्या नांवानें शनीमहाराजांचें डोक्यावर तेल कोठून ओतणार! येथें जवळपास तर आतां तेली नाहीं.

**भटजीः**–अंहः काय करायचा! मजजवळ हा बुधला आहेच. दक्षणा मिळाली कीं, त्यांतल्याच तेलाचा मी अभिषेक करीन.

**सारथीः**–हंऽ! आणि महाराज यांतलें तेल कांहीं घरींही जात असेल? किंवा घरीं पूर्वींच थोडें टाकून येत असाल; नाहीं कां? शनीमहाराज तुमच्या उदरीं आले असतील!

[ त्याचे पोटावर चापट्या मारून हांकलून देतो. गर्दी मोडते. व सारथी सैनिकांसह बाजूला होतो. देवनंदा व वासंतिका येतात. ]

**देव०:**—वासंतिके, हें शनीमहाराजांचेंच देऊळ आहे ना ? चल, आपण दर्शन घेऊं. (जवळ जातात.)

**देव०:**— (प्रदक्षिणा करून हात जोडून) महाराज,

**४२ पद.** (वैभवें नटल्या०)

निगमा कृति मानवासी प्रणवरूपा प्रकाशा ॥
प्रगूढा ही सृष्टिरचना गुंगवी धी परेशा ॥
पुरवि दुसरा कोण ईशा मानवी स्वल्प आशा ॥
नाथदर्शन घडवि आतां, व्याकुला ही प्रहेशा ॥ १ ॥

**वासं०:**—बाईसाहेब, शनीदेवतेच्या कृपेनें आपल्याला सरकार स्वारीचें दर्शन लवकरच होईल, असें मला खात्रीनें वाटूं लागलें आहे !

**देव०:**—असें तूं कशावरून ह्मणतेस ?

**वासं०:**—मी पहिल्यापासून पाहतें बाईसाहेब; शनीदेवतेची आपल्यावर कृपाच मला दिसते. आपण उज्जनी सोडून निघाल्यापासून प्रवासाचा आपणांला यत्किंचितही त्रास झालेला नाहीं. वाटेंत कांहीं सुगावा लागल्यावरून आपण शत्रूच्या राज्यांतही प्रवेश केला; तरीपण आपला प्रवास अगदीं सुरक्षितपणें चाललेला आहे. आणि मार्गांनें आपल्याला निरनिराळ्या लोकांकडून समजत असलेल्या बातमीवरून सरकारस्वारी रत्नपूराकडेच गेली असावी, असेंही मला खात्रीनें वाटतें ! आपले लोक रत्नपूरांत गेलेच आहेत; तेव्हां समजेल खरें काय तें पण शनीदेवतेची कृपा आपलेवर नसती तर आपला प्रवास इतका सुगम खास झाला नसता ! आपलें रक्षणासाठीं जरी गुप्त रूपानें सैनीक जवळपासच असतात, तरी ईशकोपच झाल्यावर काय होईल याचा काहींच नेम नाहीं !

**देव०**:--वासंतिके, माझें मनसुद्धां पूर्वीं जितकें उदास असे, तितकें आतां नाहीं. आपण जसजसे या रत्नपूरानजीक येऊं लागलों, तसतसें माझें विरहपीडित अन्तःकरण जरा हलकें होत आहेसेंच मला वाटतें. देव करो, आणि माझ्या नाथांचें पवित्र दर्शन मला शत्रुनगरींत कां होईना पण धडपणीं होवो; ह्मणजे मी शनीदेवाला बोललेले सर्व नवस आनंदानें फेडीन. वासंतिके, सध्यां रणभूमीवर माझे बाबांचें नेतृत्वाखालीं असलेले आमचे सैनीक चंद्रसेनावर विजय संपादन करीत आहेत; यावरूनसुद्धां मला तुझ्यासारखेंच वाटतें कीं, शनीमहाराजांची मजवर कृपा आहे. पण ती कृपा त्यांचेवरही असेल कां ग ?

**वासं०**:--बाईसाहेब, मनांत असल्या शंका कुशंका आणूं नये. ते पहा आपलेच घोडेस्वार मोठ्या आनंदानें आपले घोडे चौफेर फेंकीत इकडे येत आहेत; यावरून तरी बाईसाहेब खात्रीनें आपलें काम आतां झालेंच असले पाहिजे !

**देव०**:--पहा, ते आलेच जवळ; आतां समजेल काय आहे तें.

[ कांहीं घोडेस्वार येतात व मुजरा करतात. ]

**एक**:--सरकार, रत्नपूरांत कोणी धनशेट नवकोटनारायण आहेत; त्यांचे वाड्यांत महाराज सरकारचा मुक्काम असल्याबद्दल आमची खात्री झाली आहे. पण मालक घरीं नसल्यामुळें आह्मांला कांहींच जास्त माहिती समजली नाहीं. हुजूरची माहिती जनानखान्यांत जास्त मिळेल, असें आह्मांला तिथल्या सेवकजनांकडून समजलें. तेव्हां सरकारनी वासंतिकाबाईना जर पाठविले, तर जास्त माहिती त्वरेनें मिळूं शकेल.

**देव०**:--मग आह्मीं जातोंच तिथें. चल वासंतिके, मला आतां त्या नवकोट नारायणाचा वाडा केव्हां दिसतो, असें झालें आहे ! चल.

**वासं०**:--चला बाईसाहेब, आपल्याला आतां महाराज, तेथेंच भेटतील. चलावें.

**देव०**:--सैनिकहो, तुह्मांला मात्र रत्नपूरांत फारच दक्षतेनें राहिले पाहिजे.

**नाईक**:--त्याविषयीं सरकारनीं मुळींच काळजी करूं नये. (जातात.)

[ स्थळ:--धनशेटाचा वाडा. ]

**अलोलिका:**-- ( स्वगत ) आतां जर त्या महात्म्याची साध्वी मजकडे आली, तर मी तिला काय सांगूं ! पद्मसेना इतकी कालस्वरूपिणी असेल, असें मला स्वप्नांतसुद्धां वाटलें नाहीं ! शेवटीं चांडाळणीनें स्वतःच्या नीच हेतूकरितां माझ्या तेथें असलेल्या सेवकांना मारहाण करून हकलून लावून त्यांची काय अवस्था केली असेल, कांहींच समजत नाहीं. पद्मसेना जातीची स्त्री असून इतकीं घोर कर्में तिचें हांतून घडतात कशीं, याचें मला मोठें आश्चर्य वाटतें ! आतां तर तिचें आंगांत पिशाचसंचार झाल्यासारखें दिसतें ! तिला भीति कशी ती वाटे-नाशीच झाली आहे ! काय करूं; परमेश्वरा, केवळ माझेकरतां एका श्रेष्ठ निर्दोष व्यक्तीची कोण ही विटंबना !

**४३ पद-** ( रमणी मुदित० )

**सुजना, कुजनवासना ॥ कटु व्यसना, दावितना ॥ धृ ॥**
**तमयेच्या कल्याणा ॥ विनवि तात नरराणा ॥**
**विमल हेतु; परि घडली दयित वंचना ॥ १ ॥**

[ दासी येते. ]

**दासी:**--ताईसाहेब, आपल्याकडे कोणी अपरिचित पण पेहेरावावरून मोठ्या कुलशीलवान् दिसणाऱ्या बाई आलेल्या आहेत. त्यांच्या दासीच्या सांगण्यावरून त्यांना आपल्या भेटीची इच्छा आहे. तेव्हां त्यांना इकडे घेऊन येऊं कां ?

**अलो०:**-- ( साश्चर्य भीतीनें ) जा, घेऊन ये. ( दासी जाते ) ( स्वगत ) आतां कांहीं लोक त्यांच्या तपासाकरतां आले होते; त्यावरून सहज माझ्या मनांत विचार आला कीं, त्या महात्म्याची साध्वी आली, तर माझें कसें होईल; तों तोच प्रसंग आलेला दिसतो ! परमेश्वरा, त्या साध्वीपुढें बोलण्यास मला धीर दे. मला अगदीं कांपरें भरल्यासारखें झालें आहे ! आल्याच त्या. [ देवनंदा व वासंतिका येतात. ] या, बसा या कोचावर.

**वासं०:–** बाईसाहेब, आपल्या वाड्यांत कोणी नवीन गृहस्थ राहिलेले आहेत ना?

[ देवनंदेची दृष्टी अलोलिकेचे हाताचे बोटाकडे जाते. ]

**देव०:--** ( आनंदानें ) वासंतिके ही पहा तीच मुद्रिका! बाई, या मुद्रिकेच्या मालकाची मला लवकर भेट करून घाल कां?

**अलो०:--** ( मुद्रिका काढून ) खरेंच; ही मुद्रिका आपल्या पूर्ण परिचयाची आहे कां? घ्या ही, नीट पहा.

**देव०:--** [ मुद्रिका हातांत घेऊन मस्तकाला लावते. ] हिनें मला आतां नवजीवन दिलें आहे! बाई, त्यांची मला आतां लवकर भेट होईल कां?

**अलो०:--** [ स्वगत ] खास, त्या महात्म्यांचीच ही सहचारिणी असली पाहिजे! आतां इला काय सांगूं? (उघड) बाई, या निर्जीव मुद्रिकेनें आपल्याला नवजीवन दिलें; पण या अभागिनीच्या चरित्रकथनानें मात्र तें हिरावून घेतल्यासारखें होणार! बाई, त्या श्रेष्ठ महात्म्यांच्या आपण गृहभूषण अर्धांगीच ना?

**वासं०:--**होय बाईसाहेब, आपला तर्क बरोबर आहे. पण ते महात्मे आतां कुठें आहेत? त्यांच्या भेटीसाटीं आमच्या बाईसाहेब फारच व्याकूल झालेल्या आहेत. या मुद्रिकेवरून त्यांचें वास्तव्य इथें असल्याबद्दल आमची खात्री झाली आहे.

**अलो०:--**हो बाई, त्यांच्या प्रेमळ सहवासाचें निरुपम सुख अनुभवण्याचें आमच्या नशिबीं कांहीं दिवस होतें, ह्मणूनच ते आमचेकडे अकल्पीत रीतीनें आले! बाई, आपण फारच थकून गेलेल्या दिसतां तरी थोडावेळ जरा विश्रांती घ्या. मग मी आपणांला सर्व हकिगत सांगतें. आपण इकडे आल्यास खूण पटण्यासाठींच ही मुद्रिका त्यांनीं बाबाजवळ दिली होती, ती त्यांनीं मजजवळ दिली; तिचा उद्देश लवकरच फलद्रूप झाला! आतां आपण तिला आपल्या करांगुलीवर आश्रय द्यावा. [ देवनंदेच्या बोटांत घालते ] चला आपण अगोदर...

**देव०**:–पण बाई तुमच्या भाषणानें तर माझा जीव कासावीस झाला आहे ! चरित्रकथनानें मला मिळालेलें नवजीवन हिरावून घेतल्यासारखें कसें होणार ? तें मला अगोदर सांगा. बाई, माझे नाथ कुठें आहेत ?

**अलो०**:–बाई अशा शोकाकुल होऊं नका. आपण इतके दिवस काढले, तसा आणखीही थोडा वेळ धीर धरावा; ह्मणजे थोड्या वेळानें मी आपली भेट या रत्नपूरांतच करून देतें. बाई आपण दोन दिवस अगोदर आला असतां, तर मला फारच आनंद झाला असता. पण आतां.........

**देव०**:–बाई मला स्पष्ट काय तें सांगा. तुमच्या संदिग्ध भाषणानें मी फारच बुचकळ्यांत पडलें आहे ! माझे प्राणनाथांवर हल्लीं कांहीं संकट आलेलें आहे कां?

**अलो०**:– ( स्वगत ) यांना आतां पद्मसेनेकडेच घेऊन जावें; ह्मणजे या साध्वीच्या पुण्याईनें तरी त्या महात्म्यांना ती सोडील ! मीं पुष्कळ प्रयत्न करून पाहिला; पण ती मला आतां मुळींच पत्ता लागूं देत नाहीं ! जर ती चांडाळीण या पतिव्रतेशींही लपंडाव खेळूं लागेल, तर मग मी तिच्या आश्रितांकडून माझी शिकस्त करून बातमी काढीन. आणि त्या नीच पद्मसेनेचे चांगले धिंडवडे काढीन ! सध्यां यांना जरा धीर द्यावा, हेंच बरें. ( उघड ) बाई, आपल्याला घाबरण्याचें मुळींच कारण नाहीं. आपले नाथ आपल्याला थोड्याच वेळांत अगदीं सुखरूपपणें भेटतील. चला, आपण जरा उपहार वगैरे करा; ह्मणजे मी आपल्याला पहिल्यापासून घडलेली हकिगत प्रथम सांगतें.

**देव०**:– ( दुःखानें ) चला बाई; केव्हां नाथांची भेट होईल तीं होवो ! जों जों माझी उत्कंठा वाढते, तों तों मृगजळ मला फसवून पुढें पुढेंच खेंचत आहे ! परमेशा, या दीन अबलेची ही केविलवाणी स्थिती तुला कशी पाहवते !

**४४ पद.** [ छबुदिखला ज्या बा० ]

पतिदर्शनतृष्णा दृढतम ही जीव सदा तळमळवी निशीदिनीं ॥ ध्रु० ॥
मृगजल आशा करित निराशा; प्रतिक्षण जात युगासम मजला ! ॥१॥

[ जातात ]

———×———

# प्रवेश ४ था.

[ स्थळः—जंगल. विक्रमादित्य हस्तविहीन बसला आहे. ]

**विक्रमा०:**—अतुल सत्ताधीश सार्वभौम विक्रमादित्या, अशा रीतीनें शेवटीं तुजवर एका यःकश्चित् विषयांध राजकन्येच्या करामतीनें या भयाण निर्जन अरण्यांत हस्तविहीन होऊन जंगली क्रूर श्वापदांपासून स्वतःचें संरक्षण करण्यासही असमर्थ होऊन पडण्याचा प्रसंग यावा; ह्मणजे आश्चर्य ! महदाश्चर्य ! ! " स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति, कुतो मनुष्यः" ! ! ! सर्व शक्तिमान् परमात्म्याचें कुतुहलमय ब्रह्मांडांतील वैचित्र्यपूर्ण गूढ चमत्कारांनीं मानवबुद्धि कुंठित होऊन जाते ! ग्रहराज शनीदेवतेला सामान्य कोटींतील समजण्यांत माझी फारच मोठी चूक होत होती ! या भूलोकीं निंदा ह्मणजे सर्व साधारण मानवांचें जीवन ! तेव्हां माझें तोंडून निघालेल्या दोन निंदाव्यंजक शद्बासाठीं माझी अशी दशा करण्यांत ईश्वरीअंश शनीमहाराजांचा कांहींतरी गूढ हेतू खास असला पाहिजे ! माझ्यासारख्या ठळक सार्वभौमाची दुर्दशा झालेली ऐकून दुर्गुणप्रिय मानवांनीं ईशग्रहादिकांचे भीतीनें तरी त्यापासून परावृत्त व्हावे, असाच कांहीं यांत श्रेष्ठ परमात्म्याचा उच्च हेतू असला पाहिजे !

**४५ पद.** ( कांते फार तुला० )

**सारे निंदावश अन्यासी दुर्गुणघट बघती ॥ अनुभव जाणुनि भूषण**
**जणुं ते कटु वचनीं पर—मन दुखवीती ॥ ध्रु० ॥**
**कुमती प्रभुसी मान्य नसे ती ॥ असत्य तितुकें गरल असे ॥**
**विषप्राशन प्रिय होत न कधिं तें ॥ त्याज्य न कां दुर्गुण ते होती ॥१॥**

मानवजातीला दुष्कृत्यांपासून परावृत्त करण्यासाठींच जर शनीदेवतेनें अशा रीतीनें माझा छल चालविला असेल, तर मी स्वतःस त्रिवार धन्य समजतों ! पापकर्मांपासून होतां होईल तों अलिप्त राहण्याचा ज्याचा बाणा, त्याचेचकडून

चुकून घडलेल्या निंद्याचरणाबद्दल त्याला मिळालेलें हें असलें घोर प्रायश्चित्त पाहून तरी माझे बांधव मनुजयोनीचें सार्थक करोत. विक्रमादित्या, तुझे पायही तोडण्याची त्या राजकन्येला बुद्धि न होण्याचें कारण हेंच असलें पाहिजे कीं, अशा स्थितींत मी आतां भूतलावर हिंडून परमात्म्याचा संदेश भूतलावर जाहीर करावा !

[ आंतून शनीदेव तेल्याच्या वेषांत पुढील पद्य ह्मणत येतो. ]

**शनी०:—** ४६ **पद.** ( भल्या माणसा० )

> बाइल तरुणी त्यजुनी गेली, रत पुलाशीं हो कुलटा ॥
> पुत्रहि तैसे अधमाधम ते वश तिज मानुनि सुधाघटा ॥
> संतति सर्वहि जनकद्रोही, कींव माझि नच येइ कुणां
> प्रेमें कोणीं निकटीं येतां, गिळंकृता करि जिभलि खटा ॥१॥

**विक्रमा०:**—ह्मणूनच ते तुझ्यापासून दूर आपले मातेसह रहात असतील ! स्वतःचींच पोरें खाणारा तूं एक अलौकीक प्राणी आहेस तर !

**शनी०:**— हो, पण माझ्या अधम स्त्रीपुत्रांच्या वर्तीनें बोलणारा असला हस्त-विहीन अलौकीक प्राणी तूं रे कोण आहेस ?

**विक्रमा०:**—अरे बाबा, जरा लक्षपूर्वक पाहशील तर माझे हात नुकतेच तुटलेले तुला दिसतील !

**शनी०:**—हो दिसतात खरे ! मग आपण फारच भयंकर प्राणी असला पाहिजे ! त्याखेरीज इतकी कडक शिक्षा आपल्याला मिळालेली नाहीं ! सांगाल कां आपलें जरा चरित्र ?

**विक्रमा०:**—हो, न सांगायला काय झालें ! लोकदृष्ट्या फार सुखी दिसणाऱ्या, परंतु माझ्या मतें पापकृत्यास प्रवृत्त करण्याला साधनीभूत अशा स्थितींतील मी एक राजा होतो.

शनी०:--ओहो, थापा तर देत नाहींस ?

विक्रमा०:--त्यापासून मला काय फायदा ?

शनी०:--बरें, राजा होतास; पुढें ?

विक्रमा०:--एकदां चुकून एका श्रेष्ठ ग्रहराजाची माझेकडून निंदा झाल्यामुळें मजवर एक खोटा आरोप लादला जाऊन त्याचा परिणाम हा या स्वरूपांत झालेला आहे ! हीच माझी थोडक्यांत हकिगत.

शनी०:--पण आरोप कसला होता ?

विक्रमा०:--आरोप या रत्नपूरांतील राजकन्येचे अलंकार हरण करण्याची इच्छा, हा होता.

शनी०:--पण तो खोटा होता ? तूं तिची विषयेच्छा पुरविली नसशील; खरें ना?

विक्रमा०:--पण तूं हें कशावरून जाणलेंस ?

शनी०:--अरे मला तिची पूर्ण माहिती आहे. मी तिथलाच तर राहणारा आहे. पण माझ्या बायकापोरांनीं एकचित्त करून मला हांकलून दिलें; आणि त्यांनींही तेथून काळें केलें ! तेव्हांपासून मी असा उदासीन वृत्तीनें या रत्नपूराबाहेरील भयाण जंगलांत वस्तीला असतो. आणि येथें उदरंभरणार्थ माझा नेहमींचा तेलाचा घाणा चालवून कसा तरी काळ कंठीत असतो !

विक्रमा०:--बरें पण तेलीबुवा, तुझ्या कुटुंबाची पुन्हां हकिगत सांग पाहूं ?

शनी०:--ती मात्र विचारूं नकोस. त्यांच्याविषयीं मी नुसता विचारही मनांत आणला, तरी माझें देहभान नाहींसें होतें ! माझी अशी खात्री आहे कीं, माझ्यासारखें सुखवैचित्र्य भोगण्याचें फारच थोड्यांचें नशिबीं असेल ! असली निमकहरामी बायको आणि पितृद्रोही कारटीं; छे, नकोच त्यांची आठवण ! चांडाळीण प्रत्यक्ष आपल्या नवऱ्याला लाथाडून पोरासोरांसह खुशाल मजा मारीत भटकते !

विक्रमा०:--मग तूं मघाशीं आपलीं पोरें खाण्याविषयीं काय ह्मणत होतास ?

शनी०:--मग काय करूं रे ! एखादें कारटें चुकून मला कुठें आढळलें, तर तें

पाहून माझा संताप विकोपाला जाऊन त्याचा मी या जगांतून अगदीं नायनाट करून टाकतों ! ( स्वगत ) जगांत एकरूप मिळवून सोडतों !

**विक्रमा०:--** ( स्वगत ) या स्वारीला संतापातिरेकानें भ्रम झाल्यासारखा दिसतो !

**शनी०:--** ( उघड ) काय सांगूं बाबा, तुझे हात त्या राजकन्येनें तोडले, तरी तूं माझेपेक्षां खरोखरीच सुखी आहेस ! मानसीक दुःखापेक्षां शारिरीक दुःख पुष्कळ पटीनें बरें ह्मणवतें ! माझे तर कांहीं गोष्टीसंबंधीं ठाम सिद्धांत झालेले आहेत ! हेच पहा, तुला देहांत-शासन मिळावें, ह्मणून त्या राजकन्येनें तुझे हात तोडून या निर्जन ठिकाणीं तुला टाकले असेल ! पण देवाचें मनांतून तुला मारणें नाहीं !

**४७ पद.**

जनन मरण सहज; मनुज पात्र होय या जरी ॥
हनन तया एकाकी योग्य न हो अवनिवरी ॥ ध्रु० ॥
फलभोगास्तव लोकीं जन्म घेत तो प्राणी ॥
दैवाऽलंबानुकूल होय तरी त्या तारी ॥ १ ॥

तेंच मी बायकापेरें असूनही वनवास भोगावा, असेंच देवाच्या मनांत आहे ! काय सांगूं राजा, मला तर असें वाटतें कीं, जगांतील सर्व प्राणी सुखी असून देवानें मलाच फक्त दुःखी ठेवले आहे !

**विक्रमा०:--** ( स्वगत ) याच्या या भाषणावरून हा तेली पूर्वजन्मीचा कोणी योगभ्रष्ट ज्ञानीच असावा, असें दिसतें ! ( उघड ) अरे बाबा, जोंपर्यंत मनुष्य संसारांत गुरफटलेला आहे, तोंपर्यंत त्याला सुखी ह्मणणें ह्मणजे वेडेपणाच आहे !

**४८ पद.** ( सिद्धं ब्रह्मपदं० )

जगिं या सुखी कोण रे ॥ मायामोहें विष अमृतसें ॥ ध्रु० ॥
माता मानी निज बालांशीं ॥ ईशहि तैसा सम सर्वांशीं ॥ १ ॥

**शनी०:**—बरें तें कांहींही असो; सध्यां आपण दोघेही दुःखी आहोंत खरें! मला या वनवासाचा कंटाळा आल्यामुळें तुझ्यासारख्या सोबत्याची आवश्यकता होतीच. आणि तुलाही आतां दुसऱ्याच्या आश्रयाखेरीज जगणें कठीणच आहे! तर चल; आतां कांहीं दिवस मजजवळ रहा. माझा घाणा फक्त हांकलीत जा, म्हणजे झालें. मग तुझी सर्व व्यवस्था माझेकडे लागली. अरे, इतका विचारांत कां पडलास? मजजवळच राहशील तर जगशील तरी! नाहींतर त्या राजकन्ये-च्या सेवकांनीं तुला जर कुठें पाहिले, तर तुझा मग कपाळमोक्षच समज.

**विक्रमा०:**— (स्वगत) हेंही कांहीं खोटें नाहीं! आपलें नीच कृत्य छपवि-ण्यासाठीं माझा प्राण घेण्यासही ती उद्युक्त होईल! तेव्हां आतां कांहीं काल अज्ञातवासांतच काढणें योग्य! पुढें सुचेल तसें करावें! माझी ग्रहपीडा अद्याप संपलेली दिसत नाहीं! आणखीही कांहीं चमत्कार व्हावयाचे शिल्लक असतील! [उघड] ठीक आहे बाबा, चल; सध्यां तरी तुझें ऐकलेंच पाहिजे! कारण मला आतां फारच थकल्यासारखें वाटतें आहे.

**शनी०:**—अति रक्तस्रावामुळें तुला तसें वाटत असेल. चल; माझ्या निरामय झोपडींत जरा सुखानें विश्रांती घे.

**४९ पद.** [एका गुजराथी चालीवर]

**राही; अनिवार दुःख साही; नवभाग्यहीन पाही ॥**
**पुनरपि नृपकामीं तप करि अमूप वनिं या तूं ॥ ध्रु० ॥**
**शासी मम स्त्री कुटिला ॥ हेतु हाचि मनिं उरला ॥**
**उपकृतिला वाही ॥ १ ॥**

———:०:———

**अंक ४ था समाप्त.**

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

[ स्थळ:--पूर्वींचेंच. देवनंदा, अलोलिका, पद्मसेना, वासंतिका, एक मारेकरी व देवनंदेचे कांहीं सैनीक. ]

**अलो०:**– ( मारेकऱ्यास ) अरे, तुह्मीं त्यांना सोडून जातांना ते तुमच्याशीं कांहीं बोलले होते कां?

**मारेकरी:**--बाईसाहेब, आमच्या भाईबंदांनीं त्यांचे हात तोडल्यापासून तों आह्मीं त्यांना येथें आणून सोडीपर्यंत त्यांच्या तोंडचा आह्मीं एक शब्दही ऐकला नाहीं! ( पद्मसेनेकडे हात करून ) आतां आमच्या सरकारनाही वाईट वाटतें आहे, ह्मणून आपल्याला सांगतों कीं, जातांना त्यांच्या जखमेला आह्मीं चिंध्या बांधून मात्र गेलों होतों!

**पद्मसेना:**--शाबास बाबानो, जातीचे चांडाल असूनही तुह्मांला त्यांची कींव आली; पण मी मात्र कृतीनें चांडाळाच्याही पलिकडची झालें! आतां तुह्मीं सर्वांनीं तीव्रतम तिरस्कारानें माझ्याकडे पाहून या विषयलोलुप कायेची रक्षा होईल, तर बरें! अलोलिके, त्या महात्म्यांच्या साध्वीकडे वळून एक अक्षरही उच्चारण्याचें सामर्थ्य माझ्या जिव्हेंत आतां राहिलेलें नाहीं! आतां तूंच माझेसाठीं त्यांचा शोध लावून दोघांही पुण्यप्राण्यांची गांठ घालून दे. त्यांची येथें गांठ पडेलसें मला वाटलें, ह्मणून मी येथें तुमचेबरोबर आलें; पण त्यांची गांठ घालून त्यांचेजवळ क्षमा मागण्याइतकी माझी योग्यताच नव्हती! ह्मणून असें झालें. पतीचे वियोगानें त्रस्त होऊन आपलें घरदार मुलेंमाणसें सोडून पतिव्रता आपल्या नाथ शोधासाठीं रानोमाळ हिंडतात! अलोलिके, तुझ्यासारख्या उपवर कुलवधू आपल्या भावी वरदेवाला प्रसन्न करून घेण्यासाठीं त्यांच्याशीं मधूर अशा प्रणय-

रीतींनीं वागतात ! आणि मीं कुंवारपणींच आपल्या बालमैत्रिणीच्या सुखस्थानाचा अभिलाष धरून मनानेंच कां होईना, पण भ्रष्ट होऊन नाजूक स्त्रीजातीला काळिमा आणणारें कृत्य करावें ! अलोलिके, असें कां बरें व्हावें ! एकाच स्थितींत आपण दोघी असतांना कोण ही विरोधी घटना ! अलोलिके, माझें मस्तक आतां भ्रमण करूं लागलें ! मला आतां कांहींच सुचत नाहीं ! अलोलिके, मी तुझ्या तिरस्काराला पात्रच आहे; पण एकदां मला क्षमस्व ह्मणून जाऊं दे. आतां तुझें प्रेमळ दर्शन घेणें मला दुरापास्त आहे ! ( तिचे पाय धरून ) अलोलिके, तुझ्याशीं आजपर्यंत घडलेल्या वंचनेबद्दल मला क्षमा करून निरोप दे. मी आतां हें काळवंडलेलें तोंड इतःपर कोणालाही दाखविणार नाहीं ! माझ्यासारखी नीच हृदयाची अबला या सर्व जगांत मीच असेन ! अलोलिके, येतें मी आतां !

( जाऊं लागते. )

**अलो०**:– ( पद्मसेनेस धरून ) पद्मसेने, अशा त्रागेनें जाऊन तूं काय करणार ? झाली गेली गोष्ट; आतां त्यांचा शोध लावून तूं या साध्वीपाशींच क्षमा माग, ह्मणजे झालें. तुझे वडील मंडळींनीं जर तुझी परिस्थिती जाणून अगोदरच तुझा विवाह लावून दिला असता, तर असें होण्याचें कारणच नव्हतें ! पण त्यांच्या दुर्लक्षामुळें तुझेकडून असलें भयंकर कृत्य घडलें ह्मणून आतां आपल्या शरीराचें कांहीं बरें वाईट करून घेणें केव्हांही चांगलें होणार नाहीं ! आत्महत्येसारख्या पातकानें तूं आणखी आपल्या पापाचरणावर कळस मात्र ठेवशील ! पद्मसेने, असला कांहीं वेडेपणा तूं करूं नकोस.

**पद्म०**:– [ गहींवरून ] अलोलिके, किती तुझें हें प्रेमळ हृदय ! अशा कठिण प्रसंगींही माझेबद्दल तुला इतकें प्रेम वाटावें ! खरोखरी हेंच अबलाहृदय ! अलोलिके, जाऊं दे; माझ्यासारख्या राक्षशिणींचें वास्तव्य असल्या प्रेमळ अबला-सृष्टींत फारच अपायकारक होईल ! [ तिचेपासून सोडवून निघून जाते. ]

**अलो०**:– ( घाबरून सैनिकांस ) जा बाबांनो, तुह्मीं तरी तिला आवरा ! ती तुमची गुन्हेगारीण आहे खरी, पण तिला माझेंसाठीं तरी वांचवा ! ( कांहीं सैनीक

जातात; बाकिच्यांस ) आणि तुह्मीही येथें चारी बाजूला आपले महाराजांचा तपास करा. मला वाटतें ते इथें जवळपास कुठेंतरी असतील.

( सर्व जातात. )

**देव०:--** [ विव्हलतेनें ] कुठें असतील माझे नाथ ! त्यांच्या रक्तसिंचनानें भयाण दिसणाऱ्या या भूमीकडे पाहून माझें मनांत नानातऱ्हेचे कुतर्क येतात ! वासंतिके, पहा ग त्यांना; माझें पाय आतां येथून मुळींच हालत नाहींत ! ( बसते. ) हायरे दैवा !—

**५० पद.** ( उगिच कां कांता० )

**काय दशा नाथा ॥ जहाली कोमल तनुची ॥ धृ० ॥**
**प्रबल मृगरिपूरुधिरा ॥ स्पर्शि कोण प्रेमागारा ॥**
**वाहुं कशी या मम शरिरा ॥ जीवनाविना मी आतां ॥१॥**

[ मूर्छित पडते. ]

**अलो०:--**बाई, सावध व्हा, सावध व्हा. आपले नाथ येथें जवळपास कुठें असतील; बाई, असा धीर सोडूं नका.

**वासं०:--**बाईसाहेब, आपण असें हताश कां व्हावें बरें ? प्रत्यक्ष शनीदेवतेचेच उद्गार आपल्याला आठवतात ना ? महाराजांच्या जिवाला अपाय न करण्याची त्यांची प्रतिज्ञाच होती ! मग असा धीर सोडून कसें होईल ! बाईसाहेब, आपले लोक महाराज भेटल्याची बातमी आतां घेऊन येतील !

**देव०:--**वासंतिके, अलोलिकाबाई, आतां आतां ह्मणून नाथांच्या भेटीचा योग मला मृगजळासारखाच भासत आहे ! कसें करूं; माझे प्राण तर आतां राहतात कीं जातात, असें झालें आहे !

**वासं०:--** [ तिला सांवरून ] बाईसाहेब, बाईसाहेब, असें काय बरें ! बाल-युवराजांना तरी विसरूं नका !

**देव०:--**खरेंच वासंतिके, माझ्या बालराजाची मी गेल्यावर काय अवस्था होईल ! छे; मी अशीच माझे प्राण कोंडून ठेवीन !

**अलो०**:--परमेश्वरा, काय रे या सतीचे असे हाल मांडलेस! बाबा तुह्मांला कोणीकडून त्यांना ठेवून घेण्याची बुद्धि झाली!! हाय हाय; कन्या ह्मणजे पित्याचें पोटीं मूर्तिमंत मागील जन्मींचें पापच जन्माला येतें!!! ह्मणून पित्याला कन्येसाठीं अशा तऱ्हेच्या यातना! शनिराज, आपण या पतिव्रतेला वांचविण्या-साठीं तरी तिचे नाथ त्वरित आणून भेटवावे! त्यांच्यासाठीं मी माझे हात आपणांला अर्पण करते; पण प्रभुराज, आपण त्यांना सहस्त आणून या साध्वीचें शांतवन करावें. (खंजीर काढते) स्वसंरक्षणासाठीं हा खंजीर मी जवळ बाळगला, यानेंच हीं हस्तकमळें देंठासकट तोडून शनिदेवतेला वहावीं! अशानें तरी त्या महात्म्यांचे हात त्यांना परत मिळोत! प्रभो, या साध्वीकडे पाहून तरी माझी विनंती आपण मान्य करावी.

(एका हातांत खंजीर घेऊन दुसऱ्या हातावर रोखते.)

**देव०**:--बाई, तुह्मीं हें काय करतां! माझ्यासाठीं इतके क्लेश आपल्याला नकोत! अशानें ग्रहदेवता संतुष्ट होण्यासारखी असेल, तर मीच माझे हात प्रथम अर्पण करते! आणा तो खंजीर इकडे. (ती घेऊं लागते, अलोलिका तो लपविते; इतक्यांत शनीदेव तेल्याचे रूपानें येतात.)

**शनी०**:--बायांनो; ही काय झटापट आहे? त्या खंजिरानें तुह्मीं येथें एकमेकींचा प्राण घेणार कीं काय?

**वासं०**:--अरे बाबा, तूंच तो खंजीर या बाईच्या हांतून काढून घे तेवढा! यांचा या खंजिरानें आपले हात तोडून घेण्याचा विचार आहे!

**शनी०**:--खाशी! दोघींही हात तोडून घेणार?

**वासं०**:--हो बाबा, घे तो आधीं त्यांचे हातून!

**शनी०**:--बायांनो, आणा तो खंजीर इकडे. तुह्मींही हात तोडून घेतलेत ह्मणजे मला या निर्जन अरण्यांत थोट्यांचेसाठीं एक अन्नसत्रच घालावें लागेल! आता

थोड्या वेळापूर्वी मी एक थोटा घेऊन गेलों, आणि त्याची घाण्यावर योजना करून रत्नपूरांत जायला निघालों, तों पुन्हां तोच प्रकार !

**अलो०**:-- ( उत्सुकतेनें ) कुठें, कुठें आहे तुमचें ठिकाण ? दाखवा तें अगोदर ! बाई, खरोखरीच तुमचें दैव थोर ! ( शनीस ) चला, दाखवा तुमचें ठिकाण. तेच महात्मे या बाईचे पती आहेत. दाखवा त्यांना !

**शनी०**:--या बाईचे ते पती नाहींत; मी खात्रीनें सांगतों ! तुह्मी रत्नपुरांतल्याच ना ?

**अलो०**:--हो, कां बरें ? ते नाहींत कशावरून ?

**शनी०**:--अहो, तो तर सांगतो कीं, मी उज्जनीचा राहणारा आहे, आणि राजा आहे, आणि बऱ्याच गप्पा मारतो आहे ! आणि तुह्मी तर रत्नपुरांतल्या; मग कसें जुळणार ?

**देव०**:-- ( हर्षातिशयानें ) वासंतिके, खास हे शनीमहाराजच असले पाहिजेत ! [ पाय धरते ] महाराज, दाखवा माझे नाथ; तेच माझे नाथ आहेत. कुठें आहेत ते ? दाखवा. चला !

[ निरनिराळ्या रागाचे सूर ऐकूं येतात. ]

**शनी०**:--अहो, माझी झोंपडी अगदींच जवळ आहे. त्या झाडींतच. दिसणार नाहीं येथून. पण हें पहा, ऐका; तो गात बसला आहे; ऐका त्याचे सूर. आहेत ओळखीचे ?

**देव०**:--अहाहा, धन्य झालें ! पूर्ण परिचयाचेच सूर हे ! चल वासंतिके, महाराजच आहेत ते ! [ शनीस ] चला हो महाराज, दाखवा तुमची झोंपडी; कां यांतही मला कांहीं चमत्कार दाखवून जवळ गेल्यावर सर्व गुप्त होणार ! शनिराज, दयाघना, आतां किती माझा अंत पहाणार !

**शनी०**:--मी शनी ! ! ! मी तर बाई एक दुर्दैवी तेली आहे ! ती पहा माझी झोंपडी ! ती गुप्त व्हायला कांहीं भुताटकीचा खेळ थोडाच आहे ! अहो, त्या

ठिकाणीं आणखी उज्जनीचा राजाही आहे, ह्मणून मीं अगोदरच तुह्मांला स्पष्ट सांगितलें ! आतां तुमचें तुह्मीं पाहून घ्या; चला, ऐका पुन्हां त्याचे सूर.

**देव०:**--खास अलोलिकाबाई, चला माझे नाथच आहेत तिथें ! चला; अहाहा,

**५१ पद.**

**महिला जीवन शशिचण्डकिरण प्रमुदित जन सुविनाश ग्रहण पाहुनि जे तापसि ॥ धृ० ॥**
**शनिप्रभुग्रहकोप मना ॥ ग्रासी ही नृपललना ॥ पाहिल कां प्रिय स्वजनां ॥ हंस–बिंब–संगमा ? ॥ १ ॥**

(जातात.)

[ घाण्यावर विक्रमादित्य बसून घाणा चालू आहे. ]

**५२ पद.** ( भैरवी--शिवपद सारसं० )

**मतिभ्रम जाहला ! तिमिर जसा मनगगनीं संकट–घन व्यापि करी ॥धृ ०॥ निबिड घनघर्षण प्रसवि चपला ! शनिप्रभु दाविती तैलघाणा सृष्टिरूपकचि जाणा ॥ १ ॥**

हा तेली मला आतां परमेश्वरस्वरुपीच दिसतो ! त्याला सोडून जाणारी त्याची बाईल मूर्तिमंत मायाच असली पाहिजे ! दीनदयाळ प्रभुराज, या विक्रमादित्यानें हें आतां आपलें दुर्दैव समजावें कीं हें याचें सुदैव ! (अलोलिका पुढें येते)

**अलो०:**--सुदैव महाराज; आपल्या धर्मपत्नीला फार दिवसांनीं पाहण्याचा....
[ देवनंदा, वासंतिका येतात. ] या बाई, हे पहा महाराज !

**विक्रमा०:**-- [ सहस्त होतो ] अहाहा, प्रिये देवनंदे.

**देव०:**-- ( गद्गद स्वरांत ) महाराज ! ( आलिंगितात )

**अलो०:**-- ( आश्चर्यानें ) अगबाई ! या पतिव्रतेच्या सन्मानासाठीं महाराजांचे हातही पुन्हां प्रगट झाले ! ! !

**विक्रमा०:**--अलोलिके, हा सर्व खेळ त्या ग्रहराज शनिदेवतेचाच ;

५३ पद. (ज्या पांसुनि रवि० )

ग्रहलीला पाहुनि शमलें ॥ मम मानस प्रभुपदिं रमलें ॥ जें राजमदान्वित विलासि मन्मन सहज कटु वचा बोलें ॥ धृ० ॥
तव नवलपरी सहवासीं ॥ नृपकन्या अबला ग्रासी ॥ हा चक्रवर्ति नृप, घोर वनिं समिप पाहत कांता, सुशिले ॥ १ ॥

अलो०:– ( आश्चर्ययुक्त, स्वगत ) अगबाई, हे उज्जनीचे चक्रवर्ति विक्रमादित्य महाराज आहेत ना!

[ शनीदेव मूळ रूपांत येतात. ]

शनी०:--मालवाधीशा,

५४ पद. [ काय वधिन मी ती० ]

पुण्यपुरुष तूंचि खरा भूतलिं ॥ पापभीरु निजव्रतपरिपालक धन्य भूपति या कलिकालीं ॥ धृ० ॥
दुस्सह संकटताप प्रखरतर पावुनि ग्रहरिपु मानिसि वाली ॥ १ ॥

विक्रमा०:-- ( नम्र होऊन ) प्रभुराज, आपण साक्षात् परमेश्वर–स्वरूपीच आहांत !

देव०:--महाराज या योग्य कालीं आपल्या श्रेष्ठ दर्शनानें आह्मी कृतार्थ झालों !

शनी०:--साध्वी देवनंदे, आतां तुझी विरहशांति झाली ना ?

देव०:--दयाघना, आपल्या कृपेनें काय नाहीं होणार ?

५५ पद. [ भैरवी ]

आतां विरहशांत झालें ! ॥ सोडुनि मी सुत, जननि, तातही ॥धृ०॥
मृगजलतापें तनु ही पोळली ॥ प्रियदर्शनजालिं शांति पावलें ॥ १ ॥

शनी०:--साध्वी देवनंदे, तुझे पतिदैवताला, सार्वभौम विक्रमादित्याला नायकत्व देऊन हें निंदानिषेधप्रधान नाटक मी मुद्दामच करून दाखविलें ! या नाट्याचा

अ. क्र. स. ठाणे
ग्रं. क्र. ९००२
६१२९३

अंत्यकाल हाच तुमच्या परम उत्कर्षाचा प्रारंभ समजा ! मानवजन्माचें स्वोन्नति-साधन हेंच सार आहे ! या उच्च ध्येयाकडे दुर्लक्ष करून सर्वसाधारण मानव दुसऱ्याचीं व्यंगें शोधून त्या पापमूलक पायावर आपल्या श्रेष्ठत्वाचा डोल्हारा उभारण्याचा प्रयत्न करतात ! पण त्यामुळें मत्सर कलहादि नाना आपत्ती निर्माण होऊन त्यांना त्याचीं कटू फळें केव्हांना केव्हां चाखावीं लागतातच ! दुर्गुणमूलक साधनांचा अवलंब करून मधूर फलाकांक्षा धारण करणें ह्मणजे आयुर्वृद्धी होण्या-साठीं विषप्राशन करण्यासारखेंच आहे ! जशा आकांक्षा तशीं फळें हा परमा-त्म्याचा करडा अंमल आहे ! दुसऱ्याचीं व्यंगें काढून त्याचे नाशार्थ प्रयत्न कर-णारा नकळत स्वतःचाच नाश करून घेण्यांत गर्क झालेला असतो ! सद्वर्तनानें मानवैक्य घडवून संघशक्तीचा रसास्वाद घेणें आणि त्यांत स्वोन्नतीही साधून अंतीं मोक्षपद मिळविणें हेंच मानवजन्माचें उच्चतम ध्येयसर्वस्व असले पाहिजे ! श्रेष्ठा विक्रमादित्या, तुझें तशा प्रकारचेंच ध्येय असतांना, एकवार घडलेल्या प्रमादाचा आधार घेऊन मानवजातीला त्याचा दुष्परिणाम दाखविण्यासाठीं मला हें नाटक करावें लागलें. विक्रमार्का, माझें कार्य संपलें; आतां तुझी काय इच्छा आहे ?

**विक्रमा०:**—प्रभो दीनदयाळ, आपला उच्च हेतू आपल्या कृपेनें माझ्या ध्यानीं पूर्वींच आला ! आणि ह्मणून मी हें मला शासन न समजतां हा मला प्रभूप्रसादच मिळाला असें समजतों ! पण दुःखघना, असला प्रसंग यापुढें केव्हांही कोणावर येऊं नये, हेंच माझें आतां शेवटचें मागणें आहे ! कारण जरी यांत परमेश्वरी उच्च हेतू असला, तरी कोमलकाय मानवास असला सुयोगही तात्पुरता फार पीडादायक वाटण्याचा संभव आहे; असें मी स्वानुभवावरून ह्मणतों ! अखिल मानवजातीपुढें हें आतां एक उदाहरण घडलें आहेच; तरी माझी इच्छा पुरवि-ण्यास आपल्याला आतां कांहींच प्रत्यवाय नाहीं !

**शनी०:**—श्रेष्ठा विक्रमादित्या, ह्मणूनच तूं श्रेष्ठ ! शास्ता आणि शासित या भिन्न प्रकृती नसून, जें एकच परमेश्वरी सत्तत्व आहे, त्यानेंच तूं, मी, आणि

सर्व विश्व नटलेलें आहे! परंतु मोहपटलानें व्याप्त झालेल्या प्राणीमात्रास तज्ज्ञानें सावध करणें, हें त्याचें कर्तव्य ह्मणूनच मला हें करावें लागलें! मालवाधीशा, ज्याचा तोच पापपुण्याचा शास्ता आहे! तेव्हां तुझ्या इच्छेला 'तथास्तु' ह्मणण्यास मला कांहींच हरकत नाहीं! श्रेष्ठा, आजपर्यंत वागत आलास, त्या रीतीनेंच पुढें तुह्मीं सर्वांनीं वागून आपलें कल्याण साधावें, हीच माझी शेवटची इच्छा आहे! चक्रवर्ति विक्रमार्का, साध्वी देवनंदेच्या प्राणदैवता,—

५६ पद. (तो नर दुःखमुक्त० )

घेई आशिर्वच तुजला ॥ होइ शककर्ता भूप भला ॥ धृ० ॥
धनशेटगृहीं पाहीं प्रियजन जिंकुनि जयि या भूला ॥
अलोलिका सुशिला वाञ्छाही पुरवुनि साधि यशाला ॥ १ ॥

———×———

## प्रवेश २ रा.

[ स्थळः—जंगलाचा दुसरा भाग. पद्मसेना व सैनीक. ]

**पद्म०**—जाऊं द्या बाबांनो मला; कां असा अडथळा करतां? मी महान् पातकी आहे! त्या सुशील स्त्रियांपुढें पुन्हां येण्याइतकी माझी योग्यताच नाहीं! माझ्यासारख्या पापिणीला जनसमूहांत आग्रहानें नेऊन तुह्मींसुद्धां पातकी ठराल! सोडा माझा मार्ग.

**१ सैनीकः**—बाईसाहेब, आपल्याला परत घेऊन येण्याचीच आह्मांला आज्ञा आहे; ती मोडून आह्मीं आपल्याला पुढें जाऊं देणार नाहीं. आपण परत फिरा; नाहींतर आपल्या आंगाला स्पर्श करून आह्मांला आपल्याला न्यावें लागेल!

**पद्म०**:—तशा स्पर्शाची भीती साध्वी आणि कुलस्त्रियांना असते! मांझ्यासारख्या

नीच अबलेला हा धाक काय उपयोगी ! [ लांब पाहून, दचकून ] अगबाई हे कोण ! बाबाच कां इकडे येत आहेत ! ! आणि लपत छपत या भयाण जंगलांत कां बरें ! ! !

**सैनीकः**--कोण; हे चंद्रसेनमहाराज आहेत कां ! चलारे आपण जाऊन पकडूं त्यांना ! वा, अनायासेंच काम फत्ते ! आमच्या सरकारच्या या शत्रूला पकडून आह्मीं चांगलेंच इनाम मिळवूं ! [ बाकीच्यांस ] तुह्मीं या बाईसाहेबांना संभाळा; आह्मीं रत्नपूराधिपतींना पकडून आणतों ! [ जातात ]

**पद्म०**:-- [ घाबरून ] जाऊं द्या बाबांनी मला. मी बाबांना इथें दिसलें, तर ते काय ह्मणतील !

**सैनीकः**--तें कांहीं नाहीं बाईसाहेब; आतां ते आलेच पहा ! आपल्या स्वाऱ्या आतां बरोबरच चालूं द्या.

[ सैनीक चंद्रसेनास आणतात. ]

**चंद्र०**:-- ( आश्चर्यानें ) हा काय चमत्कार ! शत्रूसैन्यापासून बचावून मी पळत या घनघोर रानांत लपण्यासाठीं शिरलों; तों या लोकांनीं मला आयताच पकडला ! आतां मात्र कठीण अवस्था आहे ! [ पाहून ] आं ! पद्मसेने, तूंही इकडे कशी आलीस ! घात झाला ! ! पुरा घात झाला ! ! ! शत्रू राजवाड्यांत शिरून या मानी चंद्रसेनाच्या अन्तःपुरांतही धुमाकूळ मांडलेला दिसतो ! हाय हाय, माझ्या स्वातंत्र्यबाण्यास खग्रास ग्रहण लागलें ! ! !

**सैनीकः**--चलारे, या बाईसाहेबांनाही पुढें घालून चला. आपण यांना आतां महाराज्ञीसरकारच्या आज्ञेनें विजयसेन महाराजांचेकडे बंदोबस्तानें घेऊन जाऊं !

[ जातात. ]

---:०:---

## प्रवेश ३ रा.

[ स्थळ:--धनशेटाचा वाडा--धनशेट, विजयसेनमहाराज, सुमंत, विजयसेनाची वृद्ध राज्ञी, युवराज, आणि कांहीं सैनीक. ]

**धन०:**--महाराज, आपण आणखी खात्रीलायक बातमीवरून असें ह्मणतां, हें ऐकून तर मला फारच आश्चर्य वाटतें ! येथें उज्जनीचे एक सरदार मात्र होते, हें मीं आपल्याला सांगितलेंच !

**विजय०:**--सरदार नाहीं खुद्द अवंतीनगरीचे सार्वभौम विक्रमादित्य महाराज, या विजयसेनाचे चक्रवर्ती जामात येथें असल्याची बातमी आह्मांला तुमच्या राजवाड्यांतच समजली ! धनशेटजी, तुह्मीं खरें काय तें सांगा. चंद्रसेनाची भिती बाळगण्याचें आतां कारण नाहीं ! त्यांच्या राज्याचे मालवाधिपतीच आतां धनी झाले आहेत !

**युवराज:**-- [ वृद्ध राज्ञीस ] मासाहेब, कुठें आहेत महाराज ? आणि आईही नाहीं ! ( सेवक येतो. )

**सेवक:**-- ( मुजरा करून ) सरकार, हुजूरस्वारी महाराणीसरकारसह इकडेच येत आहे ! ( सर्व आतुरतेनें वाट पाहतात. )

[ विक्रमादित्य, देवनंदा, अलोलिका, वासंतिका येतात. ]

**विक्रमा०:**— [ येतांना ] **५७ पद.**

**सुखसमय अतुलनिय दावित विस्मय, श्रेष्ठतम प्रभुकृपा ही ॥ धृ० ॥**
**निंद्यवचनिं शासन माशिं लावुनि दाविति ग्रहशनि दुर्गुणफल जनिं ॥१॥**

वडिलांचे चरणीं हा विक्रमादित्य नम्र होत आहे.

[ देवनंदा युवराजास जवळ घेते; व वृद्धराज्ञी तिला कुरवाळते. ]

**विजय०:**– ( विक्रमादित्यास उठवून ) मालवाधिपतींचा अखंड विजय असो! वत्से देवनंदे, तुलाही या समयीं तृप्तकाम पाहून मला अत्यानंद होत आहे! [ युवराजास ] बाळ, भेटली ना तुला आई?

**युव०:**–आई, महाराज इतके दिवस कुठें होते ग?

**विक्रमा०:**–याच ठिकाणीं होतो बाळ! नवकोटनारायण महाराज, आपण मजकडे इतक्या विस्मयपूर्ण नजरेनें पाहण्याचें कारण काय? आपण मला ओळखले नाहीं काय?

**धन०:**–नाहीं महाराज; माझ्याजवळ उज्जनीचे सरदार ह्मणून........

**अलो०:**–होय बाबा, तेच ते—

५८ पद. [ नृपमानसदुर्गा० ]

**चक्रवर्ति–सहवास सुदुर्लभ सहज घडे अघटीत घटना! ॥ धृ० ॥**
**मौक्तिक मानुनि संग्रहिं अपुलया ठेवियलें बहुमोल रत्ना! ॥ १ ॥**

**धन०:**–चक्रवर्ती राजाधिराजांचा दर्जा न समजल्यामुळें या धनशेटाकडून कांहीं प्रमाद घडले असल्यास.............

**देव०:**–नवकोटनारायणांनीं त्याबद्दल आतां आपली अलौकिक रूपगुणसंपन्ना अलोलिका महाराजांना अर्पण करावी, ह्मणजे सर्व भरपाई झाली!

**धन०:**–महाराज्ञी, इतकी माझी योग्यता कुठें आहे!

**देव०:**–महाराज, आपण लक्ष्मीचें चांगल्या प्रकारें संगोपन करून, नवकोट-नारायण बनून तिचें जनकत्व आपलेकडे घेतलें! तेव्हां आतां वृद्धापकाळीं तिला पृथ्वीपतीचे स्वाधीन करून...........

**वृद्धराज्ञी:**–पण बाळे, तुला तें सहन होईल का?

**देव०**:—आई, अलोलिकेचा सहवास कोणाला नकोसा वाटेल! प्रत्यक्ष शनि-देवतेचीही तशी इच्छा आहे! तेव्हां मी या अलोलिकाबाईंना आनंदानें आमच्या सुखदुःखाची वांटेकरीण करून, सवतीही एकेठिकाणीं प्रेमानें राहूं शकतात, असें आह्मीं कृतीनें सिद्ध करून दाखवूं! [ धनशेटास ] मग महाराज, माझे नाथांना आपण हा प्रसाद या रत्नपूरच्या राज्यारोहणप्रसंगीं देणार ना?

**धन०**:—महाराज्ञी, आपल्या या वचनानें माझी फारच चमत्कारिक अवस्था झाली आहे! खरोखरीच मी या मानाला पात्र आहे काय?

**विक्रमा०**:—महाराज, माझ्या धर्मांगनेचीही या कामीं अनुज्ञा मिळाल्यानें आपले जवळ कृतज्ञताबुद्धि प्रगट करण्यास मला फारच आनंद होत आहे!

**धन०**:—बाळे अलोलिके, तूं आपल्या अलौकिक दैवबलानें हें खरोखरीच अलौकिक पद मिळविणार! एकंदरींत परमेश्वरी लीला अगाध आहे!

५९ **पद**. [ वारी तिमिरासी० ]

**वरित मना शांती ॥ विनती ॥ मान्य करोनी वरितां सुमती ॥ध्रु०॥**
**दिव्य दृष्टि मिळतां अंधासी, ॥ वंध्या मिळवी सुगुण सुतासी ॥**
**धन्य जिवित जगतीं ॥ १ ॥**

**सुमंत**:—महाराजांच्या द्विगुणीत तेजसंपन्न दर्शनानें त्यांचा जयजयकार केल्यावांचून मला या प्रसंगीं राहवत नाहीं!

**विक्रमा०**:—सुमंत, ज्या ग्रहराजाची एकवेळ मीं तुच्छतेनें निंदा केली; त्याचेच कृपेचा हा सगळा प्रभाव!!! [ एक सेवक येतो. ]

**सेवक**:-- [ मुजरा करून ] बाहेर रत्नपूराधिपतींना बंदिवान् करून आणले आहे! बरोबर राजकन्याही आहेत!

**विक्रमा०**:— [ विजयसेनास ] महाराज, आपल्या अधिपत्याखालीं हें राज्य

माझ्या सैनिकांनीं जिंकलें आहे ! तेव्हां सर्व बाबींचा आपणच निकाल लावावा, हें योग्य. परंतु माझी यावेळीं विनंती इतकीच कीं, या सुमंगल प्रसंगीं त्यांना बंधमुक्त करून पुढेंही त्यांना आपण क्षमा करावी !

**विजय०:**--या राजकन्येनेंच आपली फार दुर्दशा केल्याचें आह्मीं ऐकतों ?

**वृद्धराज्ञी:**--हो मग तिला क्षमा काय ह्मणून ?

**विक्रमा०**--तिलाही तशी बुद्धि माझ्या दुर्दैवानेंच झाली असेल !

**देव०:**--आणि आई, ती राजकन्या पद्मसेना माझ्या या भगिनीची--अलौलिकाबाईची बालमैत्रीण आहे. तेव्हां तिला आतां शिक्षा कशी होईल !

**विक्रमा०:**--अबलेला शिक्षा राज्ञीकडूनच झालेली बरी दिसेल !

**देव०:**--अगबाई, तसें असेल, तर माझ्या हुकमानें तिचा विवाह शक्य तितक्या लवकर तिला अनुरुप अशा एखाद्या राजाशीं लावून द्यावा !

**विजय०:**--जारे, त्यांना बंधमुक्त करून सन्मानानें राजवाड्यांत घेऊन जा. धनशेटजी, आपलें नांव आह्मीं आजपर्यंत ऐकून होतों; परंतु आतां आपला निकट संबंध होणार, याबद्दल आह्मांला समाधान वाटत आहे. चला, आपण आतां लग्नसमारंभाच्या तयारीला लागूं !

**धन०:**--महाराज, मला या एकंदर अपूर्व प्रकाराचें राहून राहून आश्चर्य वाटतें ! चक्रवर्ती विक्रमादित्य महाराजांसारखे लोकोत्तर जामात जोडण्याचें माझ्या नशिबीं असेलसें मला कालत्रयींही वाटलें नाहीं ! परमेशाची अद्भुत लीला एकंदरींत अगम्य आहे !

**विक्रमा०:**--महाराज, ज्यामुळें हा अपूर्व प्रसंग जुळून आला, त्याला मूळ कारण ग्रहनिंदा ! कटुवचनानें नाना अनर्थ ओढवून मानवजातीचें कल्याण होण्यास सद्वर्तनच कारणीभूत होतें, हेंच माझ्या या चरित्रांतील सार आहे !

[ सर्व गाऊं लागतात. ]

( भरतवाक्य )

६० पद.

शिव शिवमति देई जगतिं हरुनि अशिवमाला ॥ ध्रु० ॥
मत्सर खर दावानल दावित निज भुजबल खल ॥
त्रस्त करित अवनीतल, तारि या जनांला ॥ १ ॥
भारतीय बुद्धीबल दुर्गुणिं या होत विकल ॥
ऐक्यबलें परि उज्वल, दिपवुं तें महीला ॥ २ ॥
अंतीं प्रभु पायीं तव, कृति द्वितीय अर्पित नव ॥
साधो यश, गिरिजाधव, हरुनि अशिवमाला ॥ ३ ॥

———×———

समाप्त